रा. रा. बाळकृष्ण दिनकर वैद्य
कल्याणकरकृत.

सत्-स्त्री-प्रभाव नाटक.

प्रकाशक,
दामोदर सांवळाराम आणि मंडळी,
बडोदें व मुंबई.

किंमत एक रुपाया.

'योग्य प्रकारचें स्त्रीशिक्षण हितकारक नाहीं असें कोण ह्मणेल?'

शूर-स्त्री-प्रभाव नाटक.

लेखक

बाळकृष्ण दिनकर वैद्य कल्याणकर.

प्रकाशक

दामोदर सांवळाराम आणि मंडळी-बडोदें.

बडोदें.

'पूर्णचंद्रोदय' छापखान्यांत छापिलें.

सन १९०१

किंमत बारा आणे.

प्रस्तावना.

आपल्या या भरतखंडांत अति प्राचीनकाळीं स्त्रियांस योग्य प्रकारचें शिक्षण देत असत. त्यायोगानें त्या विद्वान, शूर, कलाकौशल्यसंपन्न होऊन, आपल्या अंगच्या अमोल्य गुणांनीं प्रसंगविशेषीं पुरुषसमाजासही थक्क करून सोडीत याविषयीं पुराणांतरीं पुष्कळ उदाहरणें प्रसिद्ध आहेत. त्यानंतर अगदीं अलिकडे देखील ह्मणजे जेव्हां रजपूत लोकांचें प्राबल्य विशेष होतें, त्या वेळेसही रजपूत लोकांच्या मुलींस घोड्यावर बसणें, दांडपट्टा खेळणें, शिकार करणें, इत्यादि प्रकारचें शिक्षण देत असत. यायोगानें त्या शूर होऊन प्रसंगविशेषीं पतीला मदत करणें, वेळ प्रसंग पडल्यास राज्यकारभारही मुखत्यारीनें चालविणें, आणि मोठमोठ्या संकटांतून युक्तीनें निभावणें, आणि आपलें पातिव्रत्य आपल्या अकलेच्या जोरानें निभावून आपली व आपल्या उभय कुलांची अब्रू राखणें इत्यादि कृत्यें करीत असत, याविषयीं तत्कालीन इतिहासांतही दाखले सांपडतील. प्रसिद्ध अहिल्याबाई होळकरीण,

झांशीची राणी लक्ष्मीबाई, हीं नुकतींच घडलेलीं या गोष्टीची साक्ष पटविणारीं अशीं उदाहरणें आहेत. असें असून स्त्रीशिक्षण अपायकारक आहे, स्त्रियांस लिहिणें-वाचणें शिकविल्यास त्या बिघडतील, इत्यादि कुतर्क काढून स्त्रियांस विद्येचा गंधही न लागू देणारे असे कित्येक आग्रही गृहस्थ आढळतात; त्यांच्या अंतःकरणांत थोडासा तरी प्रकाश पडावा आणि त्यांचें मन स्त्रीशिक्षणाकडे वळावें या हेतूनें हें पुस्तक रचलें आहे. या पुस्तकावरून योग्य प्रकारचें स्त्रीशिक्षण मिळाल्यास त्या स्त्रिया किती मान देण्यास योग्य, किती सुशील, आणि किती गुणी व कीर्तिमान होतात, हें स्पष्ट कळून येईल.

हें पुस्तक नाटकरूपानें रचिलें आहें. या पुस्तकांतील कथानकाचा काळ आपल्या देशांत महा भयंकर जी सोनपत पानपतची लढाई झाली तिच्या अखेरचा घेतला आहे. या भयंकर काळांत रजपत लोक, मराठे लोक, आणि यवन लोक, यांची स्थिति कशी होती, त्या वेळेस लोकांचे विचार काय होते, त्या वेळेस त्यांनीं तो काळ कसा घालविला, हें या पुस्तकांत दाखविलें आहे. या नाटकांत स्त्रीचें पात्र फक्त एकच आहे, व तीच या नाटकांतील नायिका आहे. तिनें जीं जीं कृत्यें केलीं आहेत त्यांजवरून स्त्रियांच्या अंगांत किती कर्तृत्वशक्ति असते, ती स्पष्ट दिसून येते. आणि स्त्रिया ह्मणजे अगदीं नादान,

मूर्ख व त्यांची अक्कल केवळ चुली पुरतीच, असें ह्मणणारास खालीं पहावें लागतें. त्याचप्रमाणें या नाटकांत दोन सेवकांचा अत्यंत स्वामिनिष्ठपणा आणि त्याचें त्यांस मिळालेलें सत्फल, हें दाखविलें आहे. यावरून एकदां एखाद्याची नोकरी पतकरिली ह्मणजे ती किती इमानानें बजावली तरच ती कीर्तीस कारण होते, हें कळतें. व सेवकास एक प्रकारचा बोध होतो.

या शिवाय या नाटकांत निष्कपट प्रेम, जुनी न्याय करण्याची पद्धति, निरपराधी मनुष्यही न्यायाधिशाच्या हातून कसा अपराधी ठरतो, आणि जगन्नियंता परमेश्वर त्याला कसा दोषमुक्त करितो, हें दाखविलें आहे. आनंदातिशयाचा परिणाम, थोर गृहस्थांचे उदात्त विचार व गुप्तवेषाचा उपयोग, इत्यादि गोष्टी यथावकाश दाखवून लहानशा चुकीपासूनही एकादे वेळेस किती कठीण प्रसंग येतो आणि तो निस्तरण्यास किती संकटें भोगावीं लागतात, हें उघड करून दाखविलें आहे.

आणखी एक यांत विशेष आहे कीं, आपल्या देशांत प्राचीन कालापासून शास्त्राधारानें जी चाल चालत आली आहे, कीं कोणी आप्त अगर अत्यंत इष्टमित्र यांचा वियोग होऊन बारा वर्षें होऊन गेलीं असतील तर त्यांची भेट होण्याचा योग आल्यास देवालयांत वगैरे ठिकाणीं विशेष विधिपूर्वक भेट घ्यावी. यांतील हेतु काय असावा व त्यांतील विधि-

पूर्वक भेटीचा योग न आणल्यास प्रसंगविशेषीं कसा अनर्थ गुदरतो हें दाखविलें आहे.

एकंदरींत हें नाटक आनंदपर्यवसायी आहे. हें सांगण्याचा मुख्य हेतु स्त्रियांना योग्य शिक्षण दिल्यास त्या कर्तृत्ववान्, नीतिमान व कीर्तिमान देखील कशा होतात हें दाखविण्याचा आहे. या नाटकांतील मुख्य नायक व नायिका हीं पात्रें एखादा मोठा राजा व राणी न कल्पितां सामान्य सरदार घराण्यांपैकीं कल्पिलीं आहेत, कारण सर्वांसच उपजत मोठी पदवी प्राप्त झालेली नसते. तेव्हां सर्वसाधारण मनुष्येंही यत्न करतील तर आपआपल्या कर्तृत्वाप्रमाणें योग्य फल पावल्यावांचून कधींही राहणार नाहींत, हाही एक बोध सहज मनुष्याच्या मनांत ठसावा, हाही एक हेतु आहे.

लोकांचें चित्त रंजन करून त्यांस शास्त्रीय गोष्टी समजावून देणें व आपल्या पुस्तकरचनेपासून सहजासहजीं सद्बोध करणें हें काम, नामांकित ग्रंथकारांचें आहे. तितकें कौशल्य माझे अंगीं नसूनही हें नाटक रचण्याचा मीं यत्न केला आहे. याचें कारण स्त्रीशिक्षणाकडे लोकांच्या मनाची प्रवृत्ति व्हावी या गोष्टीची अत्यंत आवड हेंच आहे. या आवडीमुळें आजपर्यंत मी "स्त्री–शिक्षण–बोध," "स्त्री–गीत" (भाग १ ला, २ रा, ३ रा.) "गर्भिणी स्त्रियांचें आरोग्यरक्षण व मूल अंगावर

पीत आहे तोंपर्यंत त्याची जोगवण" आणि "आवडती बायको" इत्यादि, स्त्रियांच्या उपयोगीं पडणारीं पुस्तकें केलीं आणि जनसमूहापुढें ठेविलीं. त्याप्रमाणें भीतभीतच पण हिम्मत धरून "**शूर-स्त्री-प्रभाव नाटक**" हेंही पुस्तक आज जनसमूहापुढें ठेवीत आहे.

मजपेक्षां जगांत अधिक विद्वान पुष्कळ आहेत आणि ते जर अशा कामीं यत्न करतील तर ते याहून अधिक उत्तम व सफल होतील, ही गोष्ट मला कबूल आहे, तथापि परमेश्वरानें मलाही हीं लहानसहान पुस्तकें करण्याची स्फूर्ति दिली, त्याबद्दल मी त्याचे अत्यंत आभार मानतों. आणि सरतेशेवटीं या पुस्तकास डेक्कन व्ह० सो० पुणें यांनीं बक्षिस दिल्याबद्दल व रा. रा. दामोदर सांवळाराम आणि मंडळी बडोदें, यांनीं उदारबुद्धीनें छापवून प्रसिद्ध करण्याचा योग जमवून आणिला याबद्दल, त्यांचे आभार मानन ही प्रस्तावना पुरी करितों.

बा० दि० वैद्य कल्याणकर.

शूरस्त्री प्रभाव नाटकांतील पात्रें.

विश्वासराव—सातारकर महाराजांचा एक सरदार.

जयवंतराव—सातारकर महाराजांचा एक सरदार (नायक.)

जानबा.
एसबा. } —जयवंतरावाचे सेवक.

जया—विश्वासरावाची मुलगी (नायिका).

पठाण—शत्रूकडील स्वार.

महाराज—सातारा येथील छत्रपति.

गुपितराव—वेषधारी जया.

बाळासाहेब—जयवंतरावाचा मुलगा.

रणधीरसिंग—उदेपूरचा राजा.

कुवतसिंग—रणधीरसिंगाचा मुलगा.

मानसिंग—रणधीरसिंगाचा जुना सेनापति.

बादशाह—दिल्लीचा अधिपति.

अबदुलखां—दिल्लीपतीचा सरदार.

यांशिवाय गौणपात्रें.

प्रधान, वजीर, भालदार, दवंडी पिटणार, दरोडखोर भिल्ल, शिपाई, गुप्त हेर, भिकारी, लष्करी लोक, वैद्यबोवा, भटभिक्षुक, गवई, जासूद वगैरे वगैरे.

शूर-स्त्री-प्रभाव नाटक.

अंक १ ला.

प्रवेश पहिला.

स्थळ—रणांगणाजवळील एक तंबू.

पात्रें.

विश्वासराव:—सातारकर महाराजांचा एक सरदार.

जयवंतराव:—सातारकर महाराजांचा एक सरदार, (नायक.)

विश्वासराव:—जयवंतराव, काल तर तुह्मी मोठी शिकस्त केली. आह्मांला कांहीं भरंवसा नव्हता कीं, तुह्मी आज दृष्टीस पडाल. शत्रूच्या सैन्याची जी टोळी आमच्याशीं आणि भाऊ साहेबांशीं लढत होती; त्यांचे जेव्हां आह्मी धुडके धुडके उडवून दिले, तेव्हां त्यांच्यांतील लोक जिकडे तिकडे पळूं लागले. आह्मी समजलों त्यांचा मोड झाला. परंतु ते सगळे पळालेले लोक तुमच्याशीं लढणाऱ्या सैन्याला येऊन मिळाले आणि तुमच्या भोंवतीं गर्दी केली; तेव्हां आह्मीही तुमच्या मदतीस येण्यास निघालों. तुह्मी त्यावेळेस मोठी मजा केलीत. मागें पळण्याचा आव दाखवून त्यांना अंगावर घेतलेत

आणि एकदम उलटून जेव्हां त्यांच्यावर तुटून पडलांत तेव्हां उलटें त्यांच्या लोकांस 'दे माय धरणी ठाय' झालें. इतक्यांत आमची मदत तुह्मांस येऊन पोंचली. बाकी जरी आह्मी नसतों आलों, तरी तुह्मीं यश मिळविलेंच असतें. कालचा जय तुमचाच.

जयवंतराव:–छे! छे! जय आमचा असें काय ह्मणतां? जय सर्वांचा. जय महाराजांच्या गादीचा. तुह्मी त्या वेळेस मदतीस आल्यानें आह्मांला मोठा धीर आला. तुह्मी आमच्या मदतीला येत आहां असें पाहिल्याबरोबर आह्मांला दुप्पट अवसान् आलें, आणि आह्मी एकदम त्यांच्यावर तुटून पडलों.

विश्वासराव:–मोठी हिंमत केलीत. एवढ्या मोठ्या सैन्यावर थोड्या लष्करानिशीं तुटून पडण्याची आह्मांला हिम्मत झाली नसती.

जयवंतराव:–अं:! त्यांत काय आहे? जय मिळवून दाखविला असता, व आजला शत्रूचें नांव सुद्धां बाकी राहिलें नसतें; पण जसे तुह्मी किंवा मी जीव देऊन लढतों, असे आपल्यांत लढणारे सरदार किती आहेत, हें तुह्मी जाणूनच आहांत. हा त्याची फजीती होण्याची वाट पहातो, व तो ह्याची फजीती होण्याची वाट पहातो. आपसांत एकमेकांचें वांकडें. ज्याला त्याला स्वतःचा अभिमान. ह्यांना वाटतें त्यांची फजीती झाली ह्मणजे आपण एकट्यानें यश मिळवावें, आणि त्यांचा हेतुही असाच. पण सगळे मिळून एक-

दां यश मिळवा आणि मग आपसांत भांडा. प्रत्येक जण जर आंग चोरून लढाई करूं लागला तर यश कोठून मिळणार? ह्यांचे हे प्रकार पाहून मी खचीत सांगतों, आपल्या महाराजांना ह्या स्वारींत यश येईल, असें मला नाहीं वाटत.

विश्वासराव:–मी सांगतों एक दोन दिवस जर माझ्या सारख्याच्या हातांत पूर्ण मुखत्यारी येईल, तर दोन दिवसांत मी शत्रूचे धुडके धुडके उडवून देईन. पण ह्या मानी भाऊसाहेबांपुढें आपलें काय चालावयाचें आहे? हे कांहीं आपलें ऐकणार नाहींत.

जयवंतराव:–न ऐकूं द्या. त्याचें फल ते भोगतील. पण इतकें एक बरें आहे कीं, परवांच्या दिवशीं तुमच्या पराक्रमाचें वर्तमान महाराजांकडे लिहून गेलें आहे. आणि आज माझ्या बद्दलही भाऊसाहेबांनीं चार अक्षरें लिहून पाठविलीं असतील.

विश्वासराव:–लिहून पाठविलीं असतील असें कां ह्मणतां? कालचें सर्व यश निव्वळ तुमचें. आणि त्याची सर्व हकीकत यथातथ्य लिहून गेली आहे. तें असो, पण तुह्मी आपलें लग्न कां करीत नाहीं?

जयवंतराव:–हा प्रश्न तुह्मी करूं नका. ह्याचें कारण मी सांगेन आणखी एखादवेळेस.

विश्वासराव:–नाहीं. मी आतां तुमच्या मनांतलें काढून घेतल्यावाचून सोडणारच नाहीं. दोन चार वेळां मीं तुह्माला हा प्रश्न केला, पण तुह्मीं ह्याचें उत्तर देण्याची

टाळाटाळच केलीत. खरोखर तुमच्या मनांत काय आहे, तें कळूं द्या तर खरें एकदां.

जयवंतराव:–कळावयाचें काय त्यांत? तें कांहीं मोठें खोल कारण नाहीं. सांगेन एखादेवेळीं.

विश्वासराव:–एखादेवेळीं नाहीं. आतांच सांगा.

जयवंतराव:–तुम्हीं तें ऐकलेंत तर मला वेडा म्हणाल.

विश्वासराव:–पण कळूं द्या तर खरें. मग म्हटलें वेडा, तर म्हटलें. तुमचे पराक्रम तर तुम्हांला शहाणे ठरवितील ना?

जयवंतराव:–सांगतों तर मग, ऐका. दोन चार वेळां तर मी तुम्हांला या प्रश्नाचें उत्तर देण्यास संकोचलों, पण आतां सांगतोंच. मग वेडा म्हणा, कीं शहाणा म्हणा. पण हें पहा, अगदीं गुप्त हो. माझे विचार फुटतां कामा नयेत.

विश्वासराव:–छे! छे! भलतेंच. तुमचे विचार मी आपल्या मनांत अगदीं गुप्त ठेवीन.

जयवंतराव:–ऐका तर मग. मला हा मराठमोळा अगदीं आवडत नाहीं. आपण रणांत जाऊन शत्रूच्या छातीशीं छाती लाऊन लढावें आणि आपल्या बायकांनीं पडदपोशींत गाद्यांवर बसून विहार करावा, हें मला बिलकूल आवडत नाहीं. शूरांच्या बायकांही शूर असल्या पाहिजेत. असा माझा समज आहे.

विश्वासराव:–तर काय आपल्या मराठ्यांच्या बायकांनीं पुरुषांबराबर लढाई करण्यास निघावें? स्त्री जात ती.

त्यांच्यावर अनेक प्रसंग येणार? त्यांतून त्यांनीं निभावावें कसें? आणि मग त्यांचें पतिव्रत्य राहील कसें? शुद्ध वेडे विचार आहेत तुमचे.

जयवंतराव:–हेंच तर; मी तुह्मांला पूर्वींच नाहीं ह्मटलें; कीं, तुह्मी मला वेडा ह्मणाल!

विश्वासराव:–वेडा नाहीं तर काय? त्यांतून एखादी स्त्रियांची निराळी पलटण असती तर एक असो बोवा. शत्रूंच्या स्त्रिया आणि आपल्या स्त्रिया झुंजताहेत आणि आपण कौतुक पहात आहों.

जयवंतराव:–तसें तर नाहींच. आणि तशा सर्व स्त्रियांना थोडें बहुत तरी युद्धकौशल्य येण्याला माझ्यासारखाच राजा अवतरला पाहिजे. ह्मणजे मग सरदारस्त्रियांना थोडें बहूत युद्धकौशल्य साधतें कीं नाहीं, तें दाखविलें असतें. काय त्यांना घोड्यावर बसतां येणार नाहीं? काय त्यांना तिरंदाजी करतां येणार नाहीं? काय त्यांना शत्रूच्या नरडीवर तरवार ठेवतां येणार नाहीं? तुह्मी ह्मणजे मनुष्य आणि त्या मनुष्य नाहींत असें नाहीं कांहीं. तुह्मी त्यांना पडद्यांत ठेऊन ठेऊन नाजूक केलेंत. वास्तविक ह्मटलें ह्मणजे त्यांच्यांतच शूरत्व अधिक पाहिजे. त्यांना त्यांचें पातिव्रत्य रक्षण करितां आलें पाहिजे. त्यांचें पातिव्रत्यभांडार लुटण्यास जाणाऱ्या दुष्ट नराधमांच्या मुंड्या त्यांना तडातड उडवितां आल्या पाहिजेत.

विश्वासराव:—वहावा जयवंतराव वाहवा! तुमची अक्कल खूपच वहावत चालली.

जयवंतराव:—तुह्मी कांहीं ह्मणा, पण माझे विचार तर असे आहेत. आपण वर्ष वर्ष सहा सहा महिने परमुलुखांत, परदेशांत, कामगिरीवर जाणार, आणि आपल्या बायकांनीं पलंगसुवासिनी होऊन बसावें आणि एखाद्या दुष्टानें त्यांना गाठलें ह्मणजे फार तर 'डोकें फोडून जीव देईन' इतकीं अक्षरें त्याच्यापुढें उच्चारावीं. ह्मणजे झालें शतकृत्य. धिक्कार! धिक्कार! शूरांच्या बायकांनीं असले शब्द उच्चारणें ह्मणजे मला तर मोठी लाजीरवाणी गोष्ट वाटते.

विश्वासराव:—ठीक! ठीक! आजपर्यंत सर्व लोक वेडे होते वाटतें! मराठ्यांची बायको परपुरुषाच्या दृष्टीस पडली ह्मणजे मग मर्यादा तो काय राहिली?

जयवंतराव:—अंहः! तसें माझें ह्मणणें नाहीं, मर्यादा सोडावयाची नाहीं, पण ही गुजराथी लाज कांहीं उपयोगाची नाहीं. इतकें मात्र मी तुह्माला खास सांगतों.

विश्वासराव:—तर मग त्यांनीं मागल्या दारीं घोड्यावर बसायला शिकावें आणि माजघरांत तिरंदाजी करावी आणि उतरंडीच्या मडक्यांचीं मुंडकीं उडवावीं, असेंच कीं नाहीं?

जयवंतराव:—तसें नाहीं हो, ही आतां तुह्मी आपली मुलगी बरोबर स्वारींत आणिली आहे, आणि कित्येक

सरदारांनीं आपल्या बायका आणल्या आहेत, पण तंबूच्या बाहेर निघतील तर हराम.

विश्वासराव:—हः हः! मग ह्यांनीं काय आपला तंबू सोडून पाहिजे त्याच्या तंबूंत जाऊन बसावें, आणि हवें त्याशीं युद्धकौशल्य दाखवावें?

जयवंतराव:—तुम्ही उगेच आडवें नका लाऊं. ह्यांना मर्दानी वेष घेऊन शिकार करण्याला किंवा अंगांत सामर्थ्य असलें तर पुरुषवेषानें आमच्यांत सामील होण्याला काय हरकत आहे? अंगांत कौशल्य मात्र पाहिजे; मग काय मगदूर आहे कीं कोणी ओळखील?

विश्वासराव:—हां, ही मात्र तजवीज आहे खरी. जयवंतराव, इतका वेळ मीं तुमचें मन पाहिलें. ही अक्कल ह्मणजे तुह्माला सुचली आणि आह्माला सुचली नाहीं असें नका समजूं. ही माझी मुलगी. कुटुंब वारल्यामुळें मला बरोबर आणावी लागली; पण काय सांगूं? स्त्री जात पडली इतकेंच. निशाण मारण्यांत तर तिचा हात एखाद्या तिरंदाजाच्यानें धरवणार नाहीं. परवांचा मोठा वाघ मारला तो हिनें. त्याच दोघी तिघी मिळून मर्दानी पोषाकानें शिकारीस जातात. बरें, असल्यापैकीं एखादी मुलगी तुह्मांस मिळाल्यास मग तर तुह्मी लग्न कराल ना?

जयवंतराव:–एसबा थोडी धुनीला लांकडें मात्र आणलेलीं असूंद्या. धुनी अक्षयीं जळती असली पाहिजे. केलेल्या सोंगाच्या बतावणींत अंतर पडतां कामास नाहीं.

एसबा:–तें माझें काम. त्याची नको तुह्माला काळजी.

जयवंतराव:–बरें, आपली ढाल, तरवार, जंबिया आणि पोषाक सांगितल्याप्रमाणें नीट ठेविला आहेस ना?

एसबा:–तो त्या गुहेंत अगदीं जवळच ठेविला आहे. कोणाच्या नजरेस यावयाचा नाहीं.

जानबा:–तें ठिकाण फार नामी आहे. असेंच ठिकाण पाहिजे.

जयवंतराव:–ठीक आहे. असूं द्या बाजूला. प्रस्तुत तीं शस्त्रें आपल्या रक्षणास उपयोगी नाहींत. हें वेषांतर आपलें रक्षण करणारें आहे. प्रसंग येईल तसें वागलें पाहिजे. जर आपण पहिल्याच रूपानें राहिलों असतों, तर खचित् पकडलों गेलों असतों. काय प्रसंग चमत्कारिक आला पहा. जिकडे तिकडे 'बोले दिन्' ह्याशिवाय शब्द नाहीं. रणांत एक हिंदु नजरेस पडेनासा झाला. ज्यानें त्यानें आत्मसंरक्षणाचा मार्ग धरला. विश्वासराव बिचारा कोणीकडे गेला असेल तो जावो. त्यानें देखील पोबारा केला असेल यांत संशय नाहीं. त्यांजबरोबर आणखी बायका माणसांचें लचांड आहे.

जानबा:–काळच फिरला तेथें काय करावयाचें? बरें पाहतां येईल. "येबी दिन निकल जायगे" (चाहूल

ऐकून.) कोणी पठाण येत आहेत असें दिसतें. हं चालूं द्या आपला क्रम. शंकर! शंकर!

(जयाबाई पुढें चालते व मागें दोन पठाण चालत येतात.)

पठाणः–(जयाबाईस.) अब् क्यंव रोती? चलो आगे. तेरेकु हमारे ह्यां क्या कमती है?

पठाण दुसराः–रोते रोते चलती है. बेवकूफ! तेरेपर हमने बडी मेहरबानी कियी है. दुसरा कोई होता तो शिरपर बोजा देके चलाता; दिलमें कुच समज करो.

पठाणः–रोनेसे तुम छुट जायगे नहीं. फिर रोनेमें क्या हासल है? अब दिलखुषीसे रहना मेरे प्यार. (हनवटीस हात लाऊं लागतो. जया दूर होते.)

पठाण २ः–प्यास तो बहूत लगी. और मकान तो बहोतही लंबा है. यहां जंगलमें किदर पानी नही मिलेगा?

पठाण १ः–(येसबास पाहून.) ओ उदरसे कोई अदमी लकडा लेके आता है, उसकू पुछे.

पठाण २ः–कोन हैरे बहानचोद. किदर भाग जाता है? इदर आ.

येसबाः–(जवळ येऊन.) मै गुसाई हूं. लकडा लेके मै मेरे साईके तरफ जाता था.

पठाण २ः–कितना दूर है तेरा साई?

येसबाः–ह्यां नजदीक है साब.

पठाण २ः–वहां पानी है?

येसबा:–बहोतही अच्छा है. वहां झीरोका पानी अच्छा है.

पठाण १:–तो अच्छा. उठाव बोजा.

येसबा:–मेरेपास लकडा है.

पठाण २:–फेक देव लकडा. उठातेके नहीं? (लाथ मारण्याचा आव आणतो.)

येसबा:–(भ्याल्यासारखें करून) साब उठाता हूं. (लांकडांवर गाठोडें घेतो.)

पठाण २:–चल आगे तेरे साई तरफ.

(येसबा चालूं लागतो. मागून पठाण व स्त्री चालत जातात. धुनीजवळ येतांच पठाणाचें गाठोडें पठाणास देतो. लांकडाचें ओझें धुनीजवळ टाकतो. जयवंतरावास (गुरुमहाराज) नमस्कार करतो. स्त्री (जयाबाई) ही नमस्कार करते.)

जयवंतराव:–शंकर! शंकर!

येसबा:–ये लोक प्याससे बहोतही हलक हो रहे है. पानीके वास्ते इधर आये है.

जयवंतराव:–अच्छा. उसकू पानी देव. और खाना चहिये तो पुछो.

(येसबा पाणी देतो.)

पठाण:–कुछ–खानेकू है. या नहीं?

जयवंतराव:–हजर है. दे देव उस्कू.

(जानबा दोन तीन भाकरी देतात. व पठाण खाऊं लागतात.)

पठाण १:–(स्त्रीकडे पाहून) तुमबी खावो.

जया:–माझें अंगधुणें नाहीं झालें.

पठाण १:–क्या कहती है?

येसबा:–" मै न्हाया नहीं " ऐसी कहती है.

पठाण १:–न्हाया नहीं तो क्या हुवा. (भाकर देऊं लागतो.) ये लेव.

पठाण २:–हिंदू लोक न्हाये बगर खाते नहीं. उसकू न्हानेका और खानेका हुकूम देना. अबीं किदर भाग जायगी? आपकी और इनकी दोस्ती होयगी तब आपे-आप खाने लगेगी.

पठाण १:–अच्छा. जल्दी न्हाके खाना खावो. (गोसाव्याकडे वळून) देवो उसकू न्हानेकू पानी देवो.

(जया गोसाव्याजवळ येऊन पुन्हां पाया पडते.)

जयवंतराव:–तुम विस्वासरावकी लडकी है नहीं? मै जानता हूं.

जया:–हो. मला ह्यांच्या हातांतून सोडवा. (रडूं लागते.)

जयवंतराव:–फिर तूं इसके हातमें कैसी मिली?

जया:–तें काय सांगूं? ते मेले पहाताहेत इकडे.

जयवंतराव:–हम कैसे तुजकू छुडायेंगे? हम तेरेकू चहिये तो हमारे प्रसादसे हत्यार देते है. तूं उसकू मार और छुट जा.

जया:–तरीही मजवर फार उपकार होतील.

जयवंतराव:–(बोटानें जागा दाखवितो.) तूं उदर न्हानेकू जा. उदर फत्तरके नजदीक तेरेकू हत्यार मिलेगे.

(जया पोहरा भरून पाणी घेऊन आंघोळीच्या मिषानें तिकडे जाते.)

पठाण १:–(जयेकडे पाहून) अरे किदर भाग जाती है ?

पठाण २:–न्हानेकू जाती है. और किदर भाग जायगी ?

पठाण १:–देखो, उसके तरफ बराबर नजर रखना. भरोसेपर रहना नहीं.

पठाण २:–अबी आपके हातमेसे किदर भाग जायगी ?

(जया दोन हातांत दोन तरवारी घेऊन येते आणि पठाणांसमोर उभी राहून बोलते.)

जया:–मरदासारखे मरद तुह्मी, परक्या स्त्रीवर नजर ठेवतां ? शरम नाहीं वाटत तुह्मांला ?

पठाण:–बका मत कर. तेरेकू न्हानेके वास्ते छूट दियी और हातमें हत्यार मिळे इसवास्ते हमकू डराती हय ? बेइमान !

जया:–(रागानें लाल होऊन) तुझी आई बेइमान. तुझी बहीण बेइमान ! हरामखोर, बेइमान कोणाला ह्मण-तोस ? (असें ह्मणून त्यांच्या अंगावर वार करते.)

(जयाची व दोन्ही पठाणांची चकमक उडते त्यांत दोन्ही पठाण पडतात.)

जया:–(गोसाव्याच्या पाया पडते.) आपले फार उप-कार आहेत, आपण मला जीवदान दिलेंत. ते दुष्ट माझ्या आंगांवर हात टाकते, तर मी जीवच दिला असता.

जयवंतराव:–भगवंतके कृपासे अच्छा हो गया. तूं इसके हातमे कैसी मिली ?

जया:–आपण ऐकलेंच असाल कीं, भाऊ साहेबांचा मोड झाला आणि लष्कराची दाणादाण झाली. त्यावेळेस मीही पळालें आणि निःशस्त्र असल्यामुळें ह्या दुष्टांनीं मला पकडलें. आतां कोणीकडे जाण्याचा इलाज नाहीं. जिकडे तिकडे मुसंड्याचा सुळसुळाट झाला आहे. मी आपल्या आश्रयास राहतें. दैवयोगानें माझ्या बापाची भेट झाल्यास तो मला घेऊन जाईल.

जयवंतराव:–नहीं, नहीं, ये नहीं होनेका. हम गुसाई लोक. हमारेपास दुसरे जातकी औरत रहेगी तो सब लोक क्या बोलेंगे ?

जया:–मी तुझांस शरण आले आहें. मला मरण देऊं नका. आपण जर मला आश्रय दिला नाहींत, तर मी आणखी एखाद्या दुष्टाच्या हातीं सापडेन आणि माझ्या जिवावर येऊन बितेल. पाहिजे तर मी आपल्या बरोबर गोसावणीचें रूप घेऊन राहीन.

जयवंतराव:–(आपल्या चेल्याकडे पाहून.) क्यंव बेटा, कैसा करना ?

येसबा:–रहने देव. ये कुच मुरदाड औरत नहीं है. अच्छी लढनेवाली है. उसकू क्या फिकिर. और ये गुसावन बनके रही, तो क्या हरकत ? लेकिन तुमारा तुम देखो. औरत लोगोका कुच भरोसा नहीं. वक्त है !

जयवंतराव:–(दुसरा चेला जानबा याजकडे पाहून) क्यंव चेला, तेरे मनमें कैसा है ?

जानबाः—कुछ फिकर नहीं. रहने देव, शरण आया उस-कू मरण नहीं देना.

जयवंतरावः—अच्छा, तुम बेफिकर रहो.

प्रवेश तिसरा.

स्थळ—जंगलांतील एकांत जागा.

जयवंतरावः—ईश्वराची करणी कांहीं विचित्र आहे. चार महिन्यापूर्वी मी कोणत्या स्थितींत होतों, आणि आज कोणत्या थिस्तींत आहे! मी महाराजांची नौकरी पत-करल्यापासून माझ्या हाताखालीं हजार पांचशें लोक नाहींत, असा एक तरी दिवस गेला होता काय? पण आज फक्त दोन इमानी नोकर मात्र मजजवळ शिल्लक राहिले आहेत. आणि त्यांना देखील उघडपणें, नोकर असें मजला ह्मणतां येत नाहीं. ते कोणी पूर्व जन्मींचे माझे ऋणानुबंधी मित्र आहेत. त्यांनीं भीक मागून आ-णावी आणि मला खायला घालावें! हा धनीपणा उत्तम. ह्या परमुलखांत असे अज्ञात वासांत दिवस तरी किती काढावे? विश्वासराव जिवाचा मित्र. पण तो देखील ह्या प्रसंगाला जवळ नाहीं. ह्या जयाबाईचा हेतु तर मजवर पूर्ण बसला आहे. ती ह्मणते, 'जयवंत-राव भेटेल तरच मी लग्न करीन, नाहीं तर जी आतां गोसावीण बनलें ती बनलें. ह्याच वेषानें जन्म घालवी-न.' आतां हिला किती दिवस कुचंबत ठेवायची? एसबा हिच्याविषयीं उगेच भलते भलते संशय घेतो. जान-

बाचा तर नेहमीं तगादा लागला आहे कीं, " तुझी आतां हिला ओळख द्या." आणि आतां खरोखर आपल्याच्यानींही धीर धरवत नाहीं. ही आहे ह्मणून माझा जीव आहे. जर त्या दिवशीं हिचा वार त्या वाघाच्या पोटावर न लागता तर माझा प्राणच गेला असता. ही होती ह्मणून ह्या व्याघ्रनखांच्या जखमांतून मी बरा झालों. जखमा धुणें, पुसणें, मलम लावणें, किती सेवा हिनें केली? खरोखर हिचे माझ्यावर फार उपकार आहेत, आणि मला ते फेडले पाहिजेत. मी हिला आज ओळख देणारच. मग काय पण मजा होईल? ह्यावेळेस भवचित विश्वासराव यावा, पण ह्या फिरलेल्या काळांत असा योग कोठून येणार?

(कानोसा घेत असलेला एसबा एकदम पुढें येऊन.)

एसबा:—बसा लाळ घोटीत. मी सांगितलें नाहीं, कीं बायकांचा भरोसा बिलकुल धरूं नये. ती तुमची प्रिया तळयावर एका गोसावड्याच्या गळ्यांत मिठी मारून बसली आहे. चला पहा.

जयवंतराव:—अरे! काय ह्मणतोस काय?

एसबा:—काय? मी ह्या पायाशीं खोटें बोलेन? मी आपल्या डोळ्यांनीं बघितलें.

जयवंतराव:—(रागानें लाल होऊन) असें घडलें असेल तर मी यावज्जीव लग्न करणार नाहीं. दाखीव दाखीव मला. मी आतां त्याच्या व तिच्या नरडीचा घोट घेतों. (इतक्यांत जानबा येतो त्याजकडे पाहून) जानबा

चला हो. (जानबास बरोबर घेऊन एसबाच्या मागोमाग जातो.)

एसबाः--(जया धुणें तसेंच टाकून गोसाव्याच्या गळ्यांत मिठी मारली आहे, तिकडे बोट दाखवून) कां झाली खात्री ?

जयवंतरावः–(रागानें) हा रांडे, दुष्टे, धिक्कार असो तुझ्या शूरपणाला.

जानबाः–उगेच भलतें सलतें बोलूं नका. तो कोण आहे, ती काय करिते आहे, एकदां नीट पहा तर खरें.

एसबाः–आतां आणखी काय पहावयाचें ? एकमेका जवळ प्रत्यक्ष एका शय्येवर तुह्माला दाखविली पाहिजेत ?

जयवंतरावः–(धनुष्यास तीर लाऊन) आतां काय आणखी पहावयाचें ?

जानबाः–असें नका ह्मणूं. एकमेकाजवळ एका शय्येवर दाखविलीं तरी विचारवान पुरुष विचार करतात, कीं न जाणों कदाचित् ही बहीणभावंडें असतील. त्यांना जागें करून मग शस्त्र उगारावें.

एसबाः–तुह्मी आहांत पक्के शांतिब्रह्म ! अक्षयीं विचार ! विचार ! विचार !

जानबाः–राहिला आमचा विचार बाजूला. आह्मी तुमच्या बरोबर येतोंच आहोंना पण ? आतां तीं आपल्या तडाख्यांतून जातात कोठें ? पण येथून बाण किंवा गोळी

मारूं नका. तसें भलतें सलतें काळें बरें असतें तर आपली चाहूल ऐकतांच ते पळून गेले असते. चला.

एसबाः–आणि त्या गोसावड्या जवळ कांहीं जादूबिदू असली तर? तिला मोहनी घातली आणि आपणाला पण घालील. कोणी तरी एकजण सावध पाहिजे. तुह्मी जा पुढें. मी येथेंच रहातों.

जानबाः–अरे, चल. इतका भितोस काय?

एसबाः–शंभर स्वारांच्या अंगावर एकटा जाईन, पण असल्या गोसावड्याजवळ जाण्याला आपण भितों. मग आपण मला भित्रा ह्मणा, कीं कांहीं ह्मणा.

(एसबा थांबतो व जयवंतराव आणि जानबा पुढें जातात.)

जयाः–(जयवंतरावाकडे बोट दाखवून.) हेच ते महाराज. ह्यांनींच मला शस्त्रें दिलीं, आणि ह्यांच्याच योगानें मी आज तुमच्या दृष्टीस पडलें.

विश्वासरावः–अगे, हाच तो जयवंतराव. ह्यालाच मी तुला देणार होतों. तो पलीकडचा जानबा.

(विश्वासराव धाऊन जयवंतरावास भेटण्याकरितां येतो.)

जयवंतरावः–हां खबरदार! दूरसे बोलो. पहिले तूं कोन हय, ये हमकू कह देव.

विश्वासरावः–मी विश्वासराव मोहिता. मी चालण्याच्या ढबीवरून तुह्माला ओळखलें आणि तुह्मी नाहीं मला ओळखीत?

(विश्वासराव व जयवंतराव भेटतात. मागून जानबा रामराम करितो, नंतर सर्वजण बसतात. जानबा एसबास हातानें बोलावण्याची खूण करितो.)

एसबाः–(मनाशीं) हें आहे तरी काय? ही पक्की जादू! हे पण मिठ्या घालूं लागले!

विश्वासरावः–कोण हो तो?

जानबाः–तो आपला एसबा. तो अम्मळ संशयी नू भित्रा माणूस आहे. येईल आतां आपोआप.

विश्वासरावः–जयवंतराव, योग मोठा चमत्कारिक बनून आला. आहेना आमची मुलगी तुह्माला बायको करण्यास योग्य? कां अजून संशय आहे?

जयवंतरावः–संशय कसला? मी आज ओळख देणारच होतों.

विश्वासरावः–वहावा! वहावा! खुप अंत पाहिलात पोरीचा,–पोरी, तुला आवडतो कां हा नवरा? (लाजते व खालीं मान घालते) जा पड त्यांच्या पाया.

(जया जयवंतरावाच्या व विश्वासरावाच्या पायां पडते.)

एसबाः–अरेच्या! ही जयवंतरावच्या पायां पडली! जादूबिदू कांहीं नाहीं. तो हिचा कोणी सगा असेल. आपण खुशाल तिकडे जावें. (मंडळींत येतो.)

विश्वासरावः–(जयाबाईचा हात धरून जयवंतरावच्या हातांत देतो.) जयवंतराव हाच सुमुहूर्त. आतां हिला संभाळा; ही तुमची झाली. ह्या जलदेवता आणि हा सूर्यनारायण ह्याला साक्षी. अशा प्रसंगांत आणखी लग्नविधी तो कसा होणार? ठीक आहे. जानबा, एसबा, हिला संभाळा बरें. मला आज गेलेंच पाहिजे. भाऊसाहेबांची कांहीं खबर लागली आहे.

जयवंतराव:—जाल हो, पण मढीपर्यंत तर चला.

विश्वासराव:—छे! छे! ती गोष्ट व्हायची नाहीं. आतां तुह्मी आमचे जावई झालांत. आतां तुह्माला मुलगा होईल तेव्हां तुमच्या येथें आह्माला अन्न घ्यायचें. मला आतां गेलेंच पाहिजे. पण जरा बाजूला या.

(विश्वासराव आणि जयवंतराव बाजूला होऊन हळूहळू बोलतात व शूरवीरासारखे कांहीं बेत ठरल्याप्रमाणें अविर्भाव करितात.)

विश्वासराव:—(मुलीकडे वळून) पोरी संभाळ बरें. नीट जपून वाग. ह्यांची तब्यत जरा कडक आहे, येतों मी. (जया बापाला मिठी मारते.)

जया:—ये बरें, बाबा लवकर ये. (डोळे पुसते.)

जानबा:—कां, आतां तर सर्व संशय दूर झालाना?

जयवंतराव:—मघां आपण जर मला आवरून धरलें नसतें, तर खरोखर माझ्या हातून मोठाच अनर्थ झाला असता! व जन्मभर दुःख करीत बसावें लागलें असतें. आपणासारखीं शांत विचाराचीं माणसें जवळ आहेत, हें माझें भाग्यच ह्मणावयाचें.

जानबा:—चला, सर्व योग छान जुळून आला, इतकें बरें झालें.

(सर्व जातात).

अंक दुसरा.

प्रवेश पहिला.

स्थळ—जंगलाचा एक भाग.

(जयवंतराव व जयाबाई फिरत फिरत येऊन बसतात.)

जयवंतराव:—परमेश्वराची मोठी मौज आहे. तो कोणावर काय प्रसंग आणील आणि कोणावर प्रसन्न होईल ह्याचा नेमच नाहीं. आमच्या सारख्यांच्या पदरीं देवानें तुला घातलें, पण बागबगीचा किंवा रंगमहाल अथवा दासी ह्यांतलें एक तरी सुख तुला आहे काय? हें असलें सुख राहिलें एकीकडे, पण नुसता मऊ बिछाना तरी आमच्यापासून तुला मिळावयाचा होता? तो देखील नाहीं. काय ह्या जयवंतरावाला भाळलीस कोणाला ठाऊक? काय ह्मणे (वेडावल्या सारख्या शब्दोच्चारानें)—"लग्न केलें तर जयवंतरावाशींच करीन, नाहीं तर जी गोसावीण बनलें ती बनलें." घे हा जयवंतराव. हा तुझ्यापुढें एका पायावर हात जोडून उभा आहे. आहेना तुझ्या सुखाची चंगळ?

जया:—हें काय, हात काय ह्मणून जोडायचे? मी सुखीच आहे. माझ्या सुखाची चंगळच आहे. राजाच्या राणीलाही माझ्यासारखें सुख नसेल. सतरा चौक्या आणि आठरा परवानग्या होतील, तेव्हां राजा राणीची

भेट होत असेल, आणि हा मुखचंद्र अक्षयीं माझ्या जवळ. (मिठी मारते) मला काय कमती आहे ?

जयवंतराव:—पण येथें त्या राण्यासारखी चैन कोठें आहे? त्या राण्या, दासीबरोबर घेऊन बागेंत हिंडत असतात. तशा तुझ्याबरोबर दासी पण नाहींत, आणि बागही पण नाहीं.

जया:—हात्तिच्या ! त्या दासीबरोबर हिंडत असतील इतकें-च ना ? मी तर माझ्या प्राणसख्याबरोबर हिंडतें आहे. आतां बागेविषयीं ह्मणाल तर बाग ह्मणजे काय ? खऱ्या वनशोभेची नक्कल. मी तर ईश्वरकृत बागेंतच आहे. तेथें कृतीची टेकडी, येथें खरोखरीच्या टेकड्या. तेथल्या झाडांना माणसें पाणी घालतात आणि येथल्या झाडांना देव पाणी घालणार. तेथील बागेंत दोन चार पाळलेले हरीण दृष्टीस पडतील, आणि येथें हरणांच्या कळपांच्या कळप. किती केलें तरी ही शोभा आणि हें सुख कांहीं त्यांना मिळावयाचें नाहीं.

जयवंतराव:—बरें, तें असो. पण तूं आतां आमच्याबरोबर शिकारीला येत जाऊं नकोस. तुला खचित् कांहीं दिवस गेले आहेत. एरव्हीं ह्या तोंडावर इतकें तेज दिसावयाचेंच नाहीं. हें तेज गरोदरपणाचेंच.

जया:—पुरें. आपलें भलतेंच कांहीं तरी, आणि त्यांतून दिवस गेले असले ह्मणून स्वारीबरोबर शिकारीला येण्याला काय हरकत आहे ?

जयवंतराव:—अग, तुला ठाऊक नाहीं. गरोदर स्त्रियांना धांवणें, घोड्यावर बसणें इत्यादि कर्मे वर्ज आहेत. ह्यापासून गर्भाला इजा होते, असें ह्मणतात.

जया:—आतांपासून नको कांहीं इतकी माया.

जयवंतराव:—माया लावून कां लागते? माया ईश्वरच लावतो. मला आतांशीं असं वाटतं कीं, तुला अगदीं श्रम पडूं नयेत. अक्षयीं तुझ्या पुढें पुढें करावं. तुला जें पाहिजे असेल तें अगदीं जवळ आणून द्यावं. मी जानबाला सांगून ठेवलं आहे कीं, तुला त्यानें इतकी देखील तसदी पडूं देऊं नये.

जया:—पुरें तुमचं. जानबा मुळीं पहिल्यापासूनच मला तसदीं पडूं देत नाहींत. त्यांत आपली ओळख पडण्यापूर्वीं मी लुगडें धुवायला गेलें होतें आणि तेथें माझी व बाबांची अवचित् गाठ पडली, आणि त्यांनीं माझा हात आपल्या हातांत घातला. तेव्हांपासून जानबा मला ह्मणतात कीं, तुह्मीं लुगडें देखील धुवूं नका. पण मीच त्यांचेजवळ चिरगुटें धुवायला देत नाहीं.

जयवंतराव:—वा:! येथें कोणी काय करावें? खुशाल देत जा तूं धुवायला. अगदीं संकोच करूं नकोस. त्यांत आतां तर तुला तसदी घेतांच कामास नये; पण हें पहा, मी तुला एक गोष्ट विचारतों, ती तूं मनमोकळेपणानें अगदीं खरोखर सांगशील?

जया:—एकूण मी आपल्याजवळ खोटें बोलतें वाटतें? आपल्या मनांत अशी शंका तरी कशी आली?

जयवंतराव:-तसें नाहींग. दुसरें बोलणें सगळें खरेंच बोलतेस, पण ही गोष्ट मात्र खरी सांगशील कीं नाहीं, ह्याचा मला संशय वाटतो.

जया:-अशी काय ती गोष्ट कळूं द्या तर खरी. आपणाला कळवायची नाहीं, अशी गुप्त गोष्ट मजजवळ मुळींच नाहीं.

जयवंतराव:-तरी पण मी विचारणार ह्या गोष्टीचें उत्तर देण्याला तूं संकोच करशील असेंच मला वाटतें. तूं अगोदर कबूल कर, कीं मी खरोखर सांगेन.

जया:-शिकस्त आहे बाई आपली! आपल्याजवळ सांगण्याला संकोच कसला!

जयवंतराव:-पहा हो, मग ह्मणशील "मी नाहीं सांगत" ह्मणून.

जया:-नाहीं ह्मणणार, नाहीं ह्मणणार. विचारायचं, काय पाहिजे तें विचारायचं. अगदीं खरें खरें असेल तेंच उत्तर देईन.

जयवंतराव:-आतां खरं सांगूं? मी तुला तुझे डोहाळे विचारणार. तुला काय खावंसं वाटत असेल, अगर काय करावंसं वाटत असेल, तें अगदीं संकोच न करितां मोकळ्या मनानें स्पष्ट सांग. मी ते पूर्ण करीन.

जया:-(मानेला झटका मारून.) मला कसले डोहाळे होत नाहींत. उगीच कांहीं तरी विचारावं झालं! अगोदरच थट्टा करायाला अगदीं नको, आणि त्यांत आतां तर कारणच सापडलं, मग काय?

जयवंतराव:–नाहीं. थट्टा नाहीं. मी खरोखरच विचारतों. बायकांचे डोहाळे पुरविले ह्मणजे मुलगा किंवा मुलगी जें काय व्हायचें असेल तें रूपवान्, गुणवान्, सशक्त, असं होतं. जसा कांहीं राजबिंडा.

जया:–पुरे बाई. नाहीं तेंच एकेक काढावयाचं. दुसऱ्या कांहीं गोष्टी काढल्या तर?

जयवंतराव:–तर मग खरं खरं नाहीं सांगायचं आह्माला? आह्मी जाऊं रागावून? (उठून उभा रहातो.)

जया:–(पदर धरते) हें काय असं? जाऊं नका हो. मी सांगतें. माझं काय जातं? मग हसायचं मात्र होईल.

जयवंतराव:–आह्मी नाहीं हसत आणि हसलों तर हसलों. तुह्मी सांगाच एकदां.

जया:–मला किनै, एक पदार्थ खावासा वाटत होता. मनांत ह्मटलं आज उद्यां इकडे सांगून आणवावा. तो मला आपला देव पावला. आज सकाळीं आपण त्याचीच शिकार करून आणलीत. आतां खाण्याच्या पदार्थांची इच्छा मुळींच नाहीं. आतां दुसरं एक करावंसं वाटतं, पण तें मनांत आलं, ह्मणजे माझं मलाच हसूं येऊं लागतं. अशी कांहीं मौज आहे.

जयवंतराव:–काय काय तें? सांग तर खरं एकदां. इतकं हसण्या जोगं काय आहे तें?

जया:–अंहः! त्यांत कांहीं विशेष अर्थ नाहीं. तें कांहीं करावयाचें नाहीं आणि कांहीं नाहीं. उगीच आपलं मनांत येतं

झालं. विचारणं होतंयच ह्मणून सांगतें. (हसत हसत) मला किनै, असं वाटतं कीं, मी लपून बसावं आणि आपण मला शोधीत यावं. आणि आपली न् माझी दृष्टादृष्ट झाली, कीं, आपल्याशीं कुस्ती खेळावी.

जयवंतराव:–(हसून) वहावारे पहिलवान्. वहावा! मग कुस्ती खेळायची इच्छा आहे कां, घालूं कां चड्डी!

जया:–छे! आपल्याशीं कुस्ती कसची खेळते? आपण एका हातानें धरून ठेवलीत, तर हा हात देखील माझ्याच्यानें सोडववणार नाहीं. उगीच कांहीं तरी मनांत येतं झालं!

जयवंतराव:–अंहः! संकोच करूं नका. मनांत असलं, तर आमची तयारी आहे.

जया:–खेळलें कुस्ती! तें तितकंच. चला आपआपल्या कामाला.

जयवंतराव:–पण एकंदर डोहळ्यावरून आपणाला मुलगा होणार मुलगा. समजलांत?

जया:–बरं! बरं! होईल काय व्हायचें असेल तें. आपल्यांना नाहीं कोणी विचारलं. (हसत हसत व मागें पहात पहात जाते.)

जयवंतराव:–हसत हसतच गेली हो पण. आपणही आपल्या उद्योगाला जावें.

(जातो.)

प्रवेश दुसरा.

स्थळः—जंगलचा एक भाग.

जयवंतरावः—मोठें चमत्कारिक स्वप्न. स्वप्नावर मी कोठला विश्वास ठेवायला! पण आपण आजपर्यंत स्वस्थ बसलों, ही मात्र चुकी केली खरी. काय विश्वासराव ह्मणाले होते? उदेपूरचा रणधीरसिंग आपणास पूर्ण अनुकूल आहे, पण तो आपल्यास उघडपणें आश्रय देण्यास भितो. भ्या लेकांनों. भिऊन भिऊन तर देशाची धूळधाणी केलीत तरी अजून डोळे उघडत नाहींत! विश्वासराव नादी आहेत. त्यांना भाऊसाहेब सांपडतील हा केवळ भ्रम आहे. गेले भाऊसाहेब गर्दीत मिळाले! त्यांचा चकनाचूर उडाला असेल. ते असते तर आजला स्वदेशांतून फौज आणून दुसरी स्वारी करते. इकडल्या इकडे दबून रहाते काय? आमच्या सारख्यांना छपून बसण्याची पंचाईत. तों भाऊसाहेब छपले जातील? छे! नांव नको बोलायला. उगीच गेला विश्वासराव. मी वाट तरी किती पहावी? खचीत आपल्या मुलखांतून थोडें बहुत सैन्य घेऊन आल्यावांचून ह्या प्रांतांतील लोक कोणी वश होणार नाहींत. ह्याकरितां मला स्वदेशांत गेलेंच पाहिजे. पण हें एक मोठें लचांड झालें. हिला सातवा महिना लागला. माझ्या जाण्याचा बेत मी फोडला, तर ही बरोबर येण्याचा आग्रह धरील. विश्वासरावाची गांठ पडली तेव्हांच जर सर्वजण मुलखांत गेलों असतों, तर आज दुसरी

स्वारी ह्या मुलखांत केली असती. पण तो ऐकेच ना. आतां हिचें बाळंतपण होऊन निदान दोन तीन महिने झाल्यावांचून हिला प्रवासांत काढणें धोक्याचें आहे. आतां हिला येथें अशीच ठेवावी. जानबा आणि एसबा हिच्या जवळ आहेतच. ते कांहीं हिला अंतर देणार नाहींत. आपण स्वदेशीं जाऊन लष्कर घेऊन यावें. ह्मणजे हाच रणधीरसिंग आपल्यास येऊन मिळेल. आणि न मिळेल तर ह्याच्याशीं सामना करून ह्याला आपला आंकित करून घेऊं. सांप्रत आमच्यावर प्रसंग आणि आह्माला हा थारा देत नाहीं काय? अरे, कांहीं तरी उपकार स्मर. ह्या मुलखांत आल्यावर पहिल्या प्रथम तुझीच गांठ पडली आणि तूं आह्मास सांगितलेंसकीं, "पांच लक्ष रुपये देतों. तुह्मी माझ्या वाटेस जाऊं नका." ते आह्मी मान्य केलें ह्मणून तूं बचलास. नाहींतर तेव्हांच तुझे धुडके उडवून दिले असते. आणि तुला धुळीस मिळविलें असतें. हें कांहीं स्मर, पण नाहीं. ह्यावेळेस तो स्मरणार नाहीं. आमचें दैव फिरलें आहेना? बरें बच्यमदासजी याद राखून ठेव. सगळे दिवस सारखे नसतात.

प्रवेश तिसरा.

स्थळ—गुहेजवळचा प्रदेश.

जया:—जानबाराव, तुह्मी कांहीं ह्मणा, ते ह्या मुलखांत देखील नाहींत, हेंच खचीत. इतके दिवस ते कधीं

एकटे शिकारीला गेले होते काय ? बहुधा मी बराबर असे. पण माझी पाळी टळल्यापासून मला बराबर नेत-ना. ह्मणतकीं, गर्भाला इजा होईल. कोण मेलं छळ-वादी पोटीं आलं आहे कोणाला ठाऊक ? बरें, मला नेलं नाहीं; तरी तुला किंवा एसबाला घेऊन जात. त्या दिवशीं एकटे शिकारीला जायला निघाले तेंव्हांच मी चरकलें. कोणी तरी बराबर न्या ह्मणून पुष्कळ आग्रह केला, पण ऐकलं नाहीं. "आतां येतों." ह्म-णून गेले त्याचा अझून पत्ता नाहीं! खचीत आतां त्यांची माझी भेट होणं कठीण दिसतं. देवा, कशाला मला हें गर्भारपण दिलंस ? कोणी नवस केला होता ?

जानबा:—बाईसाहेब, असें काय आपण ह्मणतां ? आणि अशा निराश काय होतां ? ईश्वर करणी अगाध आहे. त्या पठाणांच्या हातून सुटून ह्यांचे पदरीं तुम्ही पडाल, ही कल्पना तरी त्यावेळेस तुमच्या मनांत होती ? चार महिने तुम्ही ह्यांच्या जवळ होतां, पण हे ह्मणजे जय-वंतराव अशी ओळख तरी तुह्माला पटली होती ? पण देवानें घडविलें तर तुमचे वडीलही येथें आले, ह्यांची तुमची ओळखही पटली आणि लग्न होऊन हे दिवस आले. देवाचे मनांत काय आहे, हें कोणास कळतं आहे ? उद्यां पालखी घेऊन ते तुह्माला न्यायला येणार नाहींत कशावरून ? देव करील तर सर्व कांहीं होईल. रिकाम्या भलत्या भलत्या शंका काढून दुःख नका करीत बसूं.

जया:–माझं दैवच खोटं. मी पांच वर्षांची नाहीं झालें तों माझी आई मेली. बरे, बाबाबरोबर खुशाल होतें, पण ह्या स्वारींत अपेश आलें आणि बाबांची व माझी चुकामुक पडली. कांहीं वडिलांची पुण्याई ह्मणून एक दिवस बाबाही भेटले. चांगल्या शूर वीरांच्या पदरीं पडलें. आतां पुन्हां ताटातुट कां व्हावी? माझं दैवच खोटं. काय काय माझ्या दैवीं हाल भोगावयाचे आहेत कोणाला ठाऊक? जानबा, तुमचे मोठे उपकार आहेत मजवर. ह्याप्रसंगीं जर तुम्ही नसता, तर माझे हाल कुत्रा खाता ना. पुरे नऊ महिने भरले माझ्याच्यानें तर आतां जागचें हालवत देखील नाहीं.

जानबा:–बाईसाहेब, आपण असें काय ह्मणतां? माझे उपकार कसले? आह्मी आपल्या पायाचे नोकर. आह्मी होतों ह्मणून तर ते तुह्माला टाकून गेले. त्यांना आमचा पक्का भरंवसा आहे कीं, आह्मी जवळ आहों तर तुमचें कांहीं कमी पडूं देणार नाहीं. आपण मात्र मनांत काय असेल तें स्पष्ट सांगत जा. अगदीं संकोच करूं नका.

जया:–संकोच करून करायचें काय? मी आतां अगदीं अडलें. आतां माझे मायबाप, गणगोत, आप्तमित्र, सगळे अधिकार तुमचेकडे आले आहेत. तुम्ही आतां माझं बाळंतपण करणार ना?

जानबा:–जो प्रसंग येईल तो पार पाडला पाहिजे, पण ह्या कामांत मी अगदींच अजाण पडलों आणि आपली ही पहिलीच खेप. कोणी बायकोमाणूस आणून ठेऊं कां जवळ?

जया:–आतां माझें ऐकतां ? बाईमाणूस येथें आणण्यापेक्षां आपणच माणसांच्या वस्तींत जाऊन रहावें हें उत्तम. कोणत्या वेळेस काय प्रसंग येईल ह्याचा नेम नाहीं. आज दोन महिने तिकडची वाट पाहिली. आतां येथें जंगलांत रहाणें अगदीं वेडेपण आहे. आतां दीडदीड रुपयांचे दोन काळे बांड मजकरतां आणा, आणि तुम्ही आपल्याकरितां दोन पंचे आणि एक मुंडासं आणा. मी तुमची बहीण आणि तुम्ही माझे भाऊ. ह्या बतावणीनें एखाद्या खेडेगांवांत राहूं. बाज ह्मणा, पाळणा ह्मणा, गोधडी ह्मणा, शेगडी ह्मणा, काय काय लागेल नि काय काय नाहीं. तुम्ही येथें काय काय आणणार ? देवा, कायरे प्रसंग आणलास ? माझ्या बाळंतपणाची काळजी मला करावी लागावीना? ह्या वेळेस मायेचं कोणी वडील मनुष्य देखील मजजवळ नसावंना? (रडूं लागते.)

जानबा:–हं; डोळ्याला पाणी आणूं नका. मी तुमचं काडी इतकं देखील उणं पडूं देणार नाहीं. तुम्ही बिलकुल काळजी करूं नका. मी आजच्याआज सर्व सरंजाम आणून तुमच्या ह्मणण्याप्रमाणें तुह्मांला माणसांच्या वस्तींत नेऊन ठेवतों, मग तर झालं ना ? येथून जवळच झरोली नांवाचं खेडेगांव आहे, तेथें नेतो. तेथें चांगल्या पोक्त बायका आहेत. (जातो.)

जया:–जा, पण लौकर याह्रो.

प्रवेश चवथा.

स्थळ—सातारा येथील राजदरबार.

पात्रें.

महाराजः—सातारा येथील छत्रपती राजेसाहेब.

प्रधानः—सातारकर महाराजांचें मुख्य प्रधान.

(कचेरी भरली असतां जयवंतराव येऊन मुजरा करतो.)

महाराजः—बसा; जयवंतराव, आपण इतके दिवस होता तरी कोठें? भाऊसाहेबांच्या स्वदस्तुरच्या पत्रांत एक वेळेस तुम्ही मोठा जय मिळविल्याचें लिहून आलें होतें.

जयवंतरावः—आपल्या पायाच्या कृपेनें एक दिवस तसेंच चांगलें बहारीचें यश मिळालें, यांत कांहीं संशय नाहीं. विश्वासराव मोहित्यांचीही पण कुमक ऐन प्रसंगाच्या वेळेस मिळाली त्यामुळें पूर्ण यश मिळालें. शत्रू पक्षाकडील लोक अगदीं भिऊन गेले होते. पण—

महाराजः—पण, काय? तें आह्मांस सर्व समजलें आहे. त्याजविषयीं तुम्ही कांहीं एक सांगायला नको. अहो तुमच्या सारखे आणि विश्वासरावासारखे विश्वासू, स्वामिनिष्ट आणि एक दिलानें लढणारे जर त्या स्वारींत सगळे लोक असते, तर काय मगदूर आहे कीं, अपयश आलें असतें. पण ज्यांच्याकडे त्या स्वारीचें अधिपत्य दिलें होतें, त्यांना खुद आमची सत्ता देखील

कस्पटासारखी झाली होती. आणि जे नांवाजलेले मुख्य मुख्य सरदार ह्यांना मोठी घमेंडी झाली होती कीं, काय ते लढवय्ये आह्मी. गर्वाचें घर खाली! शिवाय आपसांत भांडणें. कोठून यश मिळणार? झालें तें अगदीं बरोबर झालें. ईश्वराच्या घरीं न्याय आहे.

जयवंतराव:—एकूण खावंदास सर्व जाहीर आहे तर?

महाराज:—जाहीर? त्या स्वारींतील प्रत्येक मनुष्य कसा वागत होता, हें आह्मास माहीत आहे. आम्ही केवळ भाऊसाहेबांच्या पत्रावरच बसलों नव्हतों. किती तरी गुप्त हेर ठेविले होते! रोजची खबर होती रोजची. एक फौजेची दाणादाण झाल्यावर मात्र आम्हास खबर मिळत नाहींशीं झाली. तरी अजून देखील दहा वीस असामी आमचे तिकडे फिरत आहेत. त्यांचें काम इतकेंच कीं, आपल्या लष्करापैकीं लाचारीमुळें कोणी कोठें छपून राहिला असेल अगर कोणी आजारी पडला असेल; किंवा कोणाजवळ परत येण्यास पैका नसेल; त्यास आमच्या मनुष्यांनीं द्रव्याची मदत करून स्वदेशीं घेऊन यावें.

जयवंतराव:—महाराजांचा स्वभाव फार दयाळू आहे. असा कोण शोध करणार?

महाराज:—हें आमचें कर्तव्य आहे. तुमचा आणि विश्वासरावाचा शोध करण्याविषयीं तर त्यांस विशेष ताकीद आहे. पण तीन खेपा त्यांच्या झाल्या तरी त्यांस तुमचा पत्ता लागला नाहीं. तुम्ही होतां तरी कोठें?

जयवंतराव:—मी, जानबा आणि एसबा, असे तिघे गोसाव्याच्या रूपानें एका जंगलांत राहिलों आहोंत. विश्वासराव माझे सासरे झाले आहेत. त्यांची कन्या ह्मणजे माझें कुटुंब व हिनें हल्लींच्या प्रसंगांस ओळखून गोसावणीचें सोंग घेतलें आहे. आणि त्यांत ती गरोदर आहे. तिला त्या दोघांच्या हवालीं करून त्यांसही न कळवितां मी ह्या पायांच्या दर्शनाकरितां येथें आलों.

महाराज:—मग तुमचें काय म्हणणें आहे?

जयवंतराव:—जशी महाराजांची आज्ञा.

महाराज:—तरी पण?

जयवंतराव:—तरी पण काय? ह्या स्वारींत अपयश आल्यामुळें अंगाची कशी आग होऊन राहिली आहे. जर विश्वासराव भाऊसाहेबांच्या शोधाकरितां पुन्हा गेले नसते, तर आम्ही तिकडच्या तिकडे फौज जमा करून आपला हुकूम घेऊन शत्रूची खोड मोडून मग ह्या पायापाशीं तोंड दाखवायला आलों असतों.

महाराज:—शाबास, वीरा शाबास: तुमच्या नावाप्रमाणें तुह्मीं जय मिळविणारे जयवंतरावच आहांत. बरें, मग पुढें?

जयवंतराव:—जसा महाराजांचा हुकूम होईल तसें. बाकी तिकडल्या प्रांतांत उदेपूर, जयपूर, जोधपूर येथील राजे आपणांस अनुकूल आहेत. त्यांच्यावर आपले उपकार आहेत. पण आज मितीला उघडपणें आश्रय

देण्याला मात्र कोणाची हिम्मत होत नाहीं. आह्मी जंगलांत वेष पालटून पडलों आहों. इकडून थोडेंसें सैन्य घेऊन पुन्हां तिकडे गेलों, तर ते सगळे लोक आपले आहेत असें समजा. चढत्या स्वारीनिशीं फत्ते मिळवून पायापाशीं दाखल होऊं.

महाराजः—बरें, हल्लीं ज्यांनीं दिल्लीचें अधिपत्य मिळविलें आहे, ते लोक कसे आहेत? व प्रजा त्यांस खुषी आहे कीं नाखुष आहे ?

जयवंतरावः—ते इतर जातीचे आणि परधर्माचे पडले इतकेंच. बाकी, त्यांचा जूट काय? त्यांचें शूरत्व काय? त्यांचा किती इमानीपणा ? प्रजेला पोटच्या पोराप्रमाणें संभाळीत आहेत. प्रजेला यत्किंचितूही दुःख नाहीं. कित्येक पठाण लोक एखादेवेळेस स्त्रियांच्या संबंधानें अनन्वित कर्में करतात, पण बादशहाच्या नजरेस येण्याची खोटी, कीं त्यास शिक्षा झालीच. आपले निंबाळकर वगैरे कांहीं लोक त्यांच्या हातीं लागले आहेत. त्यांना त्यांनीं एका शब्दानें देखील दुखविलें नाहीं. त्यांची बरदास्त उत्तम रितीनें ठेविली आहे. आणि—'स्थीर स्थावर झालें ह्मणजे आह्मी तुह्मांला सोडून देऊं. मग पाहिजे तर तुम्ही आमच्या आश्रयास रहा अगर पाहिजे तर आपल्या मुलखांत जा.'—असें त्यांस त्यांचें सांगणें आहे.

महाराजः—वाहावा ! असे जर ते नीतीनें वागत असले तर ईश्वरानें त्यांस यश दिलें, ह्यांत गैर काय झालें ?

जयवंतरावः—पण ते परके ना ?

महाराजः—जयवंतराव, ही तुमची चूक आहे. ईश्वराच्या घरीं न्याय आहे. सर्व ईश्वराच्या घरीं सारखे आहेत. तेथें जात नाहीं, वय नाहीं, कोणाचा पक्षपात नाहीं, आपल्या सरदारांची नीति बिघडली, त्यांनां गर्व झाला, ह्मणून त्यांना अपयश दिलें. त्यांची नीति उत्तम आहे. प्रजेला दुःख देत नाहींत, नीतिधर्माचें संरक्षण करतात, तेव्हां त्यांना यश दिलें, ह्यांत कांहीं गैर नाहीं. एका आई-बापाचीं मुलें, पण वडील मुलगा जर अनन्वित कर्मे करूं लागला तर प्रत्यक्ष आईबापच त्याला हाकलून देऊन कनिष्ठ मुलाच्या ताब्यांत किल्लया देतात कीं नाहीं? तोच न्याय येथें. उद्यां तेच लोक अनन्वित कर्मे करूं लागले तर त्यांना पदच्युत करून दुसऱ्याच्या हातीं अधिपत्य देण्याला परमेश्वराला कितीसा उशीर लागेल?

जयवंतरावः—तर मग काय, त्यांना खुशाल आपल्या देशांत राज्य करूं द्यावें?

महाराजः—अलबत! खुशाल करूं द्यावें. जोंपर्यंत त्यांची नीति उत्तम आहे, तोंपर्यंत उलटी आपण त्यांस मदत करावी. तुमच्यासारख्यांनीं त्यांची नोकरी करावी. कोणीकडून रयतेला दुःख देऊं नये. विनाकारण रक्तपात करण्यांत हांशील काय? ज्यावेळेस त्यांजपासून प्रजेला दुःख होऊं लागेल, ज्यावेळेस त्यांची नीति बिघडेल, त्यावेळेस एखाद्या फाटक्या मनुष्याच्या अंगांत सुद्धां प्रत्यक्ष ईश्वर संचार करील आणि त्याजकडून प्रजेचें पालन करवील. असे थोर विचार

मनांत वागवा. दुष्टांचा संव्हार करणें आणि चांगल्याला यश देणें, हे त्या जगन्नियंताचे रोजचे खेळ आहेत. इतक्या धामधुमींत परमेश्वरानें तुह्माला वाचविलें आणि जंगलांत तुमच्या विवाहाचा योग जमवून आणला, हें कृत्य कोणाचें? हें तुमच्या सद्गुणाचें फळ परमेश्वर तुह्माला देतो आहे.

जयवंतराव:–महाराजांचे विचार फार खोल आहेत.

प्रधान:–आणि खरोखर अनुभवास येणारे आहेत.

जयवंतराव:–माझें अनुमान चुकीचें झालें. मला असें वाटलें होतें कीं, अपयश आल्याबद्दल जर आह्मांस इतकें वाईट वाटतें आहे, तर महाराजांना अत्यंत वाईट वाटलें असेल; पण जेथें विचारसमुद्र भरला आहे तेथें–

महाराज:–नाहीं, आह्माला वाईट वाटतें. नाहीं असें नाहीं. हें आजपर्यंत तुमचा पत्ता नव्हता; वाईट वाटत होतं. विश्वासरावाचा पत्ता नाहीं, वाईट वाटतं आहे. पण करावयाचें काय? खेद करीत बसावयाचें नाहीं. आपलें कर्तव्य करावयाचें. उद्योगांत कमी करावयाचें नाहीं. हें तुह्मीं जंगलांत कुटुंबांस टाकून आलां आहां, वाईट वाटतं. अगदीं अविचार हा! एखादा चाकर युक्तीनें इकडे पाठवावयाचा होता, ह्मणजे हरतऱ्हेनें डोलींत घालून आणविण्याची तजवीज केली असती. गरोदर स्त्रीला जंगलांत टाकून येणें हा कोण वेडेपणा? खर्चाची कमतरता असेल तर घेऊन जा. आणि धास्तीसारखें असेल तर कांहीं लोक बरोबर घेऊन जा,

आणि कुटुंबास घेऊन या. विश्वासरावाचा पत्ता लागेल असा यत्न करा. प्रधान, ह्यांची शिरस्त्याप्रमाणें तजवीज लावा.

प्रधानः—कोण आहेरे तिकडे? पोषाक आणा.

(एकजण पोषाक घेऊन येतो. पगडी, शालजोडी, तरवार. जयवंतरावास बक्षीस देतात. ती घेऊन)

जयवंतरावः—महाराजांची पूर्ण कृपा आहे तर कांहींएक कमी नाहीं. (हात जोडून) आज हे पाय दृष्टीस पडल्यावर आनंदानें हृदय कसें भरून गेलें? थोर ते थोर! गादीचा प्रतापच चमत्कारिक आहे. महाराजांच्या तोंडचीं भाषणें ऐकून मनाची हुरहुर नाहींशीं झाली, आणि हृदय कसें प्रसन्न झालें आहे.

एसबाः—(एकदम आंत येऊन) घात झाला हो घात झाला. आपण तेथून निघाल्यावर मी आसपास आपला पुष्कळ शोध केला, पण पत्ता लागला नाहीं. मग परत गेलों. तों तेथें जानबाही नाहीं आणि बाईसाहेबही नाहींत. तेव्हां कल्पना चालवून, इकडे धांव ठोकली.

जयवंतरावः—आं! काय, ह्मणतोस काय? अरेरे! बिचारीला काय वाटलें असेल? महाराज ह्मणाले तें खरें. शुद्ध वेडेपण हें. पण एक बरें आहे. जानबा तिच्या बरोबर आहे. दिवस पूर्ण भरले आहेत, ह्मणून अम्मळ काळजी वाटते.

महाराजः—जा, अगोदर तिचा शोध लावा. अशा स्थितींत तिला तुह्मीं सोडून आलांत हा अत्यंत वेडेपणा केलात

लागेल तें खर्चावयाला न्या, हवी ती मदत घेऊन जा, आणि ताबडतोब शोध लावा. प्रधानजी, ह्यांची रवानगी आजच्याआज करा.

प्रवेश पांचवा.

स्थळ—झरोळी खेडेगांव. कुंभाराचें घर.

पात्रें.

(गरीब मराठ्याच्या वेषानें जयाबाई आणि तिचा मुलगा बाळासाहेब व (विश्वासू सेवक) जानबा.)

जया:—जानबाराव, असे अज्ञानवासांत किती दिवस काढावयाचे? आतां आपण ह्या खेडेगांवांतच राहिलों, तर ह्या बाळाची वाट काय होणार? तुह्मी सातार्‍यापर्यंत जाऊन देखील आलांत आणि मला आशेच्या गोष्टी सांगितल्यात कीं, ते महाराजांना भेटून आले व त्यांच्याबरोबर एसबा देखील असून आपल्याच शोधाकरितां ते इकडे निघून आले. त्या आशेवर मी इतके दिवस काढले, पण आतां धीर निघत नाहीं. मी आपल्या जिवाचं भलतं सलतं करीन असं तुह्माला वाटल्यावरून, आशेचा अंकुर उद्भवेल अशी तुह्मीं मला गोष्ट सांगितलीत इतकेंच. दुसरा तर मला यांत कांहीं अर्थ दिसत नाहीं. पण तुह्माला असें वाटतें काय? कीं, मी इतर अडाणी बायकासारखी आत्महत्या करीन?

छे! छे! अशी गोष्ट माझ्या हातून काळत्रयी घडणार नाहीं. जें काय असेल तें खरें सांगा.

जानबाः–मी आपल्या पायाशीं खोटें बोलेन कां? मी खरोखर शपथ घेऊन सांगतों, कीं ते आणि एसबा दोघेही आपल्या शोधाकरितां ताबडतोब ह्या प्रांतांत आले. जयवंतराव महाराजाची तिकडे केवढी बडेजाव झाली! दरबारांत पगडी, शालजोडी, तरवार असें त्यांस बक्षीस मिळालें. महाराजांनीं त्यांच्या पदरांत, आपणास टाकून गेल्याबद्दल वेडेपण बांधलें, मला देखील रागे भरले कीं, त्याचा पत्ता नाहीं तर नाहीं; पण तूं बाळ-बाळंतिणीस घेऊन इकडे यावयाचें होतेंस? मी तुह्माला तिकडे नेऊन पोंचवूं काय? तेथें ह्या राजबिंड्याचं शिक्षण देखील चांगलं होईल. तुमच्यावर सरकारचा फार लोभ आहे.

जयाबाईः–(मुलाकडे पाहून.) येतोसरे बाळा, महाराजांकडे?

बाळासाहेबः–कोणते महाराज? मीच महाराज आहे. मला सगळीं मुलें महाराज महाराज ह्मणतात. मी तुला महाराजासारखा पट्टा खेळून दाखवूं? (लाकडाची तरवार पट्ट्यासारखी फिरवून दाखवितो.)

जानबाः–खरेंच हो. छोटे महाराज, तुह्मी महाराजच आहांत. तोंडवळा कसा अगदीं थेट जयवंतराव महाराजां-सारखा आहे.

जयाबाईः–(मुलाला जवळ घेऊन मुका घेते) तुझें कौतुक पहावयाला येथें असावयाचें नाहीं! (रडते व डोळे पुसते.)

बाळासाहेबः–आई हें काय बरं? तूं रडतेस कां पण?

जानबाः–तुमचे बाबा येथें नाहींत तुमचें कौतुक पहायला, ह्मणून त्या रडतात.

बाळासाहेबः–हात्तिच्या ह्मणून कां तूं रडतेस? आतां तर ही लाकडाची तरवार आहे. मी मोठा झाल्यावर त्यांना खरोखरीच्या तरवारीनें पट्टा खेळून दाखवीन. मग तर झालेना?

जानबाः–दाखवा बरं सरकार. बाईसाहेब आज ह्याची दृष्ट काढा बरं! असतील बाळ तर फेडतील काळ. तुह्मी हा राजबिंडा इतर मुलांसारखा नका समजूं. हा प्रति महाराज आहे प्रति महाराज.

जयाबाई–बरं, तें असूं द्या. आपलें पहिलं बोलणं तसंच राहिलं. आतां अशा दीनस्थितींत स्वदेशी तर जावयाचं नाहीं. दैवाचे पुरे खेळ पहावयाचे. हा मुलगा मोठा होईतोंपर्यंत ह्याच मुलखांत रहावयाचं. मग जें व्हायचं असेल तें होईल. पण आतां एक करावं. ही कुग्रामवस्ती सोडावी, असं माझ्या मनांत आलं आहे. आपण ह्या उदेपूरच्या राजाची कीर्ति फार चांगली ऐकतों. मी मर्दानी पोषाक करून त्याजकडे नोकरी पतकरीन. आणि तेथें आपण राहूं. तुह्मी माझे आश्रित आहांतच. असं केलं, तर मुलाची कांहीं सोय होईल हो. आतांपासून जर त्याला शिक्षण चांगलं असलं, तर घोड्यावर बसणं, दांडपट्टा खेळणं, वगैरे गुण येतील. येथें खेडेगांवांत काय होणार आहे?

जानबा:—आपण काढली आहे ही मसलत ठीक आहे. तसं करायला माझी ना नाहीं. पण मी तुह्माला सांगतों, माशाच्या पोराला पोहायला शिकवावं लागत नाहीं. तें आपोआप पोहूं लागतं. हाही राजबिंडा आहे. होईल पुढें. आपल्या वडलांच्या वळणावर जायचाच. आतां इतक्या लहान वयांत आपण ह्याला घेऊन शहरांत गेलों, तुह्मी मर्दानी वेषही घेतलात, तरी हें बाळ तुमची बातमी गुप्त ठेवील? हें पट्कन् आई ह्मणून ह्मणेल, आणि तुमच्या गळ्यांत मिठी घालील. कधीं चुकायचं नाहीं. लेंकरूं तें! विनाकारण आपली फजीती मात्र होईल. ही मसलत कांहीं माझ्या पसंतीस येत नाहीं.

जयाबाई:—त्याची तुह्माला बिलकुल काळजी नको. मी इतकी का वेडी आहे? आपल्या हातानें आपली फजिती करून घेईन?

जानबा:—तर काय? ह्या मुलाला तुम्ही शिकवलंत आणि समजून सांगितलंत, ह्मणजे हा चिप् बसेल? भलतंच कांहीं तरी बोलावं झालं! मी आपल्याला नांव ठेवतों असं नाहीं. मी आपल्या आज्ञेबाहेर वागेन असेंही नाहीं. मी आज आपणाला मर्दानी आणि उत्तम सरदारी पोषाक आणून देतों, पण हें तुमचं अतिशय उतावळेपण आहे. मुलाला अम्मळ मोठा होऊं द्या.

जया:—छे! छे! मोठा झाल्यावर तो बिघडलाच असं समजा. मग झालाच निरुपयोगी. लहानपणीं जें काम साधतें, तें मोठेपणीं कधीं साधावयाचें नाहीं. मला

माझ्या बापानें पाचव्या वर्षापासून घोड्यावर बसावयाला शिकवलं.

जानबाः—बाईसाहेब; आपण ह्मणतां, तें सर्व खरं. पण ह्या कामांत आपण फसाल बरं. मी आतां मात्र उघडपणें बोलून दाखवितों. किती शहाण्या झाल्या तरी बायकाच त्या. त्या उतावळेपणानें फसावयाच्या, असें जें ह्मणतात, तें खोटें नाहीं. (हसल्यासारखें करून) हें पोर चिप् बसेल? कशाला नांव घेतां?

बाळासाहेबः—(खेळतां खेळतां आईकडे येऊन.) आई, पण मला खरंच सांग. मला खरोखरीची तलवार कधीं देशील?

जानबाः—(विनोदानें) ती तुमची आई नाहीं हो. ते तुमचे बाबा आहेत बाबा, बरें.

बाळासाहेबः—आंऽ, मला खोटं सांगून फसवतां कां? मी फसावयाचा नाहीं हो. माझे बाबा दूर गेले आहेत. खरं ना ग आई? ही माझी आई. अं! अं! अं! अं! आई, मला खरोखरीची तरवार दे, अं!

जयाः—देईन बरं बाळा. तुला चांगली सोन्याच्या मुठीची तरवार देईन. जा खेळ जा तिकडे. (बाळा जातो.)

जानबाः—ह्या बाळाला तुम्ही आपल्याला बाबा ह्मणायला शिकवणार व हा तुमचं ऐकेल? शुद्ध वेडेपणा आहे हा. बे अदबी माफ करा. (हात जोडतो.) तोंडांतून भलताच शब्द निघून गेला, ह्याची दिलगिरी वाटते. (मनाशीं.) बायकांचा स्वभावच उतावळा!

जया:–वा! हात नको कांहीं जोडावयाला. तुम्ही स्पष्ट बोलतां ह्याचा मला मोठा आनंद वाटतो. तुम्ही माझी मसलत पुरती ऐकून तर घ्या. उतावळेपणा करूं नका.

जानबा:–(मनाशीं) उलटें, ह्याच मला उतावळेपणा करूं नका ह्मणतात. (उघडपणें) हं बोला मी ऐकतों.

जया:–तुम्ही मजकरितां एक मर्दानी पोषाक आणा, तुमच्याकरितां तुम्ही पण एक साधा पोषाक आणा आणि ह्या बाळाला पण एक चांगला शोभेसा पोषाक आणि एक छोटेखानी तलवार आणा. ह्याला झोंप लागली आहे असें पाहून, मी तो पोषाक करीन, आणि हा जागा झाल्याबरोबर मी बाहेरून येईन. तुम्ही त्याला तुझे बाबा आले ह्मणून सांगा. मी त्याला त्याजकरितां आणलेला पोषाक आणि तरवार देईन. ह्मणजे त्या आनंदांत तो असेल. दोनचार वेळां आईची आठवण काढील तर मी जवळच आहे. सांगेन त्याला कांहीं तरी समजून.

जानबा:–आहे खरी नोवा अक्कल. अक्कल उत्तम आहे. बायको माणूस असून अक्कल पण अक्कल. काय पण होईल नक्कल! ठीक आहे. आतां कांहीं आमचें बोलणें नाहीं. मी आज पोषाक आणतों. (जातात.)

प्रवेश सहावा.

स्थळ—अरवलीच्या डोंगराजवळ. (जंगल.)

जयवंतराव:—(मनाशीं.) आतां आणखी शोध कसा करावा? आपली तर शिकस्त झाली. आसपासचीं एकुणएक खेडीं पाहिलीं. मोठमोठ्या शहरांतून भिकाऱ्याच्या वेषानें जाऊन शोध केला, तरी प्रियेचा किंवा जानबाचा बिलकुल पत्ता लागत नाहीं. छे! छे! मी फार वाईट केलें. मी विनाकारण तिच्याशीं कपट केलें. मी सांगून गेलों असतों, तरी बरें झालें असतें. तिच्या मनांत मजविषयीं काय बरें आलें असेल? मी दुष्ट, मी महा घातकी, मी महा चांडाळ, असें तिनें ठरविलें असेल. पण तिच्याकरितां मी धाय धाय रडतों आहे, आणि तिच्या करितां जंगलों जंगल हिंडतों आहे, ही कल्पना तरी तिच्या मनांत आली असेल काय?—एखाद्या खेडेगांवांत प्रसूत होईतोंपावेतों तूं जानबाजवळ रहा.—असें सांगून एसबास घेऊन राजरोस जरी मी गेलों असतों, तरी ती दुराग्रहांत पडती ना. मी येईपर्यंत तेथेंच वाट पहात राहिली असती. पण अगोदर बुद्धि जाते आणि मग भांडवल जातें, असें ह्मणतात, तें खोटें नाहीं. मी आपल्या मूर्खपणानें प्रियस्त्री व विश्वासू चाकर गमावला. तिनें आत्महत्या तर केली नसेल ना? छे! पण जानबा जवळ आहे. तो कधीं तिला तसें करूं देणार नाहीं. हरतऱ्हेनें तिची समजूत करील. पण तोच मेलाबिला असेल तर? छे! वेड्या मना,

असे भलभलते संशय नको काढूंस. अरेरे! इतकें का मन बिघडून जावें? तस्मात् हेंच खरें.

पद.

(चाल—दोदिवसाची तनु.)

सुशील स्त्रीशीं कपट करी जो त्याला ती स्त्री अंतरते।
रानोरानीं भटके तो नर त्याचें मन दुःखित होतें॥
संसाराला मुकतो सहजीं वेडेपण पदरीं येतें।
न सुचे धंदा त्या मतिमंदा जयवंता अपयश येतें॥ सुशील०

(इतक्यांत एसबा येतो.)

एसबाः—आज थोडासा शोध लागला आहेसा वाटतो बोवा.

जयवंतरावः—सांग, सांग, कसा कसा तो?

एसबाः—आपण चुकलों. गोसावीण आणि गोसावी असा शोध करीत गेलों हें बरोबर केलें नाहीं.

जयवंतरावः—तर मग?

एसबाः—त्यांनीं आपला पूर्व वेष धरला असावा असें वाटतें. अहो ह्या शेजारच्या झरोली गांवांतच बाईसाहेब बाळंतीण झाल्या.

जयवंतरावः—काय येथें?

एसबाः—होय. मुलगा झाला आहे, मुलगा.

जयवंतरावः—हां! धन्य ईश्वरा तुझी! जानबा आहेना बरोबर?

एसबाः—बरोबर जानबा आहे. जातीचा मराठा असें त्यानीं तेथें सांगितलें होतें, पण पंध्रा दिवस झाले तेथून गेल्याला.

जयवंतरावः—(हवालदील होऊन) अरेरे! दुर्दैवाचा फेरा अजून संपला नाहीं वाटतं?

एसबाः—बाळंतीण होण्याकरितां, बाज आणली होती ती बाज, पाळणा, चिरगुटें, सर्व त्या कुंभाराला देऊन टाकलीं. त्या सरंजामांत मी जानबारावच्या खडावा आणि आपला चिमटा ओळखला.

जयवंतरावः—तर मग तीच ती. कोणी भिकारी असता तर कधीं देतां ना, विकून टाकता.

एसबाः—खचित् जानबारावच तो. आणि बाईसाहेबच त्या. सगळ्या खाणाखुणा जमतात. मुलगा फार चांगला आहे ह्मणतात. त्याला तेथले लोक महाराज ह्मणत असत.

जयवंतरावः—मग संशय कसचा राहिला? सुखी असो. पण पुढें पत्ता कसा लागतो? ते कोठें गेले? काय? वगैरे चौकशी केलीस कां नाहींस?

एसबाः—चौकशी केली तर. त्यांनीं सांगितलें कीं, घरीं मुलखांत कांहीं जायचे नाहींत. नवऱ्यावर ती बाई रागावली आहे ह्मणाले. नवरा भेटेल तेव्हां मुलखांत जाणार. तोंपर्यंत इकडेच कोणाची नोकरी चाकरी पतकरून रहाणार.

जयवंतरावः—एकूण ह्याच मुलखांत रहाणार ना? ठीक आहे. आम्ही पण आतां हा मुलूख सोडीत नाहीं. तिला घेतल्यावांचून मुलखांत जावं कसं? महाराज काय ह्मणतील? आतां आपणही कोठें नोकरी पाहिली पाहिजे. महाराजांची आज्ञा आहेच. आज जीव अम्मळ थंडा झाला. पण आतां एक कर. कांहीं चांगल्या गळ्याचीं पोरें तयार कर. आणि त्यांना मी सहजीं आतां

ह्मटकेल्या पदाचीं हीं दोन कडवीं शिकव, आणि त्यास देशोदेशीं भीक मागण्याच्या निमित्तानें पाठव. त्याजबद्दल त्यास चांगला पगार देऊं कर. ह्मणजे कधीं ना कधीं प्रियेचा पत्ता लागेलच. ह्यांत एक मोठी खुबी सहज येऊन गेली आहे. जयवंता, हा शब्द फारच चांगला जडला गेला. इतर लोकांना ह्या शब्दाचें कांहीं महत्व वाटणार नाहीं, पण जर माझी प्रिया किंवा जानबा अगर विश्वासराव ह्यांपैकीं कोणीं हें पद ऐकलें तर मग त्यांना हें पक्कें झोंबेल. माझी खरी स्थिति त्यांना समजेल; आणि मग ह्या पोरांच्याच द्वारें आपणास त्यांची खबर लागेल. पण हीं पोरें आपण पाठविलीं असें त्यांनीं कोणापाशीं बोलूं नये. जो ह्या पदाच्या संबंधानें विशेष चौकशी करील त्याची मात्र खबर ह्यांनीं ताबडतोब आपणांस द्यावी. धर्मशाळा, देऊळ, चव्हाटा, अगदीं एकूणएक घर त्यांनीं हिंडत असावें. त्यांनीं आमच्या घरींही त्याच वेषानें यावें.

एसबाः—ठीक आहे. करतों तयार. तें काम मजकडे लागलें.

जयवंतरावः—ही एक व्यवस्था लागली. आतां आपण दिल्लीपत बादशहाकडे नोकरी मिळेल अशी कांहीं तजवीज केली पाहिजे. चला आतां त्या उद्योगाला लागावें.

अंक तिसरा.

प्रवेश पहिला.

स्थळः—उदेपूर येथील राजदरबार.

पात्रें.

रणधीरसिंगः—उदेपूरचा राजा.
प्रधानः—उदेपूरच्या राजाचा प्रधान.
मानसिंगः—उदेपूरच्या राजाचा सेनापति.

रणधीरसिंगः—प्रधान, नित्यशः रयतेचीं किती दुःखें ऐकावीं? काय ह्मणे—आज आमच्या गांवीं दरोडा पडला, काल फलाण्याचें घर लुटलें, पर्वां धर्मशाळेंतील यात्रेकऱ्यांवर धाड घातली, एरवां काय तर लूट चांगली मिळाली नाहीं ह्मणून सगळा गांवचा गांवच दरोडखोरांनीं जाळला! काय अनर्थ हा! तुमच्या हातून बंदोबस्त होत नसला तर तसें स्पष्ट सांगा. मी स्वतः त्यांचा बंदोबस्त करतों, अशी हयगय काय कामाची? रयतेचा प्रतिपाळ आपल्या पोराप्रमाणें केला पाहिजे.

प्रधानः—हुजूर सरकार, आपणाला असें वाटतें काय, कीं सेवकांकडून अशा कामीं हयगय होते? पण करावें काय? हे दरोडखोर फार वस्ताद आणि पक्के बिलंद! आज येथें तर उद्यां येथून दहा कोसांवर; पर्वां ती दिशा सोडून तिसऱ्याच ठिकाणीं! त्यांचा पाठलाग करतां करतां सरदार थकून गेले! नुकतें पर्वांच मी त्यांस

सहज अम्मळ लावून बोलल्यावरून प्रत्यक्ष सेनापति देखील स्वतः जाऊन आले; पण त्यांचा कांहीं मागमूस देखील लागला नाहीं.

रणधीरसिंगः–ठीक, ठीक! एखादें परचक्र आलें तर सातारकर महाराजांची मदत मागावयाची; ती आतां असले दरोडखोर पडकण्याला मदत मागत जा. आपण स्वतंत्र संस्थानिक ह्मणवीत आहों, ह्याची कांहीं लाज असूं द्या. लोक काय ह्मणतील? आपल्या राज्यांतला बंदोबस्त आपण केला पाहिजे. सेनापतीच्यानेंही ह्या दरोडखोरांचा बंदोबस्त होत नसेल तर त्यांस कामावरून दूर करा. त्यांची इतकी भीड कशाला पाहिजे?

प्रधानः–ते गादीचे जुने नोकर आहेत आणि आपल्याकडून होईल तितकी मेहनत करतात.

रणधीरसिंगः–जुने नोकर आणि नवे नोकर, तें आह्मी कांहीं समजत नाहीं. एक तर त्यांनीं दरोडखोर पकडावे नाहीं तर जागेचा राजीनामा द्यावा.

प्रधानः–(सेनापतीकडे वळून) ऐकलेंत? येथें तुमच्यामुळें आह्माला बोलणीं खावीं लागतात.

मानसिंगः–(पुढें होऊन) खावंद, मजकडून जेवढा बंदोबस्त होण्यासारखा होता, तेवढा मी केला आहे. चौकशीकरितां त्यांच्या पाळतीवर गुप्त हेर ठेविले आहेत. व चोहोंकडे लष्कराच्या टोळ्याही ठेविल्या आहेत. असें असून जर त्यांचा पत्ता लागत नाहीं, तर काय सेनापतीनें जीव द्यावा?

रणधीरसिंगः–बस बस. जास्ती बोलूं नका. तें आम्हीं कांहीं जाणत नाहीं. रयतेचें दुःख निवारण झालें पाहिजे दरोडखोर पकडले पाहिजेत. इतका आपला जीव लाड का असेल तर खुशाल घरीं बसावें.

मानसिंगः–(मनांत) आतां कोण दरोडखोर पकडून आणतात तें तर पाहूं. (उघडपणें) मर्जी सरकारची.

रणधीरसिंगः–प्रधान–आतांच्या आतां दवंडी पिटवा कीं, जो कोणी आठ दिवसांच्या आंत दरोडखोरांस पकडून आणील त्यास सेनापतीची जागा मिळेल.

प्रधानः–हुकूम सरकार.

प्रवेश दुसरा.

स्थळ–उदेपूर येथील राजमार्ग.

पात्रें.

दंवडी पिटणारः-एक महार अगर शिपाई.
गुपितरावः-पुरुष वेषधारी जयाबाई.
जानबाः-गुपितरावांचा विश्वासू नोकर.
मानसिंगः-सेनापति.
बाळासाहेब–गुपितरावचा मुलगा.

दंवडी पिटणारः–ऐकाहो लोकांनों–ऐकाहो सरदारांनों. जो कोणी हल्लींच्या माजलेल्या दरोडखोरांस पकडून देईल त्यास महाराज सरकार सेनापतीचीं वस्त्रें देतील हो-(थाळी वाजवितो.)

जानबा:–कायहो काय? कसली दंवडी?

दंवडी पिटणार:–तूं जा ना आपल्या रस्त्यानें. तुझें येथें काम नाहीं.

गुपितराव:–अरे, सांगस नाका! तुझं काय जातं त्यांत? नाहींतरी तूं दंवडी पिटवायलाच आला आहेस ना?

दंवडी पिटणार:–कोठला आला आहे कोकन्या? त्याला मी पुन्हा सांगत बसतों? त्याला गरज असेल तर तो येईल पुडल्या नाक्यावर ऐकायला. (असें बोलून पुढें चालूं लागतो).

जानबा:–(त्याच्या मागोमाग जातो) बरं बोवा पुढच्या नाक्यावर कां होईना?

दंवडी पिटणार:–ऐकाहो लोकांनों, (पुढें पूर्ववत् बोलून थाळी वाजवितो.)

गुपितराव:–(कान देऊन ऐकून) सेनापतीची जागा मिळविण्याला संधि उत्तम आहे. (जानबाकडे पाहून) जानबा हिम्मत केली पाहिजे.

जानबा:–अहो, कशाची मिळते सेनापतीची जागा? इकडे सगळे लोक थकले असतील, तेव्हां ही दंवडी बाहेर निघाली असेल. जेथें इकडल्या माहितगारांची अकल गुंग झाली, तेथें आपल्यासारख्या नवख्यांची दाद काय लागणार?

गुपितराव:–अक्कल कांहीं कोणाची वाटलेली नाहीं. आपण इकडे येण्याला आणि ही दंवडी बाहेर पडण्याला

एक गांठ पडली. शकून चांगला दिसतो. तूं बाळासाहेबांस संभाळ. मी दरबारांत जाऊन सगळा अंदाज काढून येतो.

जानबा:–जा बोवा, तुह्माला नाहीं कोणी ह्मणावं? पण तुह्माला मी सांगतों, एखादी लहानशी नोकरी पाहून निर्वाह करावा. वाढतां वाढतां आंगच्या गुणानें वाढेल तेव्हां वाढेल, तुह्मी तर एकदम आकाशाच्या चांदाला हात घालतां? नुकताच वेष पालटला आहे. इकडला रीतरिवाज तर कळूं द्या. इकडली माहिती तर होऊं द्या.

गुपितराव:–अरे तूं थांब, हिम्मत मर्दा तो मदत खुदा. तूं मौज तर पहा. आज बाहेर पडते वेळेस शकुनच चांगला झाला होता.

मानसिंग:–(एकदम पुढें येऊन) कोन हैरे तुम लोक?

गुपितराव:–हम सतारेके तरफके रहनेवाले है.

मानसिंग:–आपका नाम क्या?

गुपितराव:–मेरा नाम गुपितराव. क्यंव, आप क्यंव पूछते हो?

मानसिंग:–नहीं मैं सेहेज पूछता हूं. आपसमें क्या बात चल रही थी? आप क्या दरोडखोरोंकू पकडेंगे?

गुपितराव:–हा. क्यंव न पकडेंगे?

मानसिंग:–(आश्चर्ययुक्त मुद्रेनें) बडे बडे थक गये! ह्यांके दरोडखोर बडे हरामी है. ह्यांका सेनापति इस मुलुकका माहितगार होके उसकी चालाखी देखके

थक हो रहा है, और ऐसे दरोडखोरोकू आप क्या पकडेगे? चलो आप आपना रस्ता सुधारो.

गुपितराव:—आप कोन हो?

मानसिंग:—मैं एक सरदार हूं.

गुपितराव:—इस काममें आप थोडी मदत करोंगे?

मानसिंग:—तुम क्या दिवाने हो?

गुपितराव:—नहीं. मै सच कहता हूं के मुझकू एक पचीस सवारोंकी मदत मिळेगी तो मै सब दरोडखोरोकू पकडके दरबारमें हजर करूंगा.

मानसिंग:—अरे जा दिवाने, तेरे मू परसे मालुम होता है के, तुम क्या करोगे? (एक्या बाजूस तोंड वळवितो.)

जानबा:—चला हो तुम्ही. ते तुह्माला ओळखतील नाहीं तर. अहो, त्यांच्याजवळ तरी जाऊं नका.

गुपितराव:—(नाकावर बोट ठेवून चिप करतों.)

जानबा:—(हात धरून बाजूस करतो व मोठ्यानें बोलतो.) बाळासाहेबास भूक लागली आहे. कोठें तरी बिऱ्हाड लावून त्यास खायला दिलें पाहिजे अगोदर.

गुपितराव:—तूं जा बाळासाहेबास घेऊन, आणि दक्षिण दरवाजाच्या धर्मशाळेंत उतर. मी दरोडखोर पकडण्याची मिसळ जमवून येतों.

जानबा:—ठीक आहे. (बाळासाहेबास घेऊन जातो.)

गुपितराव:—चला, आपण पण जावं आपल्या उद्योगाला. (जातो.)

प्रवेश तिसरा.

स्थळ—राजमार्ग.

पात्रें.

गुपितराव:—पुरूष वेषधारी जयाबाई.
दंवडी पिटणारा:—एक महार, अगर शिपाई.

गुपितराव:—(मनाशीं) मोठ्या यत्नानें रणधीरसिंग महाराजांची भेट तर घेतली व आपली युक्ति त्यांच्या मनांत बिंबवली. पंचवीस मेणे मिळण्याची तजवीज केली आहे. आतां पंचवीस मेण्यांचे नुसते भोई ह्मटले, तरी शंभर हत्यारबंद स्वार माझ्या ताब्यांत आले. बघतों आतां दरोडेखोर कसे नाहीं सांपडत ते. मनुष्य करील तर काय होणार नाहीं? काय आठ दिवसांच्या आंत दरोडखोर सांपडणार नाहींत? माझी युक्ति अशी आहे कीं, आजपासून चौथे दिवशीं दरोडखोरांस मी पकडीन. दरोडखोरांच्या मागें लागून कोठें दरोडखोर सांपडतात काय? त्यांना नेमक्या ठिकाणीं आणून एकदम पकडले पाहिजे. मासे पकडायचे असले, तर त्यांना देखील अमीष दाखवावं लागतं. गुळाचा खडा मांडून ठेवला कीं, माशा तेथें यायच्याच. दरोडखोर पकडण्याला लष्कर तें कशाला पाहिजे? त्यांना डबोलं दाखवलं ह्मणजे झालं. आलेच त्याच्या पाठोपाठ! एक पंचवीस शिपाई असले कीं बस. जानबा ह्मणतो, ह्या मुलखाची, जंगलाची, दरेखोऱ्याची, माहिती आपणास झाली पाहिजे.

कशाला? ते काय तेथें अक्षयीं बसून राहतात? अशी युक्ति काढली पाहिजे कीं, ते आयतेच आपण आणूं तेथें येतील, तर हुषारी. माझी युक्ति अगदीं बरोबर बसली. आपण सांगितल्याप्रमाणें दंवडी पिटण्याचा हुकूमही झाला. (पडद्याच्या दुसऱ्या टोकांकडून दंवडी पिटणार येतो व थाळी वाजवितो आणि ऐका हो लोकांनो इत्यादि शब्द मोठ्यानें बोलतो.) (कानोसा घेतल्यासारखें करून) हें काय ऐकूं येतें बरें? हां. हा दंवडी पिटण्याचाच आवाज. आतां आपण अगोदर आपल्या बिऱ्हाडीं जावं. बाळासाहेब आणि जानबा आपली वाट पहात असतील. (जातो.)

दंवडी पिटणारः—ऐकाहो लोकांनों, आजपासून तिसरे दिवशीं मध्यरात्रीं गांवाबाहेरील चंडिकेच्या देवळांत सर्व दरकदार व सरदार लोकांच्या बायका (अरिष्ट निरसनार्थ) देवीची भक्ति (प्रार्थना) करण्याकरितां जाणार आहेत, आणि तेथेंच मीना बाजार भरणार आहे. तर त्या दिवशीं मेणे व डोल्या वाहणाऱ्या भोयांशिवाय कोणी पुरुषानें घराबाहेर पडूं नये हो! (थाळी वाजवितो आणि जातो.)

प्रवेश चवथा.

स्थळ—चंडिकेचें देऊळ.

पात्रें.

होन्या,-दगड्या,-कोंड्या,-हल्या:-दरोडखोर.
गुप्तहेर:—मानसिंगाचा बातमीदार.
गुपितराव:—पुरुष वेषधारी जयाबाई.
जानबा:-गुपितरावचा विश्वासू नोकर.
लष्करी लोक:—भोयांच्या वेषानें आलेले हत्यार-
बंद लोक.

होन्या:—(देवळाच्या आसपासच्या प्रदेशांत) सांज नाहीं झाली तोंच देवीच्या देवळांत दिवे लागले हां; पुरुष मंडळी चट सारी निघून गेली. आतां बायका येऊं लागतील बायका. आज आपला लाट आहे. ध्या बेद्यानों जन्माचं काम करून, सगळ्या बायकाच जमणार तथं. दगड्या, शिंच्या तूं नीट देवीच्या मागल्या बाजूस छपून बस. हूं कीं चूं करशील तर याद राखून ठिव.

दगड्या:—तें काम माझं. तुमी त्या कोंड्याला मात्र नीट बजावून ठिवा.

कोंड्या:—मला नको सांगायला. आजची शिकार जलमाची भाकर देनारी हाये. इक्की साधली ह्मणजे दरोड, लुट, फाट, करण्याचा धंदाच मी सोडून देनार. मंग मजसारखा राजा कोनी न्हाई.

हल्या:-मनच्या मनांत मांडे खा. पकडला गेला नाहींस झंजे बरं.

होन्या:-तूं मित्राच आहेस, बायका पकडतील व्हय आमच्या सारख्या मर्दाला?

हल्या:-तसं नाहीं हो नाईक. ह्या बायकाबरोबर लष्करचे शिपाई असले तर?

होन्या:-अरे मग दंवडी काय ऐकलीस तूं? आज भोई लोकांवांचून कोनी पुरुष बाहीर फिरकायचा नाहीं.

हल्या:-तें खरं, पन याइच शंका मनांत येते.

होन्या:-ओढक्याची आली शंका? तो बघ तो एक मेणा देवळांत गेला देखील. ते भोई चिलीम फुकीत बसले बघ. आतां अगदीं चिप. आतां आपापली जागा ठरल्याप्रमाणें नीट धरून बसा, अन् मी शिवळ घातली, कीं, देवळ गाठा. अन् 'बोलो भीम' झटल्याबरोबर एकदम लुटालूट, नाकांतल्या नथीसुद्धां लुबाडा.

(देवळाच्या आसपास छपून बसतात.)

जानबा:-(प्रत्यक्ष देवळांत) मसलत फसते वाटतें. मध्यरात्रीची वेळ झाली, अजून कोणी भिल्ल येत नाहींत ते?

गुपितराव:-अरे, ते आसपास छपून बसले असतील. अगोदर आपला तर बंदोबस्त नीट होऊं द्या. आतां मी सांगतों असं करा. प्रत्येक दरवाजावर चार चार शिपाई अगदीं बेमालूम बसा. मी पूर्व दरवाजा संभाळतों. चोरटे सगळे आंत येऊं द्या, उगाच गडबड

करूं नका, मी पाळतीवर आहेच. एकदम हरहर महादेव करीन, त्या बराबर तुम्ही पण एकदम गर्दी करा. धरा, पकडा, मारा, तुडवा, बडवा, अर्ध मेले करा! कोणाचा जीव न जाईल इतकी मात्र खबरदारी ठेवा. कोणी तावडींतून निसटून जाऊं लागलाच तर तंगडीवर वार करून लंगडा करून टाका. वरच्या भागावर मात्र मारा करूं नका, समजलांत? हं चला आटपा लौकर. धरा आपआपले दरवाजे. (लोक अवसानानें छपून बसतात.) आतां आरती करा आरती. बायका आरतीच्या गर्दीत आहेत, असें समजून एकदम चोरटे येतील, हेंच त्यांना बोलावणें. मी अशा रीतीनें पूर्वी एक चोरांची टोळीच्या टोळी पकडली आहे. तेव्हां तर आह्मी तीनच असामी होतों. चोरटे आंत शिरतांच तिघांनीं दरवाजे बाहेरून बंद करून घेतले. आंत धूम रडारड नि ओरडाओरड. शरण आले तेव्हां एक दरवाजा उघडला. आणि जो बाहेर येई त्याला कैद करीत गेलों. आतां तर आपण पुष्कळ जण आहों. हरहर महादेव केल्याबराबर एकदम धुमाश्चक्री चालूं द्या.

लष्करी लोकः—फार उत्तम. खाशी मसलत. हे पहा आह्मी हुकमाप्रमाणें बसलों.

गुपितरावः—करूं आरती? सर्व तयार?

लष्करी लोकः—तयार. तयार.

गुपितरावः—जानवा करा आरती.

(आरती करतात. चोरटे धांवून येतात.)

दरोडखोर:–बोलो भीम! (सगळे चोर तसाच आवाज करून आंत शिरतात.)

गुपितराव:–हरहर महादेव! (लष्करी लोक प्रतिशब्द ओरडतात, व धरपकड मारकुट सुरू होते.)

होन्या:–अरे दगड्या, मेलों मेलों!

दगड्या:–मर लेका. येथें कोन जगतोय? तुझ्या संगतीनं मी फसलों.

लष्करी लोक:–(एकाची शेंडी धरून मारतो.)

कोंड्या:–अहो, मला नका मारूं, मी समद्याचीं नांवं सांगतों.

हल्या:–शपथ घेतलीस त्याची याद हाय का नाय?

कोंड्या:–हल्या घेत गेली ती शपथ. ह्याच थेरड्यानं मला ह्या टोळींत आणलन. मी नवा आहे नवा.

लष्करी:–बोल, शरण?

कोंड्या:–शरण.

गुपितराव:–(होन्याची मानगोटी धरून) बोल, तूंच ह्या टोळीचा नाइक नाहीं?

होन्या:–जी सरकार. सांपडलों खरा तुमच्या हातांत आतां जीवदान द्या. तुमच्या पायाशपथ पुन्हां ह्या धंद्यांत पडणार नाहीं.

गुपितराव:–जानबा, ह्याच्या हातापायांत बिड्या घाला. मी आणखीं किती चोर पकडले तें पाहतों.

जानबा:–(होन्याकडे वळून) चल निघ, बस बाजूला. (बिड्या घालतो.)

गुपितराव:–हे घ्या आणखी कैदी. ह्या सर्वांना दरबारांत घेऊन जा. आतां सेनापतीची जागा मिळेल, कां अजू-नही संशय आहे तुला ?

जानबा:–कमाल आहे तुमच्यापुढें! खुप अक्कल लढवलीत. आतां जागा न देऊन करतात काय? आतां तुमच्या हक्काचीच जागा झाली ती. मी खरोखर सांगतों, आज जर तुमचे यजमान येथें असते तर त्यांनीं देखील तुम-ची ही अक्कल व पराक्रम पाहून तोंडांत बोट घातलें असतें. ब्रह्मदेवानें अशा माणसाशीं गांठ घातल्याचा आनंद कोणा पुरुषास होणार नाहीं? चला तुह्मी घरीं जा. बिऱ्हाडीं बाळासाहेब वाट पहात असतील.

(सर्व जातात.)

गुप्तहेर:–ह्यांचे यजमान कोण? हें भाषण मानसिंगास अगत्य कळवलें पाहिजे.

(जातो.)

प्रवेश पांचवा.

स्थळ—जंगल.

पात्रें.

मानसिंगः—रणधीरसिंगाचा जुना सेनापति.

मानसिंगः—(मनाशीं) दैवाची गति विलक्षण आहे. आपली सेनापतीची नोकरी जावी आणि ती ह्या कालच्या आलेल्या नव्या मराठ्याला मिळावी! मोठेंच आश्चर्य आहे. काय बेट्यानें युक्ति काढली? काय ह्मणे, देवीच्या देवळांत सगळ्या नुसत्या बायकाच यायच्या आणि तेथें बायकांचाच बाजार भरावयाचा. दगडखोरही बेटे मूर्ख. तेही ह्याच्या ह्या दंवडीस भुलले आणि ह्याच्या पायापाशीं चालत आले. तुझ्या दैवाची रेषा उपटली खरी. बरं ह्मणावं. कर सेनापतीची जागा किती दिवस करतोस ती. हें हिंदुस्थान आहे, हा दक्षणचा मुलुख नाहीं; इकडला मुलुख कडवा. ह्यांत तूं निभावशील, असें तूं समजूं नकोस. काय आतां हे राजश्री सेनापतीच्या जागीं रुजू व्हावयाचे आणि आमच्या सारख्यानें त्याजला लवून सलाम करावयाचे? धिक्कार असो त्या मुंडी लववणाराला. मी तर प्राण गेला तरी त्याला लवून सलाम करणार नाहीं. मी त्याच्याशीं बरोबरीच्या नात्यानें वागेन. नांव तरी काय, ह्मणे गुपितराव. वा रे नांव! भामटा कोठून तरी काळें कर्म करून तोंड लपवायला

आला असेल झालं. त्या दिवशीं त्याचा चाकर काय ह्मणत होता, "नुकताच वेष पालटला आहे, चला हो तुह्मी, नाहीं तर ते तुह्माला ओळखतील" हा काय माझ्या ओळखीचा? काय पण गर्दी केली त्यांनीं तेथून निसटण्याची. गुपितरावानें नाकावर बोट ठेवलें तें देखील माझ्या लक्ष्यांत आहे. खचित ह्यांत कांहीं तरी गुप्त आहे. ह्या गौप्याचा परिस्फोट करीन तरच मी नांवाचा मानसिंग. काय ह्मणे ते तुह्माला ओळखतील. ह्याच्या जातीचा देखील तेथें कोणी नव्हता, आणि ओळखतील ह्मणतो, ह्यांत काय बरें असावें? मी तर त्यांच्या ओळखीचा नाहीं, मग ओळखतील हें काय? ह्यांत मोठेंच गुप्त असलें पाहिजे. मी जेव्हां बोललों कीं, 'अरे जा दिवाने, तुम क्या दरोडेखोरकू पकडेंगे? तेरे मूपरसे मालूम होता है के तुम क्या करोगे!' तेव्हां तर त्याच्या चाकरानें त्याला हात धरूनच बाजूला केलें. हा पुरुष तरी आहे कां? मला तर संशय येतो, ही खचित बायको असेल. त्या वेळेस ही शंका माझ्या मनांत आली नाहीं, नाहीं तर तिच्या मिशाच उपटून टाकल्या असत्या. बातमीदारानें काय सांगितलें बरें,— जानबा गुपितरावाला ह्मणाला,—"तुमचे यजमान असते तर तुमची कर्तबगारी पाहून त्यांनीं देखील तोंडांत बोट घातलें असतें?"—बस्स. जमली कल्पना. दक्षणेंत नवऱ्याला यजमान ह्मणतात, हेंच खरें. ही बायकोच खास. वर्षाचे दिवस ३६० आहेत. असाही एक दिवस येईल, कीं मी तुला पाया पडायला लावीन. हा

बायको मात्र असला पाहिजे, मग पहा कशी याची टर उडवितो ती. मग अस्मादिक तिचे यार लागून राहिले आहेत. बारकाईनें तपास केला पाहिजे. आतां याची पाळतच ठेवतों. तूं दरोडखोराला पकडलंस, अस्मादिक तुला पकडणार, तुला.

प्रवेश सहावा.

स्थळ–जंगलचा एक भाग.

पात्रें.

गुपितराव–सेनापति.
मानसिंग–पदच्युत सेनापति.

गुपितराव:–(मनाशीं) शिकारीच्या नादानें किती लांब झटकलों तरी! लष्कर तर दूर राहिलं. तहान फार लागली आहे. (कानोसा घेतल्यासारखें करून) हा घोड्याच्या टापांचाच आवाज, कोणी सरदार आला वाटतं.

मानसिंग:–(डोकावून पाहून) भली एकटी सांपडली आहे शिकार. आतां आस्मादिकांच्या तावडींतून जाते कोठें? आजच झरोळी गांवच्या पाटलानें जानबाला ओळखलन, बाळासाहेबाला पण ओळखलन ह्याची आई आमच्याच गांवांत बाळंतीण झाली ह्मणतो. सगळं जमलं! गुपितराव ह्मणजेच बाळासाहेबाची आई. मराठे लोकांच्या बायका इतक्या हुषार असतात आं! हिंदुस्थानांत पण अकलवंत पुरुष आहेत हें तुझ्या प्रत्ययास आणून देतों.

(सूक्ष्म दृष्टीनें तिजकडे पाहून) संशय नकोच. बायकोच ही. आतां एकदम जाऊन तिचं मनगट धरावं. (धांवत जाऊन मनगट धरतो व बोलतो,) बोल, तुम कोन है!

गुपितराव:–(हाताला झिटका मारून दूर होऊन) ज्यानें तुझी जागा पटकावली, आणि जो हल्लीं सेनापतीचें काम करतो आहे, तो हा हिंमत बहादर गुपितराव.

मानसिंग:–त्या गोष्टी तूं त्या ह्यातारड्या रणधीरसिंगाला आणि इतर सरदाराला सांग. मी तुला पक्कं ओळखलं आहे. बोल तूं झरोली गांवांत नव्हतीस?

गुपितराव:–(चपापून) मग? असलें ह्मणून? ज्याच्यांत हिंमत असेल तो पाहिजे तो वेष घेऊन पाहिजे तें काम करील. कांहीं तुह्माला आणि तुमच्या महाराजांना ठकवलं तर नाहींना? पराक्रम दाखवूनच ही जागा मिळविली आहे.

मानसिंग:–होय त्या सर्व गोष्टी खऱ्या आणि ह्मणूनच तर मी तुला फार चहातों; नाहींतर हें तुझं गौप्य कधींच बाहेर काढलं असतं.

गुपितराव:–अस्सं अस्सं! बरं तर मग आतां तुमचं काय ह्मणणं आहे!

मानसिंग:–आतां तुझं गौप्य मला सगळं कळलं आहे. आणि तुझा शूरपणा आणि पराक्रम पाहून मी तुजवर खुष झालों आहे. तर तूं दासी होऊन माझ्या घरीं रहा. बऱ्या बोलानें तूं मला वश हो. नाहींतर मीं तुझं सगळं गौप्य फोडीन व तुझी फटफजिती उडवीन.

गुपितराव:—इतके दिवस ज्यानें गुप्त वेष धरून मोठमोठीं पराक्रमाची कामें करून जगांत नांव मिळविलं तिला आजपर्यंत कोणी पुरुष भेटला नव्हता काय? ती स्त्री इतर सामान्य बायकोप्रमाणें तूं समजतोस काय? माझं सगळं गौप्य फोडशील या भीतीनें तुला वश होणारी व तुझी दासी होणारी ही बायको नाहीं, हें तूं पक्कें ध्यानांत ठेव. ह्या प्राणांचे धनि दुसरे आहेत, आणि त्याशिवाय इतर पुरुष मला बंधू समान किंवा पित्या समान आहेत.

मानसिंग—तर मग तूं मला वश होत नाहींस? पहा बरं विचार कर आपला?

गुपितराव—विचार काय करावयाचा? माझा निश्चय कधीं ढळावयाचा नाहीं. सीतेच्या पायीं रावण आणि द्रौपदीच्या पायीं कीचक यांचा सर्वस्वी घात झाला, तसा तूं मात्र आपल्या प्राणाला मुकशील ह्याचा विचार तूंच कर.

मानसिंग:—सीतेनें आणि द्रौपदीनें असा तुझ्यासारखा वेष पालटला नव्हता. त्यांची गोष्ट कोणीकडे आणि तुझी गोष्ट कोणीकडे? तूं बऱ्या बोलानं मला वश हो. मग मी तुझा दास आहे. मी तुझी एकांतीं भेट घेण्याचा समय पहातच होतों, तो सुदैवानें समय आज आला आहे. आतां तूं मुकाट्यानें कबूल हो; ह्यांतच तुझें कल्याण आहे.

गुपितराव:—दुष्टा, माझं कल्याण कशांत आहे, हें मला पूर्ण समजतं आहे. तूं माझा नाद सोडून दे ह्यांतच तुझं कल्याण आहे तें तूं करून घे. नाहीं तर तूं आपल्या प्राणास मुकशील. इतकं स्पष्ट तुला सांगितलं असून जर तूं पुन्हा दुष्ट शब्द उच्चारलेस तर तुझं आयुष्य संपलंच समज.

मानसिंग:—प्रिये, मी तुला गोडीगुलाबीनें सांगत असतां जर तूं माझा शब्द मानीत नाहींस तर तुझेंच नशीब फिरलें आहे असें समज. हा मानसिंग आतां तुला पकडणार आणि आपल्या बंदींत नेऊन ठेवणार (गुपितरावास धरावयास पुढें जातो.)

गुपितराव:—अरे मूर्खा इतका कां तूं नीच, आहेस? प्रिये कोणाला ह्मणतोस? तुला जीवदान द्यावं असं माझ्या मनांत होतं. ह्मणून मी तुझे डोळे उघडण्याचा यत्न केला, पण तूं पूर्ण मदांध आणि कामांध आहेस अशी माझी खात्री झाली. आपल्या अधिकारावर असतांना कितीक स्त्रियांचा तूं छळ केला असशील, तुला ह्याचें योग्य शासन मिळालंच पाहिजे. हें घे त्याचें बक्षीस.

(गुपितराव जंब्या खुपसतो व मानसिंग गतप्राण होऊन पडतो.)

प्रवेश सातवा.

स्थळ—उदेपूर—एक मोठ्या वाड्यांतील दिवाणखाना.

पात्रें.

गुपितराव-सेनापति.

जानबा-गुपितरावाचा सेवक.

गुपितरावः—जानबाराव, रणधीरसिंग महाराजांचा स्वभाव फार उत्तम. मला मोठी काळजी होती कीं, जरी मला ह्यांच्या पदरीं नोकरी मिळाली, तरी बाळासाहेबावर त्यांचा लोभ कसा बसेल? आणि त्याचें शिकणें कसें होईल? पण झालें तें फार उत्तम झालें. राजपुत्र कुवतसिंगालाही शिकारीचा नाद, आणि आपल्या बाळा साहेबालाही तोच नाद. यामुळें दोघांची दोस्ती इतकी कांहीं जमली कीं, एकमेकांच्या येथें बैठक झाल्यावाचून त्यांचा एकही दिवस जाईना. ही गोष्ट सरकारच्या नजरेस येतांच त्यांनीं आपल्या बाळासाहेबांस राजवाड्यांतच नेऊन ठेविलें; आणि इतका लोभ दाखवितात कीं, हा राजपुत्र कीं, तो राजपुत्र? अशी शंका एखाद्या नवख्या मनुष्यास येते.

जानबाः—परमेश्वर करो आणि त्यांचें प्रेम व आयुष्य वाढो. आपला पुत्र दैव काढील.

गुपितराव:–पण हें ऐकलंस कां? काल छोटे सरकार कुवतसिंग आणि बाळासाहेब फौजेच्या दोन टोळ्या घेऊन त्या प्रसिद्ध दरवडेखोर तात्या भिल्लाला पकडायला गेले आहेत.

जानबा:–अहो, पण तुह्मी कसें जाऊं दिलेंत?

गुपितराव:–आणि सरकार तरी कोठें जाऊं देत होते?

जानबा:–मग?

गुपितराव:–हेच आपल्या हौसेनं गेले आहेत. पण ह्यांत एक बरं झालं. ते गेल्याबरोबर महाराजांनीं कोल्हापूरच्या जगदंबेला नवस केला कीं, हे यश घेऊन परत आले कीं दुसरे दिवशीं तुझ्या दर्शनाकरितां येण्यास निघेन.

जानबा:–जगदंबा त्यांस यश देवो. बहुधा ही कोल्हापूरची देवी आपणच त्यांच्या मनांत भरविली असेल. आपल्या मनांत तिकडे जाणं संचरलं आहेना?

गुपितराव:–मी ह्मणजे तुला एकट्याला इकडे टाकून जातें असं नाहींना कांहीं? बाळासाहेबांस इकडेच ठेऊन जाणार. ती आमची कुलस्वामिणी आहे. जाईन, तिचं दर्शन घेईन. माझ्या बाबांची व पतिराजांची भेट व्हावी ह्मणून नवस करीन. शिवाय जन्मभूमि आहे, तिकडे बाबांचे व पतिराजांचे स्नेही पुष्कळ आहेत. कोणास कांहीं पत्र किंवा खबर मिळाली असेल तर तीही काढतां येईल. सातार्‍यास महाराजांचीही भेट घेईन, आतां बाळासाहेब मोठा झाला. एकोणिसावें वर्ष

त्याला लागलें. त्याच्या लग्नाचाही विचार कांहीं मनांत आणला पाहिजे. असे हजार हेतु त्यांत आहेत. त्यांत माझ्याविषयीं तर तुला काळजी वाटावयालाच नको. मी कांहीं एकटी जात नाहीं. रणधीरसिंग महाराजां-बरोबर थाटानें जाणार. मग तुला इतकं वाईट काय वाटतं ?

जानबाः—जा बोवा. जगदंबा तुमचे हेतु पूर्ण करो. एक-दां तुमची आणि तुमच्या पतिराजांची भेट झाली आणि त्यांनीं एकदां पुत्रमुख पाहिलं, ह्मणजे माझे सगळे हेतु पूर्ण झाले. कोणीकडे गेले आणि कोणीकडे नाहीं. कांहीं पत्ताच नाहीं !

गुपितरावः—तेवढ्याकरितां तर मी तिकडे खेप घालण्याचा विचार केला आहे.

जनबाः—जा, जा, मी नको ह्मणत नाहीं. पण सध्यां ही एक नवी काळजी उत्पन्न झाली आहेना? बाळासाहेब एकदां यश घेऊन घरीं आले ह्मणजे मिळवली. तो मोठा बिलंद भिल्ल आहे ह्मणतात.

गुपितरावः—जगदंबा यश देणारी समर्थ आहे. त्यांच्या अवसानावरून ते यश घेऊन येतील असं वाटतं.

प्रवेश आठवा.

स्थळ–उदेपूर–राजवाडा, कचेरीची जागा.

पात्रें.

रणधीरसिंग–उदेपुरचा राजा–महाराज.
प्रधान–रणधीरसिंगाचा प्रधान.
गुपितराव–रणधीरसिंग महाराजांचा सेनापति.
भालदार–रणधीरसिंगाचा भालदार.
बाळासाहेब–गुपितरावाचा मुलगा.

रणधीरसिंगः–प्रधान, आह्मी रजपूत लोक क्षत्रिय, कडवे. लढाईच्या कामांत अरबांना देखील दाद देणार नाहीं. ह्या सर्व गोष्टी खऱ्या; परंतु मराठ्यांच्या अंगांत जें एक प्रकारचें शौर्य आणि चलाखी आहे, ती आमच्यांतील एकाच्या देखील अंगांत नाहीं, हें खास. आह्मी मिजासखोर बनलों. आह्मी आपल्या ऐटींतच दंग. आमचा तो कंगवा, हुक्का आणि कुसुंबा वेळच्या वेळेवर झालाच पाहिजे. मराठे लोकांचें तें कांहीं नाहीं. तहान नाहीं, भूक नाहीं, वारा नाहीं, पाऊस नाहीं, कांहीं नाहीं. एकदां शत्रु कबजांत येतो कसा, इकडे त्यांचें सारें लक्ष. जंगलांत भिल्ल लोकांना गांठन, त्यांचा पाठलाग करून त्यास जेरीस आणून पकडावें असें यांनींच. हे साताऱ्याकडचे गुपितराव ठेविल्यापासून ह्यांनीं तीन बंडखोर भिल्ल पकडले. त्यांचा मुलगा बाळासाहेबही त्याच वळणावर गेला आहे. त्यानें पणच केला आहे कीं, ह्या तात्या भिल्लाला पकडीन तरच मला बाळासाहेब

ह्मणा. बाप बरोबर जात होता, पण त्यास त्यानें येऊं दिलें नाहीं. मुद्दाम एकटा गेला. तो जाण्यास निघाला हें पाहून कुवतसिंगालाही अवसान आलें, आणि तों पण बरोबर गेला.

प्रधानः—तो यश घेऊन येईल ह्यांत संशय नाहीं.

भालदारः—महाराज, राजाधिराज—

(कुवतसिंग महाराज व बाळासाहेब येतात आणि वंदन करितात.)

रणधीरसिंगः—कां बाळासाहेब, तब्यत तर ठीक आहेना ? येथून गेल्यावर कशी काय हकिकत झाली ?

बाळासाहेबः—येथून गेल्यावर आपल्या पायाच्या कृपेनें आणि वडिलांच्या आशिर्वादानें सर्व कांहीं उत्तम झालें. भिल्लाच्या संबंधानें फार त्रास पडला नाहीं, तो लौकरच हातीं लागला. अरवलीच्या डोंगरांत तो लपून बसला आहे, अशी आह्मांस खबर कळतांच छोटे सरकार आणि आह्मी, असें दोघांनीं मिळून त्यांच्या कोकांस हुसकलें. डोंगरांतील एकूण—एक भिल्ल बाहेर काढला, तेव्हां त्यांनीं उत्तरेकडे पळ काढला. तितक्यांत दक्षिणेकडून मोगलांचा एक सरदार पांचपन्नास लोक बरोबर घेऊन कोणीकडे जात होता, त्याची आणि ह्यांची चकमक झडली, तेव्हां तो भिल्ल परतला. त्याच्या मनांत आह्मी आतां परत गेलों असूं. ह्या तोंडाकडून आह्मी पाठलाग करीतच होतों. डोंगरांच्या खिंडींत तो येण्याला आणि आह्मी तेथें जाण्याला एकच गांठ पडली. तेथें मैदानांत त्याचा आमचा सामना झाला,

त्यांत सुमारें शंभर भिल्ल मेला असेल, तेव्हां हा आमच्या हातांत सांपडला. ह्याला कैद करितों आहों, इतक्यांत मागून तो सरदार आला. तो ह्मणाला, कैदी माझा आहे, सोडा. मी त्याला 'आयत्या बिळांत नागोबा बळी' होऊं देतों काय? त्याच्याशीं ताबडतोब सामना केला आणि त्याला पण कैद करून आणलें. दोन्ही मुख्य कैदी आणि दहावीस दुसरे कैदी ह्यांस तुरुंगांत पाठवून आपल्या पायांशीं हजर झालों.

(कैदी जात आहेत असा पडद्यांत बिड्यांचा आवाज होतो.)

रणधीरः—खुपच बहादुरी केली.

बाळासाहेबः—आपल्या चरणाचे प्रताप, आणि वडिलांची पुण्याई, यामुळें यश मिळालें. आपले छोटे सरकार कुवतसिंग महाराजांनींही खुप बहादुरी केली. त्यांची हिम्मत मोठी. हा सरदार पकडण्याला बहुतेक मदत त्यांचीच झाली ह्मणून हा हातीं सांपडला.

रणधीरसिंगः—ठीक आहे. ह्या कृत्याबद्दल तुम्हांस चांगलेंच बक्षीस दिलें पाहिजे. तुह्माला आमच्या कुवतसिंगाचे सेनापतीच केलें तर? कां प्रधान?

प्रधानः—योजना ठीक आहे. हे सेनापतीचें काम करण्यालायक आहेत. बापाप्रमाणें नांव मिळवितील.

रणधीरसिंगः—गुपितराव, तर मग तुमचा आमचा बेत कायम झाला. मी असें समजतों कीं, हें यश कोल्हापूरच्या जगदंबेनेंच आपणांस दिलें. आतां उद्यां निघावयाचें. तुमचा फार दिवसांचा नाद पुरा करण्याचा योग

जमून आला. आतां आमच्या चिरंजीवास ह्मणजे तुमच्या बाळासाहेबांच्या छोटे सरकारांस गादीचीं वस्त्रें देतों आणि तुमच्या चिरंजीवास त्यांचे सेनापति करतों. प्रधानजी आहेतच, संभाळतील. आणि आपण देवीच्या दर्शनास जाऊन येऊं. तुमच्या सातारकर महाराजांचीही भेट होईल. कां प्रधान?

गुपितराव—जशी महाराजांची आज्ञा. माझाही तोच हेतु आहे. कां दिवाणसाहेब?

प्रधानः—ठीक आहे. आपण खुशाल जावें. इकडील कांहीं काळजी करूं नये.

रणधीरसिंगः—तर मग आणा वस्त्रें. 'शुभस्यशीघ्रं.'

(वस्त्रें देतात. नाच गाणें होतें. पानसुपारी. कचेरी बरखास्त.)

प्रवेश नववा.

स्थळ—उदेपूरचा राजरस्ता.

पात्रें.

एसबाः—जयवंतरावचा सेवक.
जानबाः—गुपितरावचा सेवक.

एसबाः—(मनाशीं) दैवाची गति विचित्र आहे. जयवंतराव महाराजासारख्या माणसाला कैद! आह्मी जन्मभर कैदेंत पडलों तरी चालेल, पण हे सुटले पाहिजेत. पण हें घडणार कसें? आपल्याकडून होईल तितका यत्न तर करावा, मग ईश्वर आहे. आतां ह्याच गांवांत आपण संचार केला पाहिजे. (चालूं लागतो, इतक्यांत

रस्त्यानें जानबा येतो त्यास पाहून.) रामराम जानबा रामराम.

जानबाः–रामराम–कोण एसबा ? (भेटतात) तुम्ही तर आमचे जुने दोस्त, तुम्ही कोणीकडे इकडे ? आणि आपले धनी जयवंतराव कोठें आहेत ?

एसबाः–(मनाशीं) हा पडला शत्रूच्या मुलखांतला. ह्याला इतक्यांत खरें सांगून उपयोगीं नाहीं. (उघडपणें) मी आलों इकडे असाच पोटाच्या पाठीमागें. जयवंतरावची माझी कधींच चुकामुक झाली. तुम्ही येथें किती दिवस आहां ?

जानबाः–(मनाशीं) एकूण हा जयवंतरावांजवळ नाहीं तर ? मग ह्याला तरी आपला भेद इतक्यांत कशाला द्या ? (उघडपणें) मला अठरा एकोणीस वर्षें झालीं, येथें बाळासाहेब ह्मणून सेनापति आहेत त्यांच्या बापाजवळ मी नोकर आहे. ते आपल्याच जातीचे आहेत.

येसबाः–(मनांत) इतके दिवस ह्यांचें अन्न खाल्लें, तो ह्यांच्याशीं बेइमानपणा करून जयवंतरावला सोडविण्याला मदत करील ? कठीणच. ह्याचें मन ओळखल्यावाचून ह्याला खरें सांगूं नये हेंच उत्तम. (उघडपणें) अरे पण बाईसाहेब कोठें गेल्या ?

जानबाः–(भम्मळ गुटमळून.) त्या गेल्या आपल्या मुलखांत.

एसबाः–त्यांना मुलगा झाला होताना ?

जानबाः–(मनाशीं) ही खबर ह्यांना कशी बरें कळली ? (उघडपणें) तुह्माला काय ठाऊक ?

एसबाः–[illegible], आह्मी तुमच्या पासून निघालों, तों थेट साताऱ्यास गेलों, तिकडे जयवंतराव आह्माला भेटले.

महाराज त्यांना रागें भरले कीं, गरोदर स्त्रीला टाकून इकडे कसें आलांत? जा अगोदर तिला घेऊन या. आह्मी दोघेजण इकडे आलों. गुहेपाशीं गेलों, तों तुह्मी तेथें नाहीं. काय पण त्यावेळेस आपल्या महाराजांची दशा झाली! अक्षयीं डोळ्याला पाणी. असो, तें पुष्कळच भारूड आहे, सांगेन एखादे वेळेस. आतां मी येथेंच रहाणार. पण एखादी नोकरी मिळेल कां तुमच्या मदतीनें?

जानबाः—(अम्मळ बडेजावीनें) हात्तिच्या! अहो, नोकरीला काय तोटा? आतां मी बाळासाहेबांची चिठ्ठी नेऊन एखाद्या कामगारास दिली कीं तावडतोब नोकरी. तुरुंगखान्यांत कांहीं नव्या जागा झाल्या आहेत. कांहीं बंडखोर लोक (भिल्ल) पकडके आहेत, ते फार दांडगे आहेत. त्यांस निरनिराळ्या कोठडींत ठेविलें आहे, त्या प्रत्येक कैद्यावर नजर ठेवण्याकरितां निरनिराळा मनुष्य ठेवण्याचा विचार झाला आहे. तेथें जागा पतकरशील तर आतां मिळेल.

एसबाः—(मनाशीं) मग तर देव पावला. मला तर तीच नोकरी पाहिजे. (उघडपणें) कबूल. ह्या नोकरींत कामाची तसदी नाहीं. आपल्याच्यानें दगदगीची नोकरी होत नाहीं. पण उठा, अगोदर हें काम करा. मग सावकास गोष्टी बोलूं.

जानबाः—ठीक आहे, तें माझें काम. मी आतां बाळासाहेबांची चिठ्ठी आणतों, तुमचें सबंध नांव काय? यशवंतराव माधवराव ना?

एसबाः–होय. (जानवा जातो) एकदां माझा तुरुंगांत प्रवेश तर होऊं द्या, मग त्यांची सुटका कशी नाहीं होत तें मी पहातों. आणि कदाचित् न झाली, तरी धन्याला खाणें पिणें तर चांगलें पोंचवीन.

प्रवेश दहावा.

स्थळ–उदेपूरचा तुरुंग.

पात्रें.

जयवंतराव–नायक, कैदी.
शिपाई–तुरुंगावरील एक नोकर.
एसबा–जयवंतरावाचा सेवक.

जयवंतरावः–(कैदीच्या पोषाकानें पडल्या पडल्या.) "मन चिंती एक आणि दैव चिंती अनेक" देवा, मी कायरे तुझा अन्याय केला होता? अरे अज्ञात वासाला कंटाळलों ह्मणून नुकता कोठें बाहेर पडलों होतों. तों त्यापेक्षांही भयंकर कारागृहवास माझ्या कपाळीं! धिक् धिक् जिणें. फुकट जन्म गेला. मी जन्मास येऊन कांहींच केलें नाहीं. फक्त एक्या अबलेला प्रेमपाशांत गुंतवून नाडली, तिला कळवून गेलों नाहीं, एवढीच कायती माझी चुकी. त्याचें कारे हें प्रायश्चित्त! प्रिये, आजपर्यंत तुझी भेट कधींना कधीं होईल ही आशा होती. आतां जन्मभर ह्या कोठडींत आयुष्य घालवायचें ना? हर हर! नको तें आयुष्य. ह्यापेक्षां मरण बरें. मी आंधळा, लुला, पांगळा झालों

असतों तरी स्वतंत्रतेनें भीक मागून दिवस काढले असते. प्रिये, आतां कशाची तुझी भेट होते? मी मेलों असेंच समजावयाचें. पुत्रमुख पहाण्याचें माझ्या नशीबीं नाहीं. तूं बाळंतीण झाल्यावर गेलों असतों तरी बरें झालें असतें. देवा मला पुत्रमुख दाखवायचें नव्हतें, तर पुत्र झाल्याची बातमी तरी कशाला कळविलीस? देवा, मला आतां सोडीव ह्या यातनेंतून. मनाची केवढी उमेद होती. बादशहाची नोकरी करीन, कीर्ति मिळवीन, कधीं तरी पुत्राची आणि प्रियेची भेट होईल, पण सर्व व्यर्थ. हा मायाभ्रम. एसबानें माझ्याबरोबर कष्ट भोगले, त्याचेही उपकार माझ्या हातून फिटले नाहींत. सुटलास बिचाऱ्या एसबा. आतां तूं खुशाल दुसरा धनी कर. आणि सुख भोग. कायरे, ह्या बाळासाहेबानें मला कैदेंत टाकलें काय? बरं! बरं!

शिपाईः—बका मत कर. दो पर रात हुई. अब कुच हमकू सोने देते है या नहीं? अब जो मूमेसे लब्ज निकालोंगे तो जूतीसे मारें गे. खुप् याद रख.

जयवंतरावः—निजा बोवा तुह्मी, मी नाहीं बोलत. (गप् होतो. व थोड्या वेळानें निजतो.)

एसबाः—(इकडे तिकडे पाहून मनाशीं) आतां जिकडे तिकडे सामसूम आहे. वाः! पहारेकरी पण खुप मजेनें निजले आहेत. हीच वेळ उत्तम. हे अफीनी लोक, एकदां पडले ह्मणजे पडले तारेंत. आणि कोठडीपासून बरेच लांब पण आहेत. (कोठडी जवळ जाऊन कुलुप काढतो.)

जयवंतराव:–(अर्धवट झोंपेंत) ह्या बाळासाहेबाच्या हातीं मी सांपडलों तेव्हां एसबा जवळ असता तरी बरें झालें असतें. त्याला मी सांगून ठेविलें असतें कीं, कदाचित् माझी प्रिया तुला भेटलीच तर मी कैदेंत पडलों आहे, हें तरी तिला कळवूं नकोस. अजून हाक मारून सांगूं काय? (बरळतो.) एसबा, एसबा, (उठून बसतो.) अरे, ह्या तुरुंगांत कोठला एसबा?

एसबा:–(पुढें होऊन) जी सरकार, कोठला एसबा काय ह्मणतां? एसबा हजर आहे. आतां आपण त्वरा मात्र करा. माझा पोषाख तुह्मी घाला, तुमचा मला द्या. आणि तुह्मी पट्कन् बाहेर पडा. तुरुंगाच्या दरवाजा बाहेर पिंपळाच्या झाडाला घोडा बांधून ठेवला आहे. त्याजवर पोषाख, तरवार, सगळें कांहीं आहे. उठा, पळा, जलदी करा.

जयवंतराव:–(आश्चर्यानें) तूं येथें कसा आलास! कशाला मला सोडवितोस? मी हतभागी. माझ्यामुळें तुला आणखी दुःख!

एसबा:–तें मग धन्याच्या जीवाकरितां. मी जन्मभर येथें पडलों तरी त्यांत मी सुखी. आपण आतां एक अक्षर बोलूं नका. उठा, पळा. दुसरी गोष्ट नाहीं. जर तुह्मी सुटलां तर मला सोडवाल. (पोषाख बदलतात व एकमेकास मिठी मारून जयवंतराव जातो.)

प्रवेश अकरावा.

स्थळ–तुरुंगाबाहेरील पिंपळाचें झाड.

जयवंतराव:–आज एसबा होता, ह्मणून मी सुटलों! धन्य एसबा तुझी! तूं खरा स्वामिनिष्ठ. तूं नसतास तर आमची अखेर तेथेंच व्हावयाची. तुझे उपकार माझ्या हातून फिटतील काय? तूं स्वतंत्रता सोडून आमच्या करितां प्राणसंकटांत पडलास! मी ही तुझ्याकरितां प्राणसंकट आलें तरी सोशीन, मी तुला हरयुक्तीनें सोडवीन. (भिवया चढवून रागानें) रणधीरसिंगानें पूर्वी आह्मांस आश्रय दिला नाहीं ह्मणून त्याजवर रोष होताच, आतां हा दुसरा अपराध. बाळासाहेबाला ह्मणावं तूं सावध ऐस. माझ्यापुढें तुझ्या गमजा चालावयाच्या नाहींत. चार घटकांच्या पूर्वी मी देवाला विनाकारण दूषण दिलें. मी त्याजवर रागावलों. महामूर्ख मी. परमेश्वरा, तुझी करणी अघटित आहे. तूं करूं लागलास तर काय होणार नाहीं? पाहिजे तें घडूं शकेल. मी चुकलों, मला क्षमा कर. मला यश दे. मला अगोदर एसबाला सोडविलें पाहिजे, आणि बाळासाहेबाचा समाचार घेतला पाहिजे, या कामाला तूं मदत कर. तूं करूं लागलास तर सर्व कांहीं होईल. रणधीरसिंगाची खैरी मोडेल. बाळासाहेबालाही कळेल कीं, दुनयेंत कोणी शूर पुरूष आहेत. माझ्या प्रियेची व माझी भेट होईल, पुत्रमुख माझ्या दृष्टीस पडेल, सासरा भेटेल, जानबा भेटेल, सर्व कांहीं होईल. मी तुला अनन्य भावानें

शरण आहे. देवा मी पुष्कळ दुःख भोगलें. आतां मला सुखाचे दिवस दाखीव. आतां मी ह्या उद्योगाला लागलोंच. प्रथमतः दिल्लीपति पादशहाकडे जातों. तो साह्य झाला तर ठीकच आहे, नाहीं तर शेवटीं मूळ गादीकडे जाऊन महाराजांस विनवीन, आणि ह्या बाळासाहेबास पाया पडायला लावीन आणि एसबास सोडवीन, तरच हा जयवंतराव. (मिशीला पीळ घालतो.)

प्रवेश बारावा.

स्थळ—दिल्ली, बादशहाची कचेरी.

पात्रें.

बादशहाः–दिल्लीचा अधिपति.
वजीरः–प्रधान.

बादशहाः—दख्खनका जयवंतराव अवल बहोत हुषिआर और चालाक मालुम होता था, और ओ अपने नजदीक नौकरी मांगने के लिये आयाथा, लेकीन ओ रास्ती या दरोगी था उसके इमतीहालके लिये उसकू जो मशहूर तात्या भिल डाकू उसके गिरफतारीका हुक्म फरमाया गया था. उसका आजदिन तक पताभी नहीं. और डाकू मजकूरकू तो रणधीरसिंगके सवारने गिरफतार किया ऐसी खबर मिली है. इसपरसे मालुम होता के ओ रणधीरसिंग अजब चालाक, और

उसके नजदीक कोई गुपितराव और उसका, फरजंद बाळासाब वगैराभी दिलेर है. ऐसा सुन्नेमें आया.

वजीरः—हा. जहापन्हा, ओ ऐसाही खुद मतलबी और फखरबाज है. ओ सतारेके महाराजके और आपके भाताहातमे रहेता नहीं. और कहता है के मैं खुद मुखत्यार हूं.

(इतक्यांत जयवंतराव येतो व मुजरा करतो.)

बादशहाः—खुदहीकी बात निकालीथी. सो इतनेमें आप हजर हुए. क्या तआजुब है? आप इतने दिन कहां थे?

जयवंतरावः—खादीम, खाविंदका हुकूम लेकर तात्या भिलके गिरफतारीकू गयाथा. उसकू अरवली पहाडके पायमें देखा. उसका और मेरा मुकाबीला होतेही उसकू मालुम हुवा के, जयवंतके आगे भागे आपनी कुछ पेश जानेकी नहीं. उस गरदीमे दस पांच भिल मारेभी गये. बाद ओ मारे खोपके इदर उदर भागने लगा. मैनेभी उसका ताआकुब किया. दरम्यानमे रणधीरसिंगका कोई बाळासाब नामका मराठा था, उसकी और मेरी चकमक हुई. मै एकेला और ओ ज्यादा लोक थे तोभी मै उनकू जबरदस्त था. लेकिन इतिफाकन मेरे घोडेकू कारी तीर लगनेसे ओ जमीनपर गिरपडा. और दुष्मनने मुजकु और तात्या भिल वगैराको कैद किया. तकादिरे इलाईसें मै वहासे बडे हिकमतके साथ छुटकर खाविंद के नजदीक आया हूं.

लेकिन खाविंदसे ऐसी उमेद रखता हूं के उसकू कुछ-भी सजा मिले. याने आपका हुक्म और मदत व मेरी बहादुरीसे उदेपूर गसत्र करके बालासाबकू और उसके बापकूभीं पकडकर हुजूरके कदमोके ला हजर करता हूं.

बादशहाः—क्यंव वजीर, कैसा करना ?

वजीरः—(जयवंरावाकडे पाहून.) आप कैदमेसें कैसे छूट-कर आये ? ये तो बयान करो ?

जयवंतरावः—मैं क्या कहूं ? मैं कैदमें था, ये लब्जभी मूसे कहे नहीं जाते. लेकिन् वक्तपर कहना भाग पडा. पहिले आप ये बोलोके, आपके तरफसे मदत मिलती या नहीं ? दिलसे देना होवे तो हा बोलो, नहीं तो ना बोलो. आपने मदत नहीं दियी तोभी मै कुछ डरता नहीं. मै हरतऱ्हांसे उसकू जेर करूंगा. और आपना मतलब पूरा करूंगा. इसमें कुच षक नहीं. आपके तरफसे मदत मिली नहीं तोभी मैं आपना इरा-दा कभी नहीं छोडनेका. महाराजके तरफसे मदत ले आयेंगे. इसमें आपका नुकसान है.

बादशहाः—वजीर, कुच बोलो. चुप क्यंव बैठे !

वजीरः—मदत देनेका इरादा होवे तो देना. इसमें कुछ हरकत नहीं. लेकिन ओ बोलतां है के, मैं महाराजके तरफसे मदत लाउंगा. इसमें कुछ हंसल नहीं. महा-राजके तरफसे जो उसकू मदत मिलनेकी होती, तो ये पहिलेही नोकरीके वास्ते ह्यां क्यौं आता ?

जयवंतराव:-मेरेकू कुछ पेटकी फिकर पडी इसवास्ते आपके तरफ नोकरी मांगनेकू आया हूं, ऐसा आप समजते हो ? मेरे महाराज हमारे सरीखे हजारो लोगोंको पेटकू देनेकू जबरदस्त है. और फिल हाल देतेभी है. मगर मैं एक नामके वास्ते इस कदमके पास आया हूं. हमारे महाराजकू ये खबर है. मै पहिलेही उनकू पूछकर वहांसे निकला हूं. महाराजका कहना ऐसाही है, के मुसलमीन हुवे, और परदेसके हुवे तो क्या हुवा ? ये आपने अकलसे बढे है. अल्लाकी उसके उपर मेहर नजर है. जबतक ओ नेकीसे चलते है, रयतपर जुलूम नहीं करते, रयतकू खुष रखते है, तबतक उसकी नोकरी करनेकू कुछ हरकत नहीं. ये बात परवरदिगारकू मंजूरही है. उन्होंकू दोस्तही समजना. आपने देसमें उनोकू आपनही मदत करना चाहिये. उनोकू दुष्मन् कभी नहीं समजना. आच्छा! बहोत बोलनेमें कुछ हांसल नहीं. आप मदत देते है या नहीं ? इतनाही बयान करो. फिर जो मेरेकू करना होयगा सो मै करके दिखावूं. जादा बोलनेमें क्या हांसल है ?

पादशहा:-आच्छा. तुमकू चहियेसो मदत लेके जाव. वजीर, ये आच्छा आदमी नजर आता है. उसकू पूरी पूरी मदत देना.

वजीर:-हुक्म (सलाम करतो.)

जयवंतराव:-(सलाम करतो.) अल्लाहुताලाखावंदकू बढती देवे.

(कचेरी बरखास्त.)

अंक चवथा.

प्रवेश पहिला.

स्थळ–उदेपूर–राजकचेरी.

पात्रें.

कुवतसिंग- रणधीरसिंगाचा मुलगा.
बाळासाहेब–गुपितरावाचा मुलगा, (सेनापति.)
प्रधान–मुख्य प्रधान, (वयोवृद्ध.)
जासूद–जयवंतरावाकडून पत्र घेऊन येणारा.

कुवतसिंगः–बाळासाहेब, प्रसंग तर मोठा कठीण आला. बादशहाचें पत्र आलें कीं, एक तर आमचें स्वामित्व कबूल करावें आणि साठ लक्ष रुपये खंडणी द्यावी, नाहींतर उदेपूर संस्थान खालीं करून द्यावें. असें न कराल तर तुह्मांस जड जाईल समर्थाशी वैर उद्भवलें. आतां पुढें काय करावयाचें? ह्यावेळेस वडीलही येथें नाहींत, ते असते ह्मणजे आपल्यामागें काळजी नसती.

बाळासाहेबः–आणि आतां तरी काळजी कसली? संस्थान खालसा करूं देतों कीं काय? ज्याप्रमाणें बाबा असतांना चाललें होतें, त्याप्रमाणें दोस्तीच्या हक्कानें वागा. संस्थान खालसा करण्याची व खंडणी देण्याची गोष्ट बोलूं नका. ते ह्मणजे आईचें दूध प्यालेले आहेत आणि आपण नाहीं, असें नाहींना कांहीं?

कुवतसिंगः—कां प्रधानजी, तुमचा कसा काय विचार आहे?

प्रधानः—आमचा काय विचार? खंडणी देणें किंवा त्यांची ताबेदारी कबूल करणें, ही मोठ्या नामोशीची गोष्ट आहे. आज फार दिवसांपासून हें स्वतंत्र संस्थान आहे. कोणाचें अंकित नाहीं. पण—

बाळासाहेबः—पण काय? भ्यायचें होय? भ्यायचें ह्मणजे संस्थान त्यांच्या ताब्यांत द्यायचें. हीं गोष्ट बोलूं नका.

प्रधानः—आपलें आणि महाराजांचें, दोघांचींही वयें लहान आहेत. आपणांस मोठ्या लढाईचा कांहीं अनुभव नाहीं.

बाळासाहेबः—नसेना अनुभव. भारत ऐकल्याचा मग काय उपयोग? जिकडे तिकडे शांतता असल्यावर लढाईचा अनुभव कोठून येणार? ह्मणून काय स्वस्थ बसावयाचें? त्यांचे ताबेदार बनावयाचें? धिक्कार! धिक्कार! धिक्कार! कां कुवतसिंग महाराज, आपला काय मनोदय आहे?

कुवतसिंगः—छे! छे! हार तर मुळींच जावयाचें नाहीं. फक्त बाबा महाराज परत येईतों लांबणीवर पडेल तर चांगलें. इतकेंच माझें ह्मणणें आहे.

प्रधानः—लांबणीवर कसचें पडतें?

कुवतसिंगः—मग पुढें कसें?

बाळासाहेबः—पुढें काय? ल्याहा जबाब. खंडणी देत नाहीं, आणि स्वामित्वही कबूल करीत नाहीं. दोस्ती-

च्या हक्क पूर्वीप्रमाणें पाहिजे तर चालवूं. नाहींतर लढाईची तयारी आहे.

प्रधानः—जबाब तर असाच द्यावयाचा, पण एक करा. महाराजांकडे एक सांडणीस्वार पाठवून खबर द्यावीकीं, तुम्ही ताबडतोब निघून परत या. इकडे असें असें कारण उपस्थित झालें आहे.

कुवतसिंगः—अशानें प्रवासांत त्यांना फार काळजी लागेल.

बाळासाहेबः—कांहीं नको हो कळवावयाला. आपल्याच्यांनीं इकडला प्रसंग पार पाडवणार नाहीं काय?

प्रधानः—तुम्ही शूर आहां, ईश्वरकृपेनें पार पाडाल, सर्व कांहीं होईल, परंतु माझ्या म्हाताऱ्याचें एवढें सांगणें ऐका. ते साताऱ्यास किंवा कोल्हापुरास असतील, त्यांनांही इकडची हकिकत कळवा. हें पोक्त विचाराचें सांगणें आहे. तुमचें वय अझून लहान आहे; आणि तुम्ही तरुणपणाच्या झोंकांत आहां, इतकी दूरदृष्टी तुमची पोंचावयाची नाहीं. खबर पाठविण्यांत कांहीं तोटा तर नाहींना? वडिलांचें ऐकत जावें.

बाळासाहेबः—ठीक आहे. वडिलांचा मान आह्मी राखतों. ह्या कामांत आह्मी आडवे येत नाहीं. पण दिल्लीपति बादशहाला मात्र भिऊन पत्र लिहूं नका.

कुवतसिंगः—तें तर ठरलेंच. भिऊन पत्र लिहावयाचें नाहीं. प्रधानजी दोन्हीकडे पत्रें रवाना करा.

(इतक्यांत जासूद जयवंतरावचें पत्र घेऊन येतो.)

कुवतसिंगः—काय आहे हो त्या पत्रांत वाचा.

बाळासाहेबः—वरतीं कांहीं मथळा बिथळा नाहीं! इतकें अमर्याद पत्र कोणाचें? इतका उद्दाम कोण झाला आहे?

प्रधानः—हें जयवंतरावाचें पत्र. जयवंतराव कडक सरदार आहे. भाऊसाहेबांच्या स्वारींत तो होता. मी त्यास ओळखतों.

बाळासाहेबः—ह्मणून पत्रावर मायना नको? ही मोठ्या अपमानाची गोष्ट आहे! काय ह्मणतो वाचा तर खरें.

प्रधानः—(वाचतो.)

श्री.

"कुवतसिंग यांस कळावें कीं, एकदम शरण ये. संस्थान खालसा करून दे, नाहीं तर ह्या जयवंतरावशीं गांठ आहे. तुझ्या बाळासाहेबास सांग कीं, तूं सर्पाच्या शेपटीवर पाय दिला आहेस. तात्या भिल्लाला पकडतेवेळेस गफलतीनें मला पकडलेंस? तो हा तुझ्या कैदेंतून सुटून बादशहाच्या तर्फे तुझ्यावर स्वारी करून आला आहे. आतां तुझा बाप लागून राहिलों आहे. संभाळ—कळावें, मित्ती."

जयवंतराव.

बाळासाहेबः—बस करा, बस करा. त्याची खोडच मोडली पाहिजे. हा मला काय ह्मणतो? तुझा बाप लागून राहिलों आहे, ठीक आहे. ह्या बेट्याच्याच हातून आपली फजिती करून घे. तुला पकडलें तेव्हां तुझें शूरत्व कोठें गेलें होतें?

कुवतसिंगः—प्रधानजी, आतां कमाल झाली. हा अपमान आपणाला कधीं सहन व्हावयाचा नाहीं. ह्यांची नीति सुटली. पत्राला मायना नाहीं, हें काय? आह्मी गादीचे मालक आहों. हा गादीचा शुद्ध उपमर्द आहे.

बाळासाहेबः—जेथें नीति सुटली, तेथें अपयशच समजावयाचें. जयवंतराव काय जय मिळवतो? अखेर जय आपला. हीं अक्षरें येथें लिहून ठेवा. आजपासून तिसरे दिवशीं लढाई सुरू. मी जातों. लष्करची नीट व्यवस्था पहातों, आणि कोणाच्या कसूरीनें हा जयवंतराव सुटला त्याची चौकशी करतों.

कुवतसिंगः—प्रधानजी ह्या पत्राला चांगलें खर्मरीत उत्तर लिहा. आणि बाबांकडे सांडणी स्वार जाऊं द्या. त्याबरोबर आह्मी स्वदस्तूरचें पत्र देतों. (पत्र लिहून देतो.)

प्रधानः—(पत्र लिहिलेलें पुढें करून) बाळासाहेब तुमची पण ह्यावर सही असूं द्या.

(बाळासाहेब सही करून पत्र देतो.)

(कचेरी बरखास्त.)

प्रवेश दुसरा.

स्थळ–कोल्हापूर–देवीचें देऊळ, धर्मशाळा.

पात्रें.

विश्वासराव–सातारकर महाराजांचा एक सरदार.
भिकारी–एसवानें शिकवलेला.
स्वार–कुवतासिंगाकडून आलेला सांडणीस्वार.

विश्वासरावः–(गोसाव्याचा वेष धारण केलेला.) जय जगदंब! जय जगदंब! भाऊसाहेबांचा पत्ता लागला नाहीं, मग मी गुहेशीं जाऊन पाहिलें तों तेथें जयवंतरावही नाहीं. मुलगीही नाहीं. एसवा आणि जानवांसही शोधून शोधून दमलों. शेवटीं अंबे तूं आमची कुलस्वामिणी, एखादे दिवशीं तरी येथें कोणी दर्शनास येतील ह्मणून ह्या तुझ्या पायांपाशीं येऊन बसलों, पण व्यर्थ. जगदंबे, आतां नको अंत पाहूं. पुरी तपश्चर्या झाली. आतां सगळ्यांच्या भेटी होऊन एकदां आनंद होऊं दे. इतकी आशा पूर्ण कर. जगदंब! जगदंब!! शंकर! शंकर!!

(इतक्यांत कोका वाजवीत एक भिकारी येतो.)

भिकारीः–(गातो)

सुशील स्त्रीशीं कपट करी जो, त्याला ती स्त्री अंतरते॥
रानोरानीं भटके तो नर, मन त्याचें दुःखित होतें ॥
संसाराला मुकतो सहजीं, वेडेपण पदरीं येतें ॥
न सुचे धंदा त्या मतिमंदा, जयवंता अपयश येतें ॥

विश्वासराव:–(मनाशीं) काय ह्मणतो हा ? ह्या गाण्यांत जयवंताचें नांव आहे. ही त्याचीच कविता असेल. (उघडपणें)अरे, ओ कोन है ? इदर आ. बोल तूं क्या गाता है ?

भिकारी:–(गातो) 'सुशील' ....

विश्वासराव:–महाराजांनींच त्याच्या पदरीं वेडेपण बांधलें आहे. (उघडपणें) ये ठेव तुमकू. (पावली काढून देतो.) तूं बैठ मेरे पास. हम तुमकू खानेकू देएंगे. और तुमारा कबीत बोलो भला.

भिकारी:–' सुशील स्त्रीशीं ....

विश्वासराव:–(आश्चर्यानें मनाशीं) अगदीं सगळें वर्णन तेंच. ह्याला जयवंतरावचा पत्ता खास ठाऊक असेल युक्तीनें तपास केला पाहिजे. (भिकाऱ्यास) बैठो तुम, (भिकारी बसतो.) (मनाशीं) आज कांहीं शुभ शकुन दिसतो. एरव्हीं उजवा डोळा लवावयाचा नाहीं. जगदंब! जगदंब ! ! शंकर ! शंकर ! !

रणधीरसिंग:–(देवीच्या पायांपडून येतात.) देवळ तो बहोतही आच्छा है. साधू संतकी भी कुच खबर लेना ये अच्छा. क्यंव गुपितराव ?

गुपितराव:–हां ! जरूर केना चाहिये. (साधू बैरागी बसले होते तिकडे जातात.)

रणधीरसिंग:–देखो तो सच. ये साधू कैसा है ? मैं राजा हूं. मेरे तरफ देखते नहीं. और तुमारे तरफही देखता है

विश्वासराव:-(मनाशीं) पुरुषाचा वेष घेण्याला मी आपल्या मुलीला शिकविलें होतें. पगडी आणि चंदनाचा टिळा हुबेहुब तसा आहे. कदाचित् हीच माझी मुलगी असेल.

गुपितराव:-साधूका क्या? जिधर नजर लग रही उधरही. ओ कुछ मंगते नहीं. (मनाशीं) हा माझा बाप तर नसेल? (उघडपणें) अच्छा साधू नजर आता है. जरा बैठो तो सच.

(रणधीरसिंग व गुपितराव वगैरे मंडळी बसतात.)

विश्वासराव:-(मनाशीं) आवाजावरून तर हीच माझी मुलगी असावी असें वाटतें, परंतु पुरती ओळखली पाहिजे. ठीक आहे. ही युक्ति बरी. (भिकाऱ्याकडे वळून) छोकरा, गाव तुमारा गाना.

भिकारी:-

सुशील स्त्रीशीं कपट करी जो त्याला ती स्त्री अंतरते ॥
रानोरानीं भटके तो नर मन त्याचें दुःखित होतें ॥
संसाराला मुकतो सहजीं वेडेपण पदरीं येतें ॥
न सुचे धंदा त्या मतिमंदा जयवंता आपयश येतें ॥

गुपितराव:-तुमकू ये गाना किन्ने सिकाया?

विश्वासराव:-(पूर्ण शब्द ओळखून) हा अवाज तर माझ्या मुलीचाच आणि त्यांतही ओळखूं येण्याला हें एक कारणच झालें. ही ह्या गाण्याची चौकशी खोद-खोदून करते आहे. बस बस, आतां पुरी खात्री झाली.

(उघडपणें) बेटा जया, इतके दिवस तूं कोठें होतीस? (मिठी मारतो.)

रणधीरसिंग:-(आश्चर्यानें) आं! हा काय चमत्कार आहे?

विश्वासराव:-ही माझी मुलगी आहे.

गुपितराव:-महाराज इतके दिवस ही गोष्ट कांहीं कारणानें मीं आपणास कळविली नाहीं हा गुन्हा माफ असावा. मी ह्यांची कन्या आहे. हे माझे तीर्थरूप आहेत आणि आपणही धर्माचे बाप आहांत.

रणधीरसिंग:-तर मग तुह्मी आमचे नोकर नाहीं तर?

गुपितराव:-आपलें अन्न खाल्लें आहे. मी एकटीच नोकर नाहीं तर माझ्या मुलासुद्धां आह्मी आपले ताबेदार आहोंत.

रणधीरसिंग:-आणि तुमचे पतिराज कोठें आहेत?

गुपितराव:-त्यांचा पत्ता असतां तर मला हा पुरुषवेष घेण्याचें कारणच पडलें नसतें. पण दुर्दैवी पडलेंना? (रडूं लागते.)

रणधीरसिंग:-ही भानगड आहे तरी काय? उग्या रहा, रडूं नका.

विश्वासराव:-उगी बेटा रडूं नकोस. (तिचे डोळे पुसतो.) (महाराजांकडे वळून) ही भानगड फार मोठी आहे. मी विश्वासराव आणि हिच्या नवऱ्याचें नांव जयवंतराव. भाऊसाहेबांच्या स्वारीबरोबर आह्मी दोघेही होतों. पांच लक्ष रुपये तुमच्यापासून घेऊन तुमचें

रक्षण केलें तेंही आह्मीं. त्याची तुह्मांस आठवण असेलच. ते उपकार माझ्या मुलीला आणि नातवाला आपण आश्रय दिल्यानें सर्व फिटले असें मी समजतों. आजचा दिवस सुदीन आहे. मला ह्या पोराच्या गाण्यावरून जयवंतरावाची भेट लौकर होईल असा रंग दिसतो. छोकरा गाव तुमारा गाना.

भिकारीः–

सुशील स्त्रीशीं कपट करी जो त्याला ती स्त्री अंतरते॥
रानोरानीं भटके तो नर मन त्याचें दुःखित होतें॥
संसाराला मुकतो सहजीं वेडेपण पदरीं येतें॥
न सुचे धंदा त्या मतिमंदा जयवंता अपयश येतें॥

विश्वासरावः–जयवंतरावनें ह्मणजें माझ्या जावयाने माझ्या मुलीशीं कपट केलें, त्याला ही अंतरली, तो हिला शोधण्याकरितां रानोरानीं भटकतो आहे, त्याचें मन दुःखी, तो संसाराला मुकला, खुद्द महाराजांनीं त्याचेपदरीं वेडेपण बांधलें आहे, त्याला कांहीं सुचत नाहीं, तोच मतिमंद झाला व त्याच जयवंताला अपयश आलें. अगदीं सगळा अर्थ तोच.

रणधीरसिंगः–काय हो गुपितराव, खरें काय हें?

गुपितरावः–होय महाराज, ह्या सर्व गोष्टी खऱ्या. मीं आपणांस कोल्हापूरच्या जगदंबेच्या दर्शनास येण्याचा जो आग्रह केला, यांतला मुख्य हेतु हाच कीं, ही आमची कुळस्वामिणी हिच्या दर्शनाला कोणी तरी

आलें असेल. तों आज जगदंबेच्या कृपेनें बाबांची तर भेट झाली.

रणधीरसिंगः—ठीक आहे ! आनंद.

(इतक्यांत सांडणीस्वार पत्र घेऊन येतो.)

स्वारः–(वंदन करून) महाराज आनंद कायका ? उदर तो बडी धूम चली है, छोटे सरकारने मेरेपास ये कागद देके कहा के, तुम जलदी जाके, जहां आप मिलोंगे वहा आपकू खत देना. (कागद पुढें करतो.)

(गुपितराव पत्र फोडून वाचतात.)

श्रीगजानन.

शिरसाष्टांग दंडवत. दिल्लीच्या बादशहाकडून कोणी सरदार सैन्य घेऊन आपल्या उदेपुरावर चाल करून आला आहे. आणि तो ह्मणतो कीं, उदेपूर हें आजपर्यंत स्वतंत्र संस्थान होतें, तें ह्यापुढें स्वतंत्र ठेविलें जाणार नाहीं. तरी तुह्मी आमचें स्वामित्त्व कबूल करा, आणि पन्नास लक्ष रुपये खंडणी द्या. नाहीं तर लढाईस सुरवात होईल. त्याचें स्वामित्व कबूल केलें नाहीं आणि खंडणीही देत नाहीं, असें त्यास उत्तर दिलें. त्यामुळें त्यास राग आला आहे. आपण पत्रदर्शनी निघून यावें. कळावें, हे विज्ञापना. मिती. शके.

आपले,

कुवतसिंग.

बाळासाहेब.

रणधीरसिंगः—चिरंजीवानें जबाब तर उत्तम दिला. त्यांचें स्वामित्व कबूल करण्यापेक्षां वेळच आली तर महाराजांचें स्वामित्व कबूल करण्यास काय हरकत आहे? चला आपण सर्वजण महाराजांच्या भेटीस जाऊं. विश्वासराव, तुह्मी पण आतां आमच्याबराबर चला. गुपितराव, तुह्मीही आतां इतक्यांत वेष पालटूं नका. बाळासाहेबांस तुह्मी ह्याच वेषानें भेटलं पाहिजे. तेथें काय प्रसंग असेल कोणास ठाऊक. कदाचित् पुन्हां तुह्मांला सेनाधिपत्य स्वीकारावें लागेल.

गुपितरावः—जशी महाराजांची आज्ञा.

विश्वासरावः—मीही आपल्या आज्ञेबाहेर नाहीं. मीही आपला वेष पालटीत नाहीं. माझा नेमच ठरला आहे कीं, जेव्हां कन्या आणि जामात मला भेटतील, तेव्हांच हा वेष टाकावयाचा. नाहींतर गोसावी बनलों तो बनलों. चला महाराजांकडूनही आपणांस मदत मिळेल.

रणधीरसिंगः—सातारकर महाराजांची तर मदत घेतलीच पाहिजे. चला—चला.

(सर्वजण जातात.

प्रवेश तिसरा.

स्थळ—उदेपूर—कुवतसिंग महाराजांची कचेरी.

पात्रें.

कुवतसिंग महाराज—रणधीरसिंगाचा मुलगा.
प्रधानजी—रणधीरसिंगाचा वयोवृद्ध प्रधान.
बाळासाहेब—गुपितरावचा मुलगा.
एसबा—कैदी. जयवंतरावचा सेवक.
जानबा—गुपितरावचा सेवक.
जवानसिंग—न्यायकचेरींतला शिपाई.

बाळासाहेबः—महाराज, कैदी पळविणाऱ्या माणसाचा पत्ता लावून त्यास आपल्यासमोर आणला आहे. त्याचा न्याय आतां होणार.

कुवतसिंगः—कोण आहे तो ?

बाळासाहेबः—आहे कोणी एसबा नांवाचा मनुष्य.

कुवतसिंगः—तर मग तो तुमच्या जातीचा. त्यानें अशी लबाडी केली ! आह्मी, मराठे लोक ह्मणजे मोठे इमानी समजत होतों. अहो, ह्या एसबाची शिफारस तुमच्या इमानी जानबानींच केली ना !

बाळासाहेबः—होय. त्यामुळेंच तर मी फसलों. ठीक आहे. जानबा आमचा झाला म्हणून काय झालें ! आपल्यासमक्ष त्याची कशी व्यवस्था करितों ती पहा. जातीचा झाला ह्मणून कांहीं न्यायाच्या कामांत कसूर व्हावयाची नाहीं. (इतक्यांत कैदी एसबा आणतात)

(कठड्यांत उभा राहिल्यावर) एसबा, तुह्मी आमच्या जातीचे, वयोवृद्ध, या परदेशांत, तुमच्यावर कांहीं उपकार करावे ह्मणून, तुह्मांस नोकरी दिली. तुह्मांला तुरुंगांतील कैद्यांची देखरेख करण्याचें सोपें आणि विश्वासाचें काम आह्मीं दिलें. आणि तुह्मी कैद्यास सामील होऊन कैदी जयवंतराव पळविलात ही फार वाईट गोष्ट केलीत. तुह्मीं आपल्या सगळ्या जातीला कलंक लावून घेतलात. इकडले लोक असे समजतात कीं, मराठे लोक ह्मणजे मोठे इमानी आणि वचनाचे सच्चे. ह्या थोरपणाला मोठी काळोखी लावलीत.

एसबाः—मी जातीचा शुद्ध मराठा आहे, मला जात्याभिमान आहे. जातीस काळोखी लागावी असें कृत्य मी करीन असें कधीं घडणार नाहीं.

बाळासाहेबः—(रागानें) तर मग, तुह्मीं कैदी जयवंतराव पळूं दिलांत हें चांगलें कृत्य केलेंत?

एसबाः—होय. अलबत चांगलें कृत्य केलें. आपण जर शांतपणें विचार कराल तर आपणही कबूल कराल कीं, मीं चांगलेंच कृत्य केलें.

कुवतसिंगः—तो पक्का बनला आहे. करून सवरून शिरजोर.

बाळासाहेबः—असूं द्याहो, शिरजोर असला तर त्याला ठिकाणावर आणायला किती उशीर? (कैद्याकडे वळून) अरे हरामखोरा, नीट विचार करून बोल. उगीच महाराजांचें आणि आमचें पित्त खवळूं देऊं नकोस.

एसबाः-(हात जोडून.) महाराजांचें आणि आपलें पित्त उगीचच्या उगीच खवळूं लागलें तर मी काय करूं? बाकी मीं केलें तें बरोबर केलें, अशी माझी समजूत आहे. आपण शांतपणें ऐकून घ्या.

बाळासाहेबः-काय तुझें बोडकें ऐकून घ्या. आमचा कैदी तूं जाणून बुजून पळविलास आणि निमुटपणें गुन्हा कबूल न करितां आणखी ऐकून घ्या ह्मणतोस? कोणी तुझी शिफारस आमच्या जानबानें केलीना? जवानसिंग, आणरे त्याला बोलावून.

एसबाः-महाराज, त्याजकडे कांहीं अपराध नाहीं. त्याला ह्यांतलें मर्म कांहींएक ठाऊक नाहीं.

बाळासाहेबः-बस बस. जास्ती बोलूं नकोस. तुला विचारूं तेवढ्याचा जबाब तूं दे.

(इतक्यांत जानबा येतो.)

बाळासाहेबः-या जानबा या. असे कठड्यांत उभे रहा. तुह्मीं नोकरी देण्याविषयीं ज्यांची शिफारस मजजवळ केलीत तो हाच का गृहस्थ?

जानबाः-होय. हाच. हा माझा फार दिवसांचा मित्र आहे आणि पूर्ण विश्वासू आहे.

कुवतसिंगः-ह्या दोघांच्या मसलतीनें हें काम झालें आहे. तो कसला पत्ता लागूं देतो? तो ह्याला पूर्ण विश्वासू ह्मणतो. तो तर ह्याला पक्का सामील असला पाहिजे.

बाळासाहेबः-जानबाराव, तुझी समजत असाल कीं, मी ह्यांच्या बापापासूनचा नोकर, हे मला काय करणार?

मला सोडतील. पण ही तुमची चुकी आहे. गुन्हा शाबीत झाल्यावर तुमची इतकी देखील दया मी मनांत आणणार नाहीं. तुम्ही हा आपल्या जातीचा, झणून एसबावर दया करायला जाल पण फसाल. तुम्ही खरें खरें काय असेल तें सांगा. तरच तुह्मांला माफी मिळेल.

जानबाः—मला माफी कशाला हवी? माझा गुन्हा असेल तर मला शिक्षा करा आणि त्याचा गुन्हा असेल तर त्याला शिक्षा करा. त्याची एवढी भीड कशाला पाहिजे? आपल्याला जन्मांत खोटें बोलणें ठाऊक नाहीं. मी कबाड लुच्च्या असतों तर आपल्या बापाजवळ इतके दिवस टिकलोंच नसतों.

कुवतसिंगः—कां प्रधान? आजचा न्याय मोठा चमत्कारिक दिसत आहे.

प्रधानः—दोघेही पक्के वस्ताद आहेत.

बाळासाहेबः—तर ह्यानें कैद्यास सामील होऊन पळविलें ही गोष्ट तुह्मांला बिलकुल ठाऊक नाहीं?

जानबाः—आपल्या पायाची आण. मला बिलकुल ठाऊक नाहीं. (एसबाकडे वळून) काय रे हरामखोरा, अशी बेइमानी केलीस काय?

एसबाः—जानबा, तुम्ही पण मला बेइमानी झणतां? माझें दैव फिरलें आहे तुमच्याकडे काय दोष?

प्रधानः—मध्यें उगाच एकमेकांशीं अधिकउणें बोलूं नका.

बाळासाहेबः—जानबा, विचार करा, विचार करा. ह्या गुन्ह्याचा परिणाम फार वाईट होईल. तुम्ही राजद्रोह करणाराला सामील झालां आहांत.

जानबाः—विचार काय करावयाचा? मला ह्यांतलें बिलकुल कांहींएक ठाऊक नाहीं. मीं खरें आहे तें सांगितलें. जेव्हां ह्याचा माझा स्नेह होता, तेव्हां हा पुरा विश्वासू नोकर होता. तो आणि मी एकाच धन्यापाशीं होतों. आणि आतांही त्यानें स्वतः ही दगलबाजी केली असेल असें मला बिलकुल वाटत नाहीं. हें कोणी तरी भलत्याच मनुष्यानें दुष्ट कृत्य केलें असेल. त्यांतून माझी त्याची जर एकांतीं गांठ पडेल तर मी त्यांतला खरा प्रकार काय आहे तो त्याजकडून काढून घेईन आणि आपणांस कळवीन.

बाळासाहेबः—ठीक आहे, जा एकीकडे. खरें कारण काय आहे त्याचा पत्ता नीट लावा. कोण जवानसिंग, ह्या दोघांना बाजूला घेऊन जा. ह्यांजवर नीट नजर ठेवा.

(जातात.)

कुवतसिंगः—प्रधानजी, कैदी आणि साक्षी ह्यांना एकीकडे भेटण्याची सवड देणें, हें चांगलें नाहीं. त्यांनीं कचेरींत उघडपणें काय बोलणें तें बोलावें. हे बाळासाहेबांच्या जातीचे पडले. त्यांत जानबा त्यांचा जुना नोकर पडला ह्मणून मला असें वाटतें कीं, ह्यांच्या न्यायाच्या कामांत बाळासाहेबांनीं मुळींच भाषण करूं नये. हा तुमच्यापुढेंच न्याय व्हावा. बाळासाहेब ह्याचा तुह्माला राग नका येऊं देऊं.

बाळासाहेबः—छे! छे! मला यांत बिलकुल राग नाहीं. माझें मस्तक फिरून गेलें आहे. इतका जुना नोकर

आणि तो त्या कैद्याशीं खलबत करितो. फिरली दानत त्याची. जो करील तो भरील. ह्याचा न्याय प्रधानजी-नींच करावा असा मी पण आग्रह करितों.

प्रधानजीः–बरें आहे. आपली उभयतांची मर्जी आहे तर आह्मी न्याय करितों. परंतु बाळासाहेबांपुढें न्याय झाला ह्मणून कांहीं गैर होणार नाहीं.

बाळासाहेबः–नको नको. तो न्याय मजकडे नकोच. स्वसंतोषानें आपण न्याय करावा असें मी सांगतों. आज छातीवर उभा राहून युद्धाला तयार झालेला जयवंतराव, त्याला पळविण्यास कारण आमच्या जातीचा एसबा, आणि त्याला सामील आमचा फार दिवसांचा चाकर जानबा! ह्याच्या मांडीवर मी खेळलों आहे, लोळलों आहे. ह्याचा न्याय मजपुढें नकोच. तो गुन्हेगार ठरल्यास आपण खुशाल त्यास हवी ती शिक्षा द्या. मला त्याचा फार संताप आला आहे. (कपाळाला हात लावून सचिंत बसतो.)

कुवतसिंगः–(प्रधानजीकडे वळून) असेंच. आपण तो कज्जा आपल्यापुढें घ्यावा.

(एसबा व जानबा पुढें येतात.)

प्रधानजीः–झाला तुमचा विचार? जानबा, तुह्मी आपणाला आणि आपल्या जातीला कलंक लावून घेऊं नका. काय असेल तें खरें सांगा.

जानबाः–मला बाळासाहेबांना एकांतीं भेटण्याची परवा-नगी पाहिजे.

प्रधानजीः–तुम्ही झालां आतां फार लाडके. अशी वारंवार परवानगी मिळत असते काय ?

जानबाः–मला त्यांच्याशीं गुप्त बोलावयाचें आहे, तें येथें कचेरींत उघड बोलावयाजोगतें नाहीं.

बाळासाहेबः–(रागानें) बोल बोल. अगदीं उघड कचेरींत बोल. होऊंदे त्यांत आमची फजिती. तूं ह्या गुन्ह्यांतून मुक्त झाल्यावांचून एकांतीं एक अक्षरही तुझ्यापासून ऐकण्याची किंवा तुझ्याशीं बोलण्याची माझी इच्छा नाहीं.

जानबाः–पहा, मग मजकडे दोष नाहीं. मग आपण म्हणाल, तूं भर कचेरींत कसें बोललास ?

बाळासाहेबः–अरे, तूं बेलाशक बोल. तुझें कपाळ फुटलें ! मी येथून उठून जाऊं कां ? (उठूं लागतो)

कुवतसिंग व प्रधानजीः–हं हं ! आपण उठूं नये. बसा. बसा.

बाळासाहेबः–मी रागानें जात नाहीं. आपण न्याय करा. मी येथें असल्यावर उलटा आपणांस संकोच होईल. जानबास शिक्षा ठरविण्यास भीड वाटेल. पण यत्किंचितही त्याची गय करूं नका. मला त्याचें बिलकुल वाईट वाटणार नाहीं. न्यायाच्या कामांत पोटचा पोर असला तरी योग्य न्याय बजावला पाहिजे. पक्षपात उपयोगी नाहीं. मी खरोखरच आपली आज्ञा घेऊन जातों. मला लष्कराची कवाईत समक्ष घेणें आहे.

कुवतासिंगः—बरें आहे, त्यांस जाऊं द्या. तेंही एक काम आहे.

(बाळासाहेब जातात.)

प्रधानजीः—जानबा, बोला तुमचें काय ह्मणणें आहे तें ?

जानबाः—भरकचेरींत बोलण्याजोगी गोष्ट नाहीं. पण बोलण्याचा योग आला तेथें काय करावयाचें ? बोलतोंच. जयवंतराव हा एसबाचा मुख्य धनी. तो आपल्या कैदेंत पडल्यावर केवळ स्वामिभक्तीनें त्यास सोडविण्याच्या इराद्यानें येथें आला. मीही जयवंतरावचा जुना चाकर. ह्याची माझी भेट रस्त्यांत झाल्यावर जयवंतराव कैदेंत पडल्याची मला ओळख न देतां, ह्यांनीं मला नोकरी मिळेल काय ह्मणून विचारलें. बाळासाहेबांच्या शिफारशीनें तुरुंगावरील अधिकारी यांजकडून ह्यास नोकरी देवविली. तेथें संधि पाहून ह्यानें आपल्या धन्यास पळविलें आणि आपण कैद्याच्या जागीं पडून राहिला. आमच्या मराठे जातीच्या अभिमानास व इमानास योग्य असेंच कृत्य ह्यानें केलें.

प्रधानजीः—इमानी खरा इमानी ! तुला ह्यानें जयवंतराव कैदेंत पडल्याची कां ओळख दिली नाहीं ? तूं बाळासाहेबांकडे अगर गुपितरावाकडे शिफारस करून त्यांस सोडविलें असतेंस.

जानबाः—होय. तसेंही झालें असतें. पण हा संकोचला. ह्याच्या मनांत जानबानें ह्या सरकारचें बहुत दिवस अन्न खाल्लें आहे, तेव्हां हा ह्या कामाला अनुकूल हो-

ईल न होईल. आपण जर आह्मांस सोडाल तर आह्मी भमून लढाई बंद करूं.

एसबा:-होय होय, तें मजकडे लागलें.

प्रधानजी:-वहावा! छानदार युक्ति कढविली. अशानें आह्मी तुह्मांस सोडूं, असें तुह्मांला वाटतें? आमचे सरकार लढाईस भीत नाहीं.

जानबा:-आपल्या सरकारची शक्ति मी जाणून आहे. पण जयवंतराव महाराज कांहीं कमी नाहींत. शेरास सव्वाशेर आहेत; विनाकारण रक्तपात मात्र होईल.

कुवतसिंग:-काय आह्मांला त्याचा बाऊ दाखवतो आहे!

प्रधानजी:-तोही शूर आहे खरा, पण त्याकरितां भिऊन ह्यांनां सोडावयास नको. तो ह्यांचें काय ऐकणार! दिल्लीपति बादशहामार्फत तो आला आहे.

जानबा:-तें कसेंही असो, आह्मांस सोडलें तर आह्मी लढाई बंद करूं, इतकें मात्र खरें.

एसबा:-हो, हो, तें मजकडे लागलें.

प्रधानजी:-तें कधीं होणार नाहीं. तुम्हांला सात सातवर्षांच्या सक्त मजुरीच्या कैदेची शिक्षा आहे.

जानबा:-आह्मी कैदेंत पडल्याचें आह्मांस मुळींच दुःख नाहीं, पण दुःख एवढेंच वाटतें कीं, विनाकारण रक्तपात होईल, आणि एखादा मोठा घात होईल. तो जयवंतराव आपल्या बाळासाहेबांचा बाप आहे बाप.

कुवतसिंगः—आणि गुपितराव ?

जानबाः—गुपितराव त्यांची आई आहे.

प्रधानजीः—हा आतां भलतेंच बरळूं लागला. ह्याला भयंकर शिक्षा ऐकल्यामुळें वेड लागलें. जवानसिंग, दोनों कैदीकू कैदखानेमें ले जाव.

जवानसिंगः—हां. हुकुम सरकार.

जानबा व एसबाः—(हात जोडून) पहा, आह्मांला सोडा, तुह्मी खरोखर फसाल. फसाल.

कुवतसिंगः—बस बस, जाव. जादा मत बोलो.

(जवानसिंग, एसबा आणि जानबा ह्या दोन्ही कैद्यांस नेतो. कचेरी बरखास्त).

प्रवेश चौथा.

स्थल—उदेपूर—कुवतसिंगाचा दिवाणखाना.

पात्रें.

कुवतसिंग—राजपुत्र.

बाळासाहेब—गुपितरावाचा मुलगा.

प्रधान—रणधीरसिंगाचा प्रधान.

कुवतसिंग—कशी काय तयारी आहे लष्कराची ?

बाळासाहेबः—उत्तम आहे. कांहीं भिण्याचें कारण नाहीं. उद्यां लढाईला सुरवात. त्यांची बिशाद काय? पण आमच्या जानबाचें काय झालें ?

प्रधानजी:—त्यांना दोघांनाही सात सातवर्षांची सक्तमजुरीची कैदीची शिक्षा सांगितली. ती ऐकल्याबरोबर जानबाला तर वेड लागलें. तो भलतेंसलतेंच बरळूं लागला. तो ह्मणाला, जयवंतराव आपला बाप, आणि गुपितराव आपली आई.

कुवतसिंग:—आणि ह्मणाला, आह्मांला दोघांना सोडा, ह्मणजे आह्मी जयवंतरावला सांगून लढाई बंद करूं.

बाळासाहेब:—फसला ह्मातारा कोणाच्या नादीं लागून. बाकी तो हाडाचा खरा. त्याची एकही लबाडी आजपर्यंत आपल्या आढळण्यांत आली नाहीं, आणि ह्मणूनच शिक्षा ऐकल्याबरोबर त्याला वेड लागलें. त्याचें वेड बरेंच लांबलें तर त्यास एकदम सोडून देऊं.

कुवतसिंग:—हो, पण खरें वेड कीं खोटें तें समजलें तर पाहिजे! खोटें वेड असलें तर चार दिवसांत समजेल. खरें वेड असलें तर सोडून देण्याचा कायदाच आहे.

बाळासाहेब:—छे! छे! खोटें वेड करणारा तो मनुष्य नाहीं.

कुवतसिंग:—तर मग सुटेलच.

प्रधानजी:—बाळासाहेबांना वाईट वाटलें हो.

बाळासाहेब:—वाईट ह्मणजे—त्याच्या आंगा खांद्यावर मी खेळलेलों. तेव्हां वाईट तर वाटणार हें उघडच आहे. मला आपण शिक्षा दिली ह्याचें बिलकुल वाईट

वाटत नाहीं. मी असतों तर जन्मठेपेचीच शिक्षा दिली असती. पण तो एसबाऱ्या नादानें फसला, याबद्दल वाईट वाटतें. आजपर्यंत त्याची एकही कवाडी आढळण्यांत आली नव्हती. भोळा बिचारा म्हातारा. जातभाईवर दया करायला गेला ती त्याला नडली. असो, आतां उद्यांची व्यवस्था मी आपल्या मतें अशी ठरविली आहे. मग ह्यांत आपणांस काय कमजास्ती करणें असेल ती करावी.

कुवतसिंगः—कशी काय व्यवस्था लावली ! आपण योजना केली असाल ती बरोबरच असेल, पण ऐकूं द्या तर खरी एकदां.

बाळासाहेबः—रणांगणांत मी स्वतः जाणार. शहराभोंवतीं लष्कराचा एक कोटच बनवावयाचा. वेशीच्या चारी दरवाजापुढें पहिल्या प्रतीचे चार चार सरदार नेमून ठेविले आहेत. आपण स्वतां पूर्व दरवाजावर असावें आणि प्रधानजींनीं राजवाड्यांत असावें, आणि शहरची शांतता राखावी.

कुवतसिंगः—हें मात्र बरोबर नाहीं. आपण दोघे रणांत जाऊं अगर तुह्मी पूर्व दरवाजावर असावें, मी रणांगणांत जाईन.

बाळासाहेबः—छे ! छे ! तुह्मांला रणांगणांत पाठवावयाचें, मग आमच्या सारखीं माणसें पदरीं असून उपयोग काय ? वास्तविक ह्मटलें ह्मणजे तुह्मांला राजवाड्यांत ठेवायचें आणि प्रधानजींस पूर्व दरवाजावर ठेवावयाचें.

पण आपण ऐकणार नाहीं ह्मणून आपली योजना पूर्व दरवाजावर केली आहे.

प्रधानजीः–हेंच बरोबर आहे. आपण राजवाड्यांत रहावें, मी पूर्व दरवाजा पतकरतों.

कुवतसिंगः–तर मग त्यापेक्षां हल्लीं ठरलें तें ठीक आहे. पण काय हो, बाबा तिकडून निघाले असतील नाहीं?

बाळासाहेबः–हो, निघाले असतील तर! ते आजला येथें येऊन पोंचावे. परंतु सातारकर महाराजांकडून मदत घेऊन यावें ह्या हेतूनें त्यांना एक दोन दिवस उशीर लागला तर न कळे.

प्रधानजीः–होय असेंच. आपली अटकळ बरोबर आहे. ते तिकडून मदतीला सैन्य घेऊन आल्यावांचन कधीं रहाणार नाहींत.

कुवतसिंगः–मग त्यांचेमागें आपणच लढाईला सुरवात करावी?

बाळासाहेबः–करावी ह्मणजे? आपल्या मनांत शंका कां आली? जयवंतराव आतां स्वस्थ बसेल? आपण उद्यां लढाईस उभें राहिलों नाहीं तर तो आतां शहरावर चाल करून येईल. विनाकारण रयतेचा नाश.

प्रधानजीः–तें तर खरेंच. अशानें प्रजेला फार दुःख होईल ह्यांत संशय नाहीं. गांवांतील प्रमुख लोक ह्या लढाईच्या धास्तीनें जयपूर जोधपूर वगैरेकडे चार दिवस पळून जाण्याच्या विचारांत होते, पण आपण लढाईची

जागा गांवापासून लांब नेमल्यामुळें गांवांत वस्ती निर्धास्त राहिली आहे. उद्यां तिकडे तळ दिलाच पाहिजे.

बाळासाहेबः—ठरलेंच आहे हें. कुवतसिंग महाराज, आपण भितां कां? जगदंबा यश देणारी समर्थ आहे. उमेद नका सोडूं. बाबा येतात त्याच्या आंत आपण जयवंताचा जयवंतपणा काढून घेऊं आणि आपणच जयवंत होऊं. विशाद काय त्याची?

कुवतसिंगः—मी भीत नाहींहा. भ्यालो असतों तर मी रणांत जातों असें बोललों असतों काय? पण म्हटलें, बाबा आले असते म्हणजे बरें झालें असतें. असो, आतां ठरलें तें ठरलें. बाळासाहेब, तुम्ही उजाडलें नाहीं तों लष्कर रणांगणांत सिद्ध असूंद्या. प्रधानजी, तुम्ही गावकऱ्यांना पक्का धीर द्या. बिलकुल भीति वाटूं देऊं नका. चला, मी पूर्वदरवाजाची व्यवस्था स्वतः पाहून येतों.

(सर्व जातात.)

अंक पांचवा.

प्रवेश पहिला.

स्थळः—उदेपूर—देवीच्या देवळांत.

पात्रें.

वैद्यबोवा, रामभट, गोविंदभट, व्यंकय्या, शामभट, भटंभट इत्यादि भिक्षुक.

रामभटः—काय हो शामभट, देवाचें सत्व अगदींच कसें गेलें. अहो महाराजांनीं सगळ्या देवळांतून अनुष्ठानें बसविलीं, जप चालू केले, शंकरावर संतत धार धरली. पण एकही पुण्य आडवें आलें नाहीं. अखेर जयवंतरावालाच यश मिळालें! बाळासाहेब आणि छोटे सरकार ह्या दोघांनांही त्यानें कैद केलें ह्मणतात.

वैद्यबोवाः—काळच फिरला, तेथें काय करावयाचें! फार वाईट गोष्ट झाली. ह्याच वेळेस पहा कसे मोठे महाराज पण येथें नाहींत! मुख्य सेनापति गुपितराव पण येथें नाहींत. वेळ आली ह्मणजे अशी येते.

गोविंदभटः—मोठे महाराज आणि गुपितराव असते ह्मणून काय करते! बाळासाहेब कांहीं कमी होते काय!

व्यंकय्याः—असा नको बोलूं, तुमचा थोरपणा तुमच्या पोराला येतो का! आह्मी चिंचेचा सार खातों. एक

लोटा ताक पितों. आमच्या बङ्कूला चिंचेचा बोटूक खाल्ला तर खोक्खो करतो. त्याचा आमचा बरोबरी होतो काय? महाराजा ते महाराजा. हे लहान पडला. बच्या! त्याच्यापुढें याचा काय चालतो?

वैद्यबोवा:—तसें नाहीं. आपल्या भटांच्या पोरांची गोष्ट निराळी. बाळासाहेब मोठे शूर. त्यांनीं ह्या जयवंतरावाला पकडून आपला कैदखाना दाखविला होता ह्मणतात. येथून पळून जाऊन ही पुन्हां ब्याद आली ह्मणतात.

रामभट:—अहो, ब्याद नका ह्मणूं. पकडून बिकडून नेतील. त्याचे लोक गांवांत फिरताहेत गांवांत.

शामभट:—फिरूं द्याहो, तो थोडाच एथला राजा होणार आहे. आतां हा मुलुख बादशहाच्या ताब्यांत जाणार ह्मणतात.

रामभट:—मग फार वाईट होईल. मी समजलों हाच येथें राज्यावर बसेल.

शामभट:—अरे छे! ह्याला कोण देतों राज्य? हा त्या अविंधाचा चाकुरडा. हें मुसलमानांचें राज्य झालें मुसलमानांचें.

भटंभट:—अरे जा. शरम नाहीं वाटत तुला बोलायला? मुसलमानांचें राज्य झालें ह्मणतो. रणधीरसिंग महाराजांना येऊन तर दे, मुसलमानांची खोडकी मोडून टाकूं. अरे आजपर्यंत इतकी दिल्लीपद बादशाही झाली पण आपल्या उदेपूरच्या स्वातंत्र्याला महाराजांनीं काही

इतका धक्का लागूं दिला नाहीं. स्वतंत्रता जाऊं लागली तर प्राण देऊं प्राण. सगळ्या उदेपुराला आपल्या हातानें आग लाऊन देऊं, पण त्यांच्या ताब्यांत नाहीं जाणार ठाऊक आहे?

व्यंकय्याः—लवंडीचा खरा बोलतो. एकेकाचा पंचा घेतो, दोन दोन लांडा बांधतो. एकेकाची पगडी घेतो, दहा दहा यवन बांधतों. राज्य जाऊं देतों का?

वैद्यबोवाः—अरे गप्प बस. सध्यां प्रसंग आला आहे तो खरा. यांतून युक्तीनें पार पडलें पाहिजे. रणधीरसिंग महाराज येतील आणि मग काय होईल ती गोष्ट लांब आहे.

गोविंदभटः—तर मग आपली दक्षणा आटपलीच? माझा एकवीस हजार जप झाला आहे.

वैद्यबोवाः—आतां दक्षिणा घ्या. वेठीला नाहीं धरलें, म्हणजे मिळविली.

व्यंकय्याः—आमचा देवीचा देवळ तो नाहीं जायचा! आमचा तीन पिढ्या येथें स्नान अनुष्ठान करतों. कायरे शामभट?

वैद्यबोवाः—अरे, सगळें राज्य गेलें त्यांच्या ताब्यांत आणि हा देवळाची फिकिर करीत बसला आहे! तिकडे राजवाड्यांत कोण गोंधळ उडून गेला आहे? प्रधानजी शांति शांति करितां थकून गेले.

रामभटः—तिकडे नाहीं गेला जयवंतराव? झटकें म्हणजे जायचा.

वैद्यबोवा:—छे! छे! त्याची उलटी ताकीद आहे कीं, अगदीं लष्करी लोकांशिवाय कोणाला त्रास द्यावयाचा नाहीं. राजवाड्यांत बिलकुल जाऊं नका. बायकांच्या पडदपोशीला बिलकुल धक्का लाऊं नका. हलके सलके मुसलमान किंवा पठाण असे कोणी असते तर ते राजवाड्यांतही शिरते, रयतेलाही त्रास देते, सगळें कांहीं करते, पण हा सातारकर महाराजांच्या तालमींतला आहे. हा भलतेंच कर्म करणार नाहीं.

गोविंदभट:—तर मग हा नाहीं आमची दक्षणा देववणार?

रामभट:—ह्याला आपली दक्षणेची काळजी येऊन पडली आहे. येथें लोक कोण फिकिरींत पडले आहेत! तिकडे बाळासाहेब आणि कुवतसिंग महाराज ह्यांना खायला तरी मिळालें आहे कीं नाहीं, कोणाला ठाऊक. राजवाड्यांत सर्व लोक उपाशीं आहेत.

वैद्यबोवा:—राजकीय कैद्याचे खाण्यापिण्याचे हाल करीत नसतात. मग एखादा दुष्टच असला तर न जाणों, पण जयवंतराव तशांतला नाहीं दिसत. जेवाखायला चांगलें घालील. माझ्या ओळखीचा आहे तो थोडासा. मी त्याला साताऱ्यास असतांना एकदां औषध दिलेलें आहे. मी त्यांच्या भेटीला जाणार आहें, पण तो आतां ओळखील तेव्हां खरा.

व्यंकय्या:—तूं पक्का वस्ताद रे. तूं वैद्यबोवा तूं. तू पाताळांत असला तरी भोंक पाडतो. सोडतो काय?

गोविंदभटः—हें पहा, गेलेतच तर आमच्या गरीब ब्राह्मणाच्या दक्षणेचें तेवढें ध्यानांत असूं द्या बरें. वैद्यबोवा ऐकलंतकां! एकवीस हजार जप. एकवीस हजार.

वैद्यबोवाः—बरें. बरें. तुझें तेवढेंच. मी जातों. ओळखकंन तर बाळासाहेबाच्या आणि कुवतसिंगाच्या खाण्यापिण्याची व्यवस्था नीट ठेवण्याविषयीं मी पदर पसरून मागणें मागेन.

रामभटः—बरें. जा, जा, अगोदर तिकडे जा.

गोविंदभटः—(हात जोडून) पण आमची तेवढी दक्षणा.

वैद्यबोवाः—हो, हो ती तर अगोदर!

रामभटः—अरे, गप्प बस. मूर्खा, तुझी दक्षणा बुडाली आणि तूं मेलास तरी काय हरकत आहे? असले आपलपोटे लोकच सारी घाण करितात.

(सर्व जातात.)

प्रवेश दुसरा.

स्थळः—रणांगणाजवळील तंबू.

पात्रें.

अबदुलखा—जयवंतरावाचा मदतगार सरदार.

शिपाई—एक शिपाई.

भिकारी—जयवंतरावानें पाठविलेला.

जयवंतराव—नायक, एक सरदार.

बाळासाहेब—जयवंतरावाचा मुलगा.

कुवतसिंग-रणधीरसिंगाचा मुलगा.
एसबा-जयवंतरावाचा नौकर.
जानबा-सेवक.
वैद्यबोवा-उदेपूरचा वैद्य.

जयवंतराव:-क्यंव अबदुलखां?

अबदुलखां:-साहेब हुकूम.

जयवंतराव:-शहाके तरफ खबर तो भेज दियी. अब देखना क्यां हुकम आता है? चाहे तो दोनो कैदीकूं दहेलीतरफ भेज दूंगा. वर्न यहा किलेमे रहे तो क्या मुजायका हय?

अबदुलखां:-ह्यां रखनेकू क्या हरकत है? कुछ हरकत नहीं. बहोत करके यहांकी कुलमुखत्यारी आपहीकू देवेंगे, और जैसा पिंजरेमे शेरकू बंद करते है वैसाही इस बाळासाबकूं और कुवतसिंगकूं पिंजरेमे रखे तो खूबही मजा होगी.

जयवंतराव:-खुब मजा तो क्या हानेकी? मजा तो हो गयी. अब कुवतसिंग तो लडका है, लेकिन बाळा-साहेबकूं तो बहोत फिकर थी. वोह जोंदाही आपके हातमें आगया, ये बात बहोतही अच्छी हुयी. उन दोनोकूं जरा सामने तो ले आव. बाळासाब बहोत हुशिआर और चालाख अदमी है. उनका मूह देखनेकूं हरदम दिल चाहता है. दिगर आपना एसबा कैद-खानेमें है, उसकूभी छुडाके ले आव.

अबदुलखां:-हुकूम. (पडद्यांतून जाऊन येऊन) कैदी हजर है सरकार.

(कुवतसिंग व बाळासाहेब कैदी येतात.)

जयवंतराव:-(कैद्यांकडे पाहून) कां बाळासाहेब, कशी काय मजा आहे?

बाळासाहेब:-आमच्या तुरुंगांत आपण होतां, त्यावेळेस आपण भोगीत होतां तशीच.

जयवंतराव:-(मनाशीं) पक्का वस्ताद आहे. आम्ही त्याला लागावें ह्मणून बोललों तों त्यानें आह्मांलाच लागण्यासारखा जबाब दिला. (उघडपणें) एकूण मोबद्ला झाला ह्मणतां?

बाळासाहेब:-नाहीं; आमची थोरवी जास्ती आहे. आपल्या तोंडानें सांगावयाची नाहीं इतकेंच.

जयवंतराव:-बोला, बोला. तुमचें बोलणें आह्मांला फार आवडतें. तुमची थोरवी अधीक ती कशी?

बाळासाहेब:-बोला ह्मणतां ह्मणून बोलतों, नाहीं तर बोललों नसतों. आमच्या कैदेंत आपण असतांना आम्ही आपणांस कधीं हिणावलें नाहीं; आणि आपण हिणविण्याच्या उद्देशानें बोलतां? सांपळ्यांतल्या वाघावर कांठी मारण्यांत पुरुषार्थ तो कोणता? मग ह्यांत थोरवी कोणाची जास्ती, हें आपणच पहा.

जयवंतराव:-भाषण मोठें खुबीदार आहे. मुलगा असावा तर असा असावा. अरे, एसबा अजून नाहीं आला! बाळासाहेब तुमच्या भाषणाचा आह्मांस आनंद होतो.

अबदुलखां:—क्यां उमदा जबाब दिया!

जयवंतराव:—ह्याला पाहिलें ह्मणजे माझ्या मुलाचें स्मरण होतें. (बाळासाहेबांकडे वळून) ठीक आहे, बाळासाहेब, तुम्हांला आम्ही आपली थोरवी दाखवितों. तुम्हांला दोघांनाही नुसती नजर कैद देतों. कोण आहेरे तिकडे? ह्यांच्या बिड्या काढ. (बिड्या काढतात.)

बाळासाहेब:—ही तर आमच्यावर बापासारखी दया केलीत. ही थोरवी अधिक खरी!

जयवंतराव:—तुम्हांला आमच्यापासून काडीइतकीही पीडा व्हावयाची नाहीं. (आठवल्यासारखें करून) अरे, इतका उशीर कां लागला एसबाला?

(इतक्यांत बाहेर कोका वाजवीत भिकारी येतो, व शिपायाचें आणि त्याचें हळू हळू भाषण होतें.)

शिपाई:—बाहिर कोई मुफलीस आया है. वो बोलता है के, मेरेकूं अंदर जानेका खुद आपका हुकम है. उन्होनें ए कागज दिया है. (कागद पुढें टाकतो.)

जयवंतराव:—(कागद पाहून) हं, हा तोच भिकारी; ह्यानें कांहीं तरी आनंदाची खबर आणली असेल. आजचा आनंदाचा दिवस आहे. अरे, अजून एसबा आला नाहीं! (शिपायाकडे वळून) ठीक आहे. त्याका आंत पाठीव आणि तूं एसबाला ताबडतोब घेऊन ये. कांहीं हरकत असली तर तसें कळीव.

शिपाई:—(सलाम करून) हुजूर!

(भिकारी आंत येतो.)

भिकारीः-

सुशील स्त्रीशी कपट करी जो त्याला ती स्त्री अंतरते॥
रानोरानीं भटके तो नर मन त्याचें दुःखित होतें॥
संसाराला मुकतो सहजीं वेडेपण पदरीं येतें॥
न सुचे धंदा त्या मतिमंदा जयवंता अपयश येतें॥

(हें गाणें ह्मणत असतां जयवंतराव हावभाव करतो.)

जयवंतरावः—अरे तूं कोठून आलास?

भिकारीः—महाराज, मी साताऱ्याहून आलों. सातारकर महाराजांचें लष्कर आपल्यावर चाल करून येत आहे. अगदीं येऊन ठेपलेंच समजा.

जयवंतरावः—अरे काय ह्मणतोस हें! ही कां बातमी आणलीस तूं!

भिकारीः—नाहीं, दुसरीही आहेना!

जयवंतरावः—तर मग ती सांग अगोदर.

भिकारीः—ती सांगतों, पण मी भ्यायलों. मोठें लष्कर आलें, येऊन ठेपलें; अगदीं एक दोन मुक्कामांचें अंतर असेल.

जयवंतरावः—तें असूंदेरे. दुसरें काय सांगतोस तें सांग अगोदर.

भिकारीः—त्यांच्याबरोबरच रणधीरसिंग महाराज गुपितराव आणि एक गोसावी आहे. त्यानींच हें गाणें ह्मणण्याकरितां मला जवळ बसवून घेतलें. तो आणि गुपितराव हें गाणें ऐकून अगदीं वेडे होऊन जात.

जयवंतराव:—तो गोसावी आमचा सासरा तर नसेलना? अरे, तो ह्या गुपितरावाचा कोण हें तुला कळलें आहे काय?

भिकारी:—गुपितरावाचा बाप ह्मणतात. सगळें उघड बोलूं का?

जयवंतराव:—बोल बोल, विचारतोस काय?

भिकारी:—(हळूच) गुपितराव बायको आहे. ती त्या गोसाव्याची मुलगी.

जयवंतराव:—खचीत तर मग संशय कसला? तो माझा सासरा आणि गुपितराव माझी बायकोच असली पाहिजे. असें असेल तर मोठ्या आनंदाचीच वार्ता तूं आणलीस ह्मणावयाची.

कुवतसिंग:—होय होय, असेल खरें! हे बाळासाहेब आपले चिरंजीव असेंच जानबा ह्मणत होता.

जयवंतराव:—जानबा कोण?

कुवतसिंग:—जानबा त्यांचा फार दिवसांचा जुना नोकर. गुपितरावाजवळ तो अठरा वीस वर्षें आहे. (थांबून)

कुवतसिंग:—खरेंच हो खरें. हा आपला मुलगा, गुपितराव आपली स्त्री आणि आपण ह्यांचे बाप असें जानबा बोलला तेव्हां त्या बिचाऱ्याला वेड लागलें असें आम्ही समजलों. खरेंना बाळासाहेब?

जयवंतराव:—आं, काय ह्मणतां? हा माझा मुलगा? अरे, तूं माझा मुलगा? मला वेड लागण्याची वेळ आली.

काय बाळासाहेब, तूं माझा मुलगा? (मिठी मारतो, मुका घेतो.)

बाळासाहेबः—(एकीकडे) काय आश्चर्य आहे हें? हा माझा खरा बाप आणि गुपितराव माझी आई असेल! (इकडे तिकडे पाहून) तिनें पुरुषवेष घेऊन माझ्या देखील लक्षांत येऊं न देतां इतक्या शिताफीनें इतके दिवस निभावलेन आं?

जयवंतरावः—अरे माझा एसबा कोठें आहे? अरे जानबा कोठें आहे? छे! हें स्वप्न आहे. चल तूं मला खोटें सांगून फसवितोस? मी तुला सोडीन काय? आणरे तरवार. (तरवार हातांत घेतो व अंगावर धांवतो.) तूं बाळासाहेब आहेस बाळासाहेब?

(इतक्यांत एसबा व जानबा येऊन जयवंतरावास धरतात आणि तरवार हिसकून घेतात.)

एसबाः—महाराज तो आपला मुलगा; त्याला मारतां काय?

जयवंतरावः—कोण एसबा? सोडा, मला बाळासाहेबांचा चांगला समाचार घेऊंद्या. ह्याच्या कैदेंत तुह्मी होतां नाहीं?

जानबाः—मला ओळखतां काय?

जयवंतरावः—होय, होय, तूं एसबा. मी कोणाचें ऐकणार नाहीं.

(हातांतून सुटण्याकरितां दांडगाई करतो).

जानबाः—मी एसबा नाहीं, जानबा आहे जानबा. अरे कोणी थंड पाणी आणारे. पंखा, पंखा.

(कोणी पाणी आणून टाळूवर पाणी शिंपडतात व पंख्यानें वारा घालतात).

जयवंतरावः—शूः! कोण जानबा? ती कोठें आहे? तुम्ही एकटेचसे? (धाडकन् पडतो).

बाळासाहेबः—माझी आणि माझ्या बाबांची ओळख पटण्याचा आज पहिला दिवस आणि त्यांत असा प्रसंग यावा काय? (जवळ जाऊन घाबऱ्या घाबऱ्या मिठी मारतो.)

जानबाः—(पाणी डोळ्याला लावतो व वारा घालतो) अम्मळ स्वस्थ व्हा. ती खुशाल आहे. येते आहे.

जयवंतरावः—आहे, मी सावध आहे. तो भिकारी कोठें आहे? तो ह्मणतो विश्वासराव मला भेटले. विश्वासराव, तूंच विश्वासराव, तूंच जानबा, तूंच माझी बायको. (सुरानें ह्मणतो) जया जया! प्रिया प्रिया! जया जया! बाळासाहेब माझा. यंवरे! (मुका घेतल्यासारखें करतो).

जानबाः—कोणी वैद्य आणवा लौकर; बाळासाहेब हे तुमचे खरे बाबा हो! आतां सावध होतील भिऊं नका. शांत व्हा.

भिकारीः—दोन मुक्कामांवर गुपितराव आणि त्यांचा बाप व विश्वासराव हे येऊन थडकले आहेत, त्यांना अगोदर

कोणी खबर द्या. नाहींतर ते एकदम येऊन छापा घालतील.

(इतक्यांत वैद्य येतात.)

बाळासाहेब व जानबाः—या या, बरे वेळेवर आलांत. एकदां प्रकृति पहा तर खरी.

वैद्यबोवा-(नाडी पाहून) ऐकलेंत कां? हा शुद्ध हर्षवायु आहे हर्षवायु. भोंवतालची दाटी अंमळ कमी करा. घाबरूं नका. ह्यांना स्वस्थ पडूं द्या आणि वारा घाला. हें औषध तोंडांत घालून वर एक बोंडलेंभर पाणी पाजा (औषध देतो).

जानबाः—(औषध तोंडांत घालतो व पाणी पाजतो.) धास्ती तर नाहींना?

वैद्यबोवाः—धास्ती कांहीं नाहीं. आतां ह्या औषधानें त्यांस झोंप लागेल. पडदा लावा, येथें कोणी गडबड करूं नका. नाडी उत्तम आहे. घाबरण्यासारखें नाहीं.

(पडदा पडतो.)

जानबाः—एसबा तुह्मी आतां ह्या घोटाळ्यांत पडूं नका. मी येथें आहे, बाळासाहेब आहेत. तुह्मी अगोदर बाई-साहेबांना ही खबर द्या.

जानबाः—ठीक आहे. वैद्यबोवा संभाळा बरं, मी तिकडे जाऊन बाईसाहेबांस घेऊन येतों.

वैद्यबोवाः—नको नको. त्यांना आणूं नका. हर्षवायूच्या विकारांत त्यांच्या येण्यानें दुखणें वाढेल. मात्र तुह्मी तिकडे खबर द्या आणि त्यांच्याजवळ असा. नाहींतर तिकडेही एखादा असाच प्रकार व्हावयाचा. इकडची प्रकृति ठीक आहे. ते पहा, त्यांनीं डोळे उघडले.

जानबाः—बरं तर हा मी चाललोंच. (भिकाऱ्याकडे वळून) चलरे चल मजबरोबर (जातात.) इकडे स्वस्थता झाली ह्मणजे मी स्वतः बाईसाहेबांस समजाऊन सांगण्यास येतों.

प्रवेश तिसरा.

स्थळः—उदेपूर येथील एक दिवाणखाना.

पात्रें.

जयाः—जयवंतरावाची स्त्री (गुप्तिराव)
एसबाः—जयवंतरावचा नोकर.

जयाः—(मनाशीं.) ईश्वराची करणी विचित्र आहे. तो करूं लागला ह्मणजे सर्व गोष्टी सोईच्या होतात. बरं झालं, जानबानें येऊन मला तिकडली खबर कळविली, आणि एकदम छापा घालण्याचा बेत मीं तहकूब केला. नाहींतर आज केवढा घात झाला असता! आलों, किती अवसानांनीं; आणि येथें तर माझ्या प्राणविसाव्याशीं गांठ. माझ्या पंचप्राणांवरच मी आपल्या हातांनीं बंदूक झाडावी तसा प्रकार झाला असता! ईश्वराची दया,

ह्मणूनच तें अरिष्ट टळलें. दुसरा चमत्कार, सातारकर महाराजांचें सैन्य आलें, इतक्या नुसत्या दराऱ्यानेंच बादशहाकडून पत्र आलें कीं, "त्यांचा आमचा दोस्तीचा हक्क ठरला आहे, त्यांच्याशीं आम्ही लढाई करूं इच्छीत नाहीं. रणधीरसिंगाची स्वतंत्रता त्याजकडेच राहूं द्यावी." आम्हांला तरी दुसरें काय पाहिजे होतें? महाराजांची स्वतंत्रता कायम राहिली ह्मणजे झालें! तो हेतू सहज सिद्धीस गेला. अर्थात् लष्कराचें काम राहिलें नाहीं. सातारकरांचें सैन्य साताऱ्यास परत पाठविलें. जिकडे तिकडे शांतता झाली. आतां माझ्या जिवलगाच्या भेटीशिवाय दुसरें कांहीं मनांतच येत नाहीं. मी आतां जाऊन सुखातिशयांत दंग झालें असतें. पण वैद्यबोवा म्हणतात, नुकताच पुत्रदर्शनानें झालेला हर्षवायु आताच शमला आहे, आपण एकदम भेट घेतली तर दुखणें उलटेल. धर्मशास्त्रांत तर असें स्पष्ट सांगितलें आहे कीं, बारा वर्षीनंतर आपल्या कोणत्याही जवळच्या नातलगाच्या भेटीचा योग आला असतां, देवळासारख्या ठिकाणीं विधिपूर्वक भेट घ्यावी, ह्मणजे सर्व अरिष्टें टळतात. शास्त्रकार काय वेडे होते? जरा धीर धरला पाहिजे, ही गोष्ट मला समजते. शास्त्राविरुद्ध आपला वेडा हट्ट धरून एकदम जाऊन आपण भेट घेतली आणि दुखणें उलटलें तर मीचना त्या दुःखास कारण? नकोच तें. त्यापेक्षां मीच आपलें मन आवरून दुःख सोसलेलें बरें. पण माणसाचं मन मोठं चमत्कारिक आहे. किती तरी

माझं मन उतावीळ झालं आहे ? माझं मलाच आश्चर्य वाटतं. झटकं ह्मणजे आतां माझं मन शांत व्हावं. आज कांहीं नाहीं तरी ह्यांच्या वियोगाला एकोणीस वर्षें झालीं. माझं मन इतकं कधीं उतावळं झालं नाहीं. शिजेस्तों दम धरवतो, पण निवेतों दम धरवत नाहीं म्हणतात तें खोटं नाहीं. पहिल्यानें हे कोठें आहेत ह्याचा पत्ताही नव्हता. आतां तर ह्या प्राणाचे धनी येथें अगदीं जवळ आहेत. तेव्हां भेट कधीं होईल ह्याचा कांहींच अजमास नव्हता. आतां भेटीची वेळ अगदीं जवळ आली आहे, तरी त्या वेळेपर्यंतही धीर धरवत नाहीं! हा माझा शुद्ध वेडेपणा नव्हे काय? खरोखरीच मी वेडीच झालें आहे ह्यांत संशय नाहीं. एरव्ही मला जेवण कां सुचूं नये? मला झोंप कां येऊं नये? अक्षयीं ध्यानीं मनीं स्वप्नीं तीच मूर्ती. झटलं ह्मणजे माझा दिवाणखाना सजविण्यांत मी दंग असावं. येथें आपण जोड्यानें बसूं, येथें निजूं, येथें मौजेनें उभें राहूं, ह्या गोष्टी मनांत याव्या, पण तें देखील नाहीं. दिवाणखा-ना सजविण्याचं काम सगळं रांणीसाहेबांनींच केलें. आपल्या महालापेक्षां देखील माझ्या महालास अधिक शोभा आणली आहे. मला धुम हात धरधरून तिकडे नेऊन एकेक तजविजी दाखवितात, माझी थट्टा करि-तात, पण माझं चित्त त्यांत रमतच नाहीं. मला एकदां केव्हां भेटेन आणि घट्ट मिठी मारीन असं झालं आहे. एसबा, जानबा घटके घटकेची तिक-डली खबर आणतात. बाळासाहेब येतो, भेटतो. ति-

कडल्या एकेक गोष्टी सांगतो, खरोखर तो अधिक नशीबवान. माझ्या अगोदर त्याला तिकडची भेट झाली. तिकडे माझ्या भेटीविषयीं किती आतुरता झाली आहे ती देखील मला कळते. महाराज देखील स्वतः येतात, आणि "धन्य आहे तुमच्या प्रेमाची" असें ह्मणतात. 'जरा धीर धरा', 'जरा धीर धरा', असें सांगतात; पण आतां खरोखर एकेक पळ एकेक युगाप्रमाणें मला वाटतें. मला असं झालं आहे कीं, तो भेटीचा सुखदायक क्षण केव्हां येतो!

(इतक्यांत एसबा येतो.)

एसबाः—बाईसाहेब, आपण स्वस्थ काय बसलांत! कोणत्या विचारांत गुंगल्यासारख्या झालां आहांत, सगळे जण शंकराच्या देवळांत आपली वाट पहात बसले आहेत. आपलाच खोळंबा झाला आहे. जयवंतराव महाराजांनीं व वैद्यबोवांनीं मला इकडे पाठवलं. ह्मणाले जा आणि लौकर घेऊन ये.

जयाः—अग बाई! खरंच कां! तर मग मी ही उठलेंच पहा. मी तर त्याच क्षणाची वाट पहात आहे. (आनंदानें) आलाग बाई तो सुखाचा क्षण! (लगबगीनें जाते.)

प्रवेश चवथा.

स्थळः—उदेपूर. येथील शंकराचे देऊळ. शंकरास पूजा बांधलेली आहे. व वाद्यघोष होत आहे.

पात्रें.

वैद्यबोवा, भटाभिक्षुक, रणधीरसिंग, विश्वासराव, जयवंतराव, कुबतसिंग, बाळासाहेब, प्रधानजी, एसबा, जानबा, सेवक गवयी वगैरे.

वैद्यबोवाः—(पूजा वगैरे आटपल्यानंतर) * धर्मशास्त्राप्रमाणें कांस्यपात्रामध्यें आज्यावलोकनादि विधि झाला. आतां बाईसाहेब तुह्मी यजमानांना नमस्कार करावा. बाळासाहेब तुह्मी आपल्या तीर्थरूपांना व मातोश्रीना भेटा. विश्वासराव तुह्मी पण आपल्या जावयांस भेटा. परस्परांच्या भेटी होऊं द्या.

---

* दंपती पितृपुत्रौच स्वसारौ भ्रातरौ तथा। पितृव्यमातुलौ चैव दौहित्रौ भागिनेयकौ। पुत्रिका पितरौचैव भगिनी पितरौ तथा। द्वादशाब्दे व्यतीते तु दूरदेशं गतौ यदि। एतेषामेकमेकोपि नान्योन्यमवलोकयेत्॥ इच्छंति केचिदाचार्या अन्योन्यमवलोकनं। शिवालयेऽथवा तीर्थे स्नात्वा प्रज्वाल्य दीपकौ। शिवं संपूज्य विधिवदुभौ तौ देवमध्यतः। धृत्वा कांस्यमयं पात्रं सजलं रत्नपूरितं। शांतिकैर्मंत्रघोषैश्च द्विजैः सह विलोकयेत्। आननं चैकमेकस्य दृष्ट्वा सम्यक् शिवं नमेत्। ब्राह्मणेभ्यो यथाशक्त्या दद्यात्पात्रं सुदक्षिणं। अन्येभ्यश्चाथ विप्रेभ्यो यथा वित्तानुसारतः। तेभ्योपि दक्षिणां दत्वा पूजयेच्च पुनः पुनः। नत्वा देवं द्विजान् पूर्वमागच्छेत्स्वस्वमंदिरं। ततो व्याहृतिभिर्होमं शतमष्टोत्तरैस्तिलैः।

बाळासाहेबः–(धांवत जाऊन मिठी मारून) आई, मला सगळ्यांच्या देखत तुला आई म्हणूं देग. 'आई' म्हणण्याची माझी हौस पुरली नाहीं.

जयाबाईः–ह्मण बरं आतां पोटभर आई. ह्मण मी तुझीच आहे.

(विश्वासराव व जयवंतराव परस्पर भेटतात, स्त्री जयवंतरावाजवळ पाया पडून उभी राहते, मंगलवाद्यें वाजतात. जयवंतराव व बाळासाहेब आणि विश्वासराव जवळ जवळ आपापल्या आसनावर बसतात. सर्व मंडळी बसते).

रणधीरासगः–ईश्वरानें मोठा सुयोग जमवून आणला. सुशील आणि पतिव्रता स्त्रीची परमेश्वर कधींही उपेक्षा करीत नाहीं. खऱ्या धर्मानें वागल्यास ईश्वर कसें यश

कृत्वाथ भोजयेद्विप्रान् यथावित्तानुसारतः। बांधवैः सह भुंजीत सर्वारिष्टप्रशांतये। इत्थं यः कुरुतेमर्त्यस्तस्यारिष्टं न विद्यते। आयुष्कामो नरश्चैवमकृत्वा नावलोकयेत्।पूर्वं विलोकितानां तु विधिरेष उदाहृतः। नचैवापूर्वदृष्टानामिति प्राहुर्मनीषिणः॥

दिनकरभट्टकृत शांतिसार ग्रंथ.

द्वादशाब्दे व्यतीते तु न कुर्याद् भ्रातृदर्शनं । पित्रोः पुत्रस्य नैवाहुर्महाहानिकरं भवेत्। दर्शनं तु प्रकुर्वीत शिवं पूज्य शिवालये। कांस्यपात्रं स्फोटयित्वा अंतःपटविधानतः । मुखावलोकनं पश्चात् समालिंग्य विपर्ययात्। एवं कृते विधानेतु दोषशांतिं भविष्याति. पारिजात.

पुनः पुनर्नमस्कृत्य पश्चात्तंच विलोकयेत् । प्रणम्यालिंगनं कुर्यात्स्वागतं क्षेमपृच्छनं। आरामे पुण्यतीर्थे वा देवागारेथ संगमे। सुपवित्रनदीतीरे विधानं क्षेमदं भवेत्॥

सूर्यारुणसंवाद.

देतो हें आज घडलेल्या योगावरून सर्वांच्या लक्षांत आलेंच असेल. प्रधानजी ह्यांचें चरित्र सुवर्णाक्षरांनीं लिहून आपल्या दप्तरांत ठेवा. एखादा रसिक कवि ह्या चरित्रावर एखादें सुंदर नाटक रचील.

प्रधानजी:—होय, हें चरित्र नाटक रचण्यास अगदीं योग्य आहे. हा एक सर्वांना दाखलाच झाला ह्मणावयाचा.

रणधीरसिंग:—जयवंतराव, आमचें सेनापतींचें काम आपल्या कुटुंबानें इतकें उत्तम केलें कीं, त्याचें वर्णन करणें अशक्य आहे. आतां आपण सेनाधिपत्य स्वीकारावें अशी आमची इच्छा आहे.

जयवंतराव:—आतां उत्तरावस्थेंत आमची पहिली उमेद गेली. आतां आपण आमच्या चिरंजीवाकडे तो अधिकार दिला आहे तोच योग्य आहे. प्रसंग पडल्यास आह्मीं पायापाशीं हजर आहोंच.

जयाबाई:—परमेश्वरदयेनें प्रसंग येऊं नये. जिकडे तिकडे शांतता असावी हेंच त्याजपाशीं मागणें आहे. तथापि प्रसंगच आल्यास मी कांहीं शस्त्र हातीं धरणार नाहीं अशी शपथ वाहिली नाहीं. आम्ही तिघेही हजरच आहोंत.

रणधीरसिंग:—बरें आहे. आपल्या विचारास येईल त्याचप्रमाणें आह्मांसही मान्य आहे. आतां तरमग कुवतसिंग महाराजांसच आम्हीं गादीचा अधिकार दिला आहे, तोच कायम आणि बाळासाहेब त्यांचे सेनापति आहेत तेंही कायम. ह्यांनीं कारभार पहावा आणि आपण कौतुक पहावें हेंच योग्य.

प्रधानजीः—हेंच योग्य. हेंच योग्य.

जयाबाईः—जानबासारखा इमानी नोकर मिळावयाचा नाहीं. खरा स्वामिनिष्ठ, तो होता ह्मणून हे दिवस दृष्टीस पडले.

जयवंतरावः—आणि एसबा काय कमती आहे! मी कैदेंत असतां अगदीं निराश झालों होतों. ह्मटलें आतां आमची अखेर येथेंच. पण एसबानें तेथें येऊन माझी कैदेची जागा पतकरली आणि मला मोकळें केलें, ह्मणून तर हा आजचा योग आला. हे चाकर कसचे! हे आमचे रक्षक. यांचे उपकार आमच्या हातून फिटावयाचे नाहींत.

जानबाः—असें काय म्हणतां! एसबाः—(हात जोडून) आह्मी ह्या पायाचे चाकरच आहोंत.

कुवतसिंग व बाळासाहेबः—आमच्यापासून ह्यांस बराच त्रास भोगावा लागला.

जानबा आणि एसबाः—होणार गोष्ट ती. आपण त्याबद्दल कांहीं मनांत आणूं नये.

रणधीरसिंगः—तुमची हकीकत ऐकून आम्हांस फार आश्चर्य वाटलें. स्वामिनिष्ठपणाचें महत्व किती आहे, हें लोकांस दाखविण्याकरितां मी आपल्या उजव्या हातास बसण्याचा तुह्मांला मान देतों. हे आजपासून आमचे मानकरी झाले. या एसबा, जानबा, असे इकडे बसा. प्रधानजी, ह्यांना पोषाक द्या.

(एसबा आणि जानबा संकोचानें जयवंतरावाकडे पहातात.)

जयवंतराव:–जा, जा, संकोच कसला? ध्या पोषाक ध्या. तेथें जाऊन बसा. हें तुमच्या चांगल्या गुणांचें बक्षीस आहे. तुमच्यामुळें तर आज आनंदाचा दिवस आला.

(एसबा व जानबा तेथें जाऊन बसतात. नाच गाणें सुरू होतें.)

विश्वासराव:–(लोकांकडे पाहून) हे गृहस्थ मना जोगती बायको मिळाल्यावांचून लग्न करणारच नव्हते. पण कायहो जयवंतराव, आमची मुलगी आपल्या कसोटीस उतरलीना? अहो मुलींना काय, जसें शिक्षण दिलें तशा त्या होतील. शूर, धीट, नीतिमान, विचारी, कुशल, जसें त्यांस शिक्षण द्यावें, तशा त्या होतात. लोक तसें करीत नाहींत हा त्यांचा दोष आहे. स्त्रियां-कडे बिलकुल दोष नाहीं.

जयवंतराव:–खरी गोष्ट आहे आणि हेंच माझें पहिल्या-पासून ह्मणणें आहे. आज परमेश्वरानें सर्व हेतु पूर्ण केले.

रणधीरसिंग:–प्रधानजी, आज आनंदाचा दिवस आहे. ब्राह्मणांना दक्षिणा द्या. यादीप्रमाणें भिक्षुकांना आणि मानकऱ्यांना पोषाक द्या.

(नाचरंग होतो. पानसुपारी हारतुरे देतात.)

समाप्त.

आमचेकडे विक्रीस तयार असलेलीं पुस्तकें.

	पुस्तकांचें नांव.	किंमत रु.
१	पानपतची मोहीम.	३॥
२	अर्थशास्त्र (कागदी).	१
३	विषवृक्ष.	१
४	मुसलमानी रियासत (कागदी).	१॥।
५	देवी सत्यभामा (कागदी).	१
६	वीरमती (कागदी).	०॥.
७	सती राणकदेवी.	१
८	वांईकर भटजी.	१
९	दुर्गेशनंदिनी.	१॥
१०	सद्वाक्यकथासंग्रह.	०॥।
११	वक्तृत्वकला.	१
१२	माधवीनी.	१
१३	आरोग्यशास्त्र....	१।
१४	प्याद्यांचा फर्जी.	१
१५	सुलभपरमार्थ ज्ञानमाला.	१॥
१६	कै. जमनाबाई महाराणी गायकवाड यांचें चरित्र.	१
१७	कृषिकर्मविद्या	४

इतर पुस्तकें.

श्री दत्तप्रबोध (ओवीबद्ध ग्रंथ).	४
भारतचंपू सटीक.	२॥
देवमामलेदार यांचें चरित्र....	१
टर्की आणि रशिया वार.	१।
मेघदूतकाव्य सटीक.	२।
संगीत शापसंभ्रम नाटक.	१
,, मृच्छकटिक नाटक.	०॥।
,, रामराज्यवियोग नाटक.	१
,, संशयसंभ्रम नाटक....	१

संगीत देवयानी नाटक.	१॥
,, मेघदूत नाटक.	१
,, वीरतनय नाटक.	१
,, मूक नायक नाटक....	१
वेदोक्तमानवधर्मसार.	२
साबू....	२
आत्मविचार....	१॥
शिवछत्रपति.	१॥
विलासिनी.	१॥
शेवटचा शूर वाघेर....	१॥
सांपत्तिक कथावळी....	१॥
समाजसुधारणेच्या कित्येक बाजू.	१॥
माधवीकंकण.	१॥
आनंदाश्रम.	१।
मुक्तामाला.	१[illegible]
काशीक्षेत्रवर्णन.	१
संतचरित्र.	०॥[illegible]
माझें प्रियपुस्तक अथवा व्यवहारदर्पण.	०॥[illegible]
दर आकारण्याची जंत्री.	०॥०
कुलस्त्रियांकरितां गाणीं.	०।०
मुलांनीं घरांत खेळण्याचे खेळ.	०।०
होळकरशाईची बखर.	०।०
निबंध लेखनचर्चा.	०।०
श्रीसत्यदत्तव्रतपूजाकथा.	०।०
वनस्पतीचा संसार.	०।०
विघ्नसंतोषी आणि सोडत....	०।०
वाहवारें प्रेम ? अथवा खेरमट आणि जिजामाका...	०।०
रामायणकालीन लोकस्थिति.	[illegible]
साळू (एक बोधपर गोष्ट).	[illegible]
अभिनवकर्णवध नाटक.	[illegible]
पाण्याचा आरोग्यशास्त्रदृष्ट्या विचार.	[illegible]